शनिवार । ११ जून १९७८
७५ पैसे

# माणूस

महाराष्ट्रात शे. का. प. + जनता
असे नवे संयुक्त सरकार अशक्य नाही.
—कृष्णराव धुळप

वातावरण तापू लागले.
काँग्रेस फाटाफूट पुढे चालू...
—माहितगार

मंत्रालयाच्या सहाव्या मजल्यावर
छन्नमार्गातच
गोविंदराव आदिक म्हणत होते...

**साप्ताहिक माणूस**

वर्ष सतरावे-अंक दुसरा

११ जून १९७७

मूल्य पंचाहत्तर पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
□
वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये
□
प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.
□
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले
□
साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०
□
दूरध्वनी : ४३४५९
□

# महाराष्ट्राचे राजकारण तापू लागले

## भ्रष्ट मंत्र्यांविरुद्ध काँग्रेस आमदारांच्या मोहिमेमागील धागेदोरे

माहितगार

नेतृत्वात बदल केला असला तरी महाराष्ट्र काँग्रेसमधील असंतोष कमी झालेला नाही. महाराष्ट्र काँग्रेसमधील असंतोष धुमसत असून मुख्य मंत्री वसंतरावदादा पाटील यांच्या खुर्चीखाली सुरुंग पेरण्याच्या कामाला काही आमदार लागलेले आहेत. शंकरराव चव्हाणांना काढून दादांना आणले; पण सर्वांना बरोबर घेऊन जाण्याचा संकल्प काही सिद्धीस जात नाही. हा यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, वसंतराव पाटील यांच्या नेतृत्वाचा एक प्रकारे पराभवच म्हणावा लागेल. कामे करून किंवा मंत्रीपदाची लालूच दाखवून आमदारांना आपल्या भजनी लावण्याची सवय काँग्रेसनेत्यांनी लावली आहे. कोठेही तत्त्वाचा स्वीकार करावयाचा नाही. याचे परिणाम व्हावयाचे तेच होणार! सर्वांना कधीही समाधानी ठेवता येणार नाही. त्यामुळे मंत्री करण्यात आलेले नाहीत अशांना, मोहोळ उठवावे त्याप्रमाणे उठवून नेता बदलण्याची मोहीम काढली गेली. नेता बदलला आणि नवा नेता आला. वसंतराव पाटील यांनी १७ एप्रिल १९७७ रोजी मुख्य मंत्रीपदाची शपथ घेतली. असंतोष दाबण्यासाठी दादांनी वसंतराव नाईक यांच्या प्रकल्पापुढे मान तुकवून चाळीस जणांचे मंत्रिमंडळ बनवले. ते बनवत असताना नाइकांच्या नातेवाइकांना जसे घेण्यात आले तसेच भ्रष्टाचाराबाबत ज्यांची नावे घेतली जातात अशांचीही मंत्रिमंडळात सोय लावली. शंकररावांना काढण्यात पुढाकार घेतला अशा 'कंत्राट-दारी' आमदारांना दादांनी मंत्री केले नाही. या दोन्ही कारणांमुळे आमदारांत नाराजी होतीच.

ही नाराजी असल्यामुळेच अनेकजण दादांच्या चाळीस जणांच्या मंत्रिमंडळाला 'अलीबाबा आणि त्याचे चाळीस चोर' असे संबोधू लागले! आपणच नेतृत्वात बदल करण्याच्या मोहिमेत अग्रभागी राहिलो असे असताना लगेच दादाविरोधी गेलो तर आपल्याविषयीही मत चांगले राहणार नाही म्हणून हे नाराज आमदार पहिले काही दिवस गप्प होते. मात्र खासगी चर्चेत ही मंडळी हे नाइकांच्या पै-पाहुण्यांचे मंत्रि-मंडळ आहे, चारित्र्य नसलेल्यांना वाव दिला आहे असे म्हणत होते. मंत्रिमंडळातील पै-पाहुण्यासंबंधी पी. पी. सी सी. संबंधी दादांना जेव्हा विचारले गेले तेव्हा त्यांनी 'विश्वामित्री हात' केला. 'कोण पै-पाहुणे आहेत, मला काही माहिती नाही' असे दादा म्हणाले. दादांना पै-पाहुणे कोण आहेत, ते कोणाचे नातेवाईक आहेत हे माहिती नसेल तर दादा फारच भोळे असावेत असे म्हटले पाहिजे. भ्रष्ट मंत्र्यांना मंत्रिमंडळात घेतले आहे, या आमदारांच्या कुजबुजीला महाराष्ट्र काँग्रेसच्या शिबिराने जाहीर चर्चेची संधी मिळवून दिली. शिबिरात बहुतेक प्रतिनिधींनी भ्रष्टाचारी लोकांना मंत्रिमंडळात घेतले असल्याचा आरोप केला म्हणा अथवा वस्तुस्थितीत अंजन घालावे तशी मांडली! बहुसंख्य प्रतिनिधींनी भ्रष्टाचारी मंत्र्यांना लक्ष्य केले तर यशवंतराव मोहिते यांच्या-सारख्या ज्येष्ठ मंत्र्यापासून सामान्य कार्य-कर्त्यापर्यंत अनेकांनी मंत्रिमंडळात आपलेच पै-पाहुणे घुसवले अशी टीका केली होती. शिबिरामधील चर्चेचा ऊहापोह मी पूर्वीच्या वार्तापत्रात केला असल्याने त्या तपशिलात जात नाही. शिबिरात केलेली टीका लक्षात

घेऊन दादा आपल्या मंत्रिमंडळाची फेररचना करणार काय ? त्याना ते शक्य आहे काय, हा खरा प्रश्न आहे आरोपित मंत्र्याना वगळण्याचे स्वातंत्र्य दादाच्या हातात नाही ही वस्तुस्थिती आहे त्यामुळे कांग्रेसच्या दृष्टीने आगामी काळ फार कसोटीचा आहे असे मी मागील वार्तापत्रात म्हटले होते तेवढे सध्या पुरे आहे

¤

दादांची कसोटी लगेच सुरू झालीही आहे. शासनयंत्रणा व पक्षातील नाराजी यावर दादाची पकड बसलेली नाही. दोन महिन्याची कारकीर्द झाली नाही तोच दादांच्या विरोधी सुमारे पचवीस आमदाराची बैठक २ जून १९७७ रोजी भरली. शंकरराव चव्हाण याना मानणारा हा गट नाही तर त्याच्या विरोधात व दादाच्या बाजूने उभा ठाकलेला हा गट आहे. आता दादाच्या विरोधी काय भूमिका घ्यावयाची, भ्रष्ट मंत्र्याना वगळण्यास दादाना भाग पाडावयाचे की पक्षातून बाहेर पडून नवी काँग्रेस स्थापन करावयाची याचा विचार या गटाने सुरू केला आहे आज या गटाच्या हालचालीचे स्वरूप प्राथमिक आहे. म्हणूनच मी दादाच्या खुर्चीखाली सुरुग पेरण्याच्या कामाला सुरुवात झाली आहे असे म्हटले आहे. शिबिरात उमटलेल्या टीकेचे पडसाद हातात घेण्याचे या दादाविरोधी गटाने ठरवले आहे या मोहिमेला अधिक धार यावी, आपल्या गटाची सख्या मोठी होऊन दादावर आपला प्रभाव पडावा यासाठी दादाविरोधी नवा गट शकरराव चव्हाण गटाला आपल्याबरोबर घेण्याचा प्रयत्न करत आहे शकरराव पी के सावत यानी 'तुम्ही तुमचे पाहा. आम्ही एवढ्यात दाखल होत नाही ' असे या नव्या गटाला सागितले आहे नव्या गटामध्ये सर्वश्री बाबुराव कोतवाल,गोविंदराव आदिक, विलास लोणारी, रवीद्र मोरे, प्रतापराव भोसले, प्रभाकर कुटे आदीच्या नेहमीच्या कलाकाराचा पुढाकार आहेच. दादाच्या मंत्रिमंडळात भ्रष्ट मंत्री बरेच आहेत. काहीच्या बाबतीत लोकआयुक्तानी तसा अहवालही सरकारला दिला आहे भ्रष्टाचाराच्या कारणामुळे शकरराव चव्हाण यानी आपल्या मंत्रिमंडळातून दोघाना वगळण्याचे ठरवले होते, पण महाराष्ट्रातील नेत्यानी त्या वेळी शंकररावावर मोठा दबाव आणून या दोन मंत्र्याची गच्छती थाबवली होती. ते दोन मंत्री सध्याही मंत्रीच आहेत घर मागण्यासाठी गेलेल्या पूर्वाश्रमीच्या नटीला अँटी चेबरमध्ये नेऊन तिच्या खाद्यावर हात ठेवण्याचे प्रकारही घडलेले आहेत. या नटीनेच ही गोष्ट सागितली आहे. हे सर्व पाहता भ्रष्टाचारी मंत्र्याना काढून टाकण्याची नव्या गटाची मोहीम चागलीच म्हणावी लागेल, पण या मडळीनी वारवार आपला नेता बदलून नव्या नेत्याच्या पालख्या उचलल्या आहेत म्हणून कारण चागले असले तरी बंडखोरी करण्याच्या पावित्र्यात असलेल्याच्या हेतूविषयी शका निर्माण होते. या लोकाना मंत्री केले नाही म्हणून ते आज विरोधात जात आहेत असेच म्हणावे लागते. ज्या वेळी शंकररावाना हटवण्याची मोहीम चालू केली त्याच वेळी आज भ्रष्टाचारी म्हणून ज्याच्याकडे बोट दाखवले जाते ती मडळी या असतुष्टाचे नेतृत्व करत होती हे लोक भ्रष्टाचारी आहेत याचा साक्षात्कार नाराजाना आजच एकदम झाला आहे काय ? मंत्रिमडळात किती लोक भ्रष्ट आहेत हे पाहण्यासाठी वसतराव पाटील याचे उजवे हात असलेले पी बी पाटील याचे शिबिरातील भाषण आठवले पाहिजे. सध्याच्या मंत्रिमडळाच्या चेहऱ्या–मोहऱ्यामुळे काँग्रेसची ८–१० टक्के मते लोकसभा निवडणुकीपेक्षा कमी होतील असे पी बी. म्हणाले होते.

¤

दादाच्या मंत्रिमडळातील भ्रष्ट मंत्र्याविरुद्ध काँग्रेस आमदार जाहीरपणेही आवाज उठवू लागले आहेत मुबईमधील काँग्रेस आमदारानी भ्रष्टाचारी मंत्र्याना काढावे अशी केवळ मागणीच केली आहे असे नव्हे तर, भ्रष्टाचार-महामेरू असलेल्या एका मंत्र्याला तरी त्वरित काढावे, त्याला काढले नाही तर लोकमताचा दबाव आणणारा कार्यक्रम हातात घेऊन भ्रष्ट मंत्र्याना काढण्याचा प्रयत्न करण्याची घोषणाही त्यानी केली आहे भ्रष्ट मंत्र्याविरुद्धचा वणवा झझावाताने पेटल्यासारखा पेटत जाणार हे आता उघड आहे नेतृत्वबदलाचा प्रयत्न होत होता तेव्हा या लोकाच्या भ्रष्टपणाची माहिती असताना त्याना बरोबर घेण्यात आले होते आणि आताच त्याविरुद्ध आवाज उठवला जात आहे याची काही राजकीय कारणेही आहेत. भ्रष्टाचार हे निमित्त आहे वसतराव नाईक व दादा एकत्र आले आहेत. हे दोघे एकत्र येऊन नेतृत्व करू लागले तर, यशवतराव चव्हाण याच्या स्थानाला धक्का व धोका पोचण्याची भीती आहे. दादा नाईकगटाचा धोका निर्माण होऊ द्यावयाचा नसेल तर त्यानी निवडलेल्या मंत्र्याविरुद्ध मोहीम उघडून दादा-नाईक नेतृत्वाला वेळीच बदनाम करावयाचे व त्याचे स्थान कमी करावयाचे हा आतला डाव भ्रष्टाचारी मंत्र्याविरुद्धच्या मोहिमेत आहे. दादाच्या विरुद्ध जो नवा गट तयार झाला आहे, त्यातील सर्वजण यशवतराव चव्हाण यांना अनन्यसाधारण मानणारे आहेत हे लक्षात घेतले पाहिजे त्यातच मंत्रीपद मिळाले नाही म्हणून नाराज झालेलेही आहेत.

**गेली अकरा वर्षे यशवंतराव चव्हाण व वसंतराव नाईक यांच्यात असलेला करार संपुष्टात आला आहे. महाराष्ट्र काँग्रेसचे नेतृत्व कोणाकडे असावे, यशवंतराव चव्हाण यांच्याकडे की वसतराव नाईक यांच्याकडे हा संघर्ष तीव्र होऊ लागला असून, वसंतराव नाईक महाराष्ट्रात आपले नेतृत्व प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नाला जोराने लागले आहेत' असे 'इकॉनॉमिक अँड पोलिटिकल विकली' या इंग्रजी साप्ताहिकाने २१ मे १९७७ च्या अंकात म्हटले आहे. 'माणूस'मधील लेखातून मी या प्रयत्नाचा उल्लेख १३ एप्रिल १९७४ पासून करत आहे. 'महाराष्ट्र काँग्रेसमधील असतोष हा मुख्य मंत्रीपदी नाईकच राहावेत वा ते त्या पदावरून जाऊन आपल्या गळ्यात मुख्य मंत्रीपदाची माळ पडावी या मर्यादित राजकारणापुरता राहिलेला नाही. या निमित्ताने महाराष्ट्राचे नेतृत्व यापुढे कोणाकडे ? यशवतराव चव्हाण की वसंतराव नाईक यांच्याकडे ? या वादाची बीजे पेरली जात आहेत' असे मी १३ एप्रिल १९७४**

**त्या अंकात म्हटले होते. वसंतराव नाईक यांचे यशवंतराव चव्हाण यांना हे आव्हान उभे राहिले आहे असे मी या लेखात म्हटले होते**

**दादांच्या मंत्रिमंडळातील भ्रष्ट मंत्र्यांविरुद्ध महाराष्ट्रातील काँग्रेस आमदार का आवाज उठवीत आहेत त्याचे प्रमुख कारण दादा-नाईक-गटाला प्रभावी होऊ द्यावयाचे नाही हे आहे. ज्या इच्छुकांना मंत्रिमंडळात घेतले नाही अशांची नाराजी हे आणखी एक कारण आहे एवढेच.**

¤

आता मुंबई काँग्रेसचे आमदार भ्रष्टाचारी मंत्र्यांचा प्रश्न घेऊन उभे राहिले आहेत त्यामागचे कारण आणखी वेगळेच आहे. २९ ऑक्टोबर १९७६ रोजी संजय गांधी महाराष्ट्राच्या दौऱ्यावर असताना त्यांनी औरंगाबाद येथे महाराष्ट्र-मुंबई काँग्रेसच्या विलिनीकरणाची कल्पना शंकरराव चव्हाण यांच्यापुढे मांडली. संजय गांधींचे त्या वेळी जे स्थान होते त्यामुळे यशवंतराव चव्हाण, शंकरराव चव्हाण आदी सर्व नेते संजयच्या या कल्पनेपुढे वाकले आणि त्यांनी विलिनीकरणाला मान्यता दिली. त्यानंतर लगेच विलिनीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. मुंबई काँग्रेसमधील बऱ्याच जणांचा विलिनीकरणाला विरोध होता, पण त्याविरुद्ध आवाज उठवण्याची त्या वेळी त्यांची हिंमत नव्हती. आता भ्रष्टाचाराचे निमित्त करून दादा मंत्रिमंडळाविरुद्ध वातावरण तयार करावयाचे आणि विलिनीकरणवादी वसंतराव पाटील यांचे नेतृत्व बदनाम करून विलिनीकरणाचा प्रयत्न हाणून पाडावयाचा हाही एक हेतू मुंबई काँग्रेस आमदारांच्या उठावामागे आहे. के. के शहा यांनी विलिनीकरणविरोधी भूमिका घेतली आहे. विलिनीकरण झालेच, तर के. के. शहा मुंबईत स्वतंत्र काँग्रेस निर्माण करणार आहेत. त्यासाठी त्यांनी स. का. पाटील यांची मदत घेण्याचे ठरवले आहे स. का. पाटील जनता पक्षावर नाराज आहेत. त्यांना काँग्रेसचे पुनरुज्जीवन व्हावे असे वाटते मुंबई व महाराष्ट्र काँग्रेसचे विलिनीकरण झाले तर के. के. शहा; स. का. पाटील, संघ. काँग्रेसची जुनी मंडळी व काँग्रेसमधील काहीजण मिळून नवी काँग्रेस स्थापणार आहेत. या काँग्रेसला जागा मिळावी म्हणूनच स. का. पाटील यांनी पूर्वीच्या काँग्रेस हाउसमधील जनता पक्षाचे कार्यालय हलवून टाकले आहे. स. का. पाटील यांना पूर्वीच्या संघ काँग्रेस व काँग्रेस यांचे एकीकरण व्हावे असे वाटत असून तसा त्यांचा प्रयत्नही सुरू आहे. महाराष्ट्रात काँग्रेसमधून बाहेर पडणारे नवा पक्ष स्थापन करण्याचा प्रयत्न करीत आहेत तर मुंबईत काँग्रेसचे पुनरुज्जीवन करण्यासाठी जुन्या मंडळीचे प्रयत्न सुरू आहेत.

¤

काँग्रेसजन भ्रष्टाचारी मंत्र्यांविरुद्ध तोफा डागत आहेत त्याच वेळी राज्यपाल सादिक अली व मुख्य मंत्री वसंतराव पाटील यांच्यामध्ये २८ मे १९७७ रोजी बरोबर सव्वा तास अत्यंत गुप्तता राखून वाटाघाटी झाल्या त्या वेळी फक्त दोघेजणच हजर असल्याने ही चर्चा कशासंबंधी झाली हे बाहेर कळणे अवघड आहे. दादांना या चर्चेबाबत विचारले तेव्हा त्यांनी 'आमची सव्वा तास चर्चा झाली' एवढेच सांगितले ही चर्चा कशासंबंधी झाली याविषयी जी कुजबूज ऐकायला मिळाली ती अशी . काँग्रेसजनांनीच महाराष्ट्र काँग्रेसच्या शिबिरात मंत्र्यांच्या भ्रष्टाचाराबाबत आरोप केले त्यानंतर केंद्रीय गृहमंत्री चरणसिंग यांनी महाराष्ट्र सरकारला पत्र पाठवून सहा मंत्र्यांच्या भ्रष्टाचाराबाबत विचारणा केली आहे यासंबंधी मुख्य मंत्री पाटील यांनी राज्यपाल सादिक अली यांच्याशी चर्चा केली अशी ही कुजबुज आहे. चरणसिंग यांचे खरोखरीच पत्र आले आहे, की भ्रष्टाचारविरोधी मोहीम उघडू पाहात असलेल्या काँग्रेसजनांनी सोडलेली ही वावडी आहे, हे कळण्यास थोडा कालावधी लागेल. परंतु चरणसिंग यांचे पत्र आले असण्याची शक्यता अधिक आहे. दादा–सादिक यांचे सख्यही वाढत आहे. वसंतराव नाईकांचे नेतृत्व महाराष्ट्रात प्रस्थापित होऊ द्यावयाचे नाही म्हणून भ्रष्टाचारविरोधी मोहीम महाराष्ट्रात काँग्रेस आमदार तीव्र करतीलही, पण हे करत असताना केंद्र सरकारला महाराष्ट्रात हस्तक्षेप करण्याची संधी निर्माण करून दिली जात आहे हे काँग्रेस आमदारांच्या लक्षात आलेले दिसत नाही. काँग्रेस आमदारांनीच भ्रष्टाचाराच्या विरोधी आवाज उठवल्यानंतर कर्नाटकप्रमाणे महाराष्ट्रातही मंत्र्यांच्या भ्रष्टाचारप्रकरणी केंद्र सरकार चौकशीमंडळ नेमणारच नाही असे कसे म्हणता येईल ? काँग्रेस आमदारांनाच एवढा भ्रष्टाचार जाणवत असेल तर प्रत्यक्षात तो केवढा असेल ? .

¤

भ्रष्टाचाराविरुद्ध जोराची मोहीम सुरू झाली आणि आपल्याच आसनाला धोका निर्माण होत आहे अशी स्थिती उत्पन्न झाली की, मंत्रिमंडळातील वसंतराव नाईक यांच्या माणसांना काढून टाकण्याचा पवित्रा दादा घेणार की नाइकांबरोबरचे सख्य कायम ठेवणार, हा यानंतरचा प्रश्न आहे. आपली पकड कायम ठेवण्यासाठी दादा बदनाम मंत्र्यांना काढून आपल्या विरुद्धची मोहीम परतवून लावण्याचा प्रयत्न करतील, ही शक्यता अधिक वाटते वसंतराव नाइकांचा आजार लक्षात घेता दादा यशवंतराव चव्हाण यांच्या विरोधात एकाकी लढत देण्याऐवजी बदनाम मंत्र्यांना काढून जमवून घेता येईल तेवढे जमवून घेण्याचा प्रयत्न करतील. दादांचे विरोधक, दादा व जनता पक्षातील नेते यांचे संबंध सलोख्याचे आहेत असेही बोलत आहेत. इतकेच नव्हे तर केंद्र सरकारला महाराष्ट्रात हस्तक्षेप करता यावा यातही भ्रष्टाचाराविरुद्धची मोहीम दादांच्या प्रेरणेने तीव्र केली जात आहे असाही आरोप दादांचे विरोधक करीत आहेत.

¤

आज काँग्रेस आमदार भ्रष्टाचाराचा प्रश्न हातात घेऊन पक्षांतर्गत राजकारण खेळू लागले आहेत. येत्या काही महिन्यात महाराष्ट्रामध्ये विधानसभेच्या निवडणुका होतील तेव्हा विरोधी पक्ष काँग्रेस आमदारांनी तयार केलेल्या या वातावरणाचा फायदा उठविल्याशिवाय राहणार नाहीत. काँग्रेस पक्ष सध्या कचाट्यात सापडला आहे. काँग्रेसजनांनी काहीही केले तरी पक्षच त्यामुळे अडचणीत येत आहे शंकररावांमुळे कार्यकर्ते दुखावले म्हणून त्यांना बाजूला केले, पण या प्रक्रियेत शंकरराव चव्हाण व त्यांचा गट यशवंतरावाविरुद्ध शड्डू ठोकूनच उभा

राहिला. दादांच्या विरुद्ध यशवंतराव मोहिते याना त्या गटाने नेतानिवडीच्या वेळी उभे केले. शिवाय हा गट पक्षात राहणार की बाहेर जाणार, याची टांगती तलवार कायम आहेच. शंकरराव गट बाहेर पडला की, पक्षाची शक्ती काही प्रमाणात खच्ची होणार आणि बाहेर न पडता पक्षात राहिला तर तीही पक्षाला कायमची डोकेदुखी होणार. दादाना नेतेपदी आणले ते पक्ष सावरण्याकरिता! दादानी वसतराव नाइकाच्या कच्छपी जाऊन नाइकाचे मत्रिमडळ बनवले व यशवतराव चव्हाण याच्या माणसाना बाजूला सारले. दादा–नाईक–गटाने यशवंतराव चव्हाण याच्याविरुद्ध कबर कसली दादा–नाईक–गटाचे वर्चस्व सपुष्टात आणण्यासाठी भ्रष्टाचाराचे हत्यार उपसले; पण ते हत्यारच दुधारी असल्याने दादा–नाईक–गटाविरुद्ध ते वापरले जात असताना महाराष्ट्र कॉंग्रेसलाही ते रक्तबंबाळ करू लागले. त्यामुळे काहीही करा, महाराष्ट्र कॉंग्रेस पुन. पहिल्यासारखी होण्याची लक्षणे दिसत नाहीत. पेटलेल्या मेणबत्तीचे मेण वितळत जावे त्याप्रमाणे महाराष्ट्र कॉंग्रेसची इभ्रत व ताकद वितळत आहे. विरोधी पक्ष निवडणुकीत याचा फायदा घेईल, यात सशय नाही. देशातील बदलती परिस्थिती, एक गट कॉंग्रेसमधून बाहेर पडण्याची शक्यता, अतर्गत कलहाने दुभगलेली प्रदेश कॉंग्रेस यामुळे महाराष्ट्रात जनता–शे. का. पक्ष याचे सयुक्त सरकार आगामी निवडणुकीनतर आले तर आश्चर्य वाटायला नको.

¤

वसतराव पाटील याच्या विरोधी आमदार जाऊ लागले आहेत, त्याचे एक चित्र ३१ मे १९७७ रोजी मत्रालयाच्या सहाव्या मजल्यावर चागलेच पाहावयास मिळाले. महाराष्ट्र कॉंग्रेसचे सरचिटणीस गोविंदराव आदिक शिष्टमडळ घेऊन आले त्याना मुख्य मंत्र्याना भेटावयाचे होते. भेटीची वेळही आधी ठरली होती; पण बराच उशीर झाला तरी त्याना भेट मिळाली नाही. तेव्हा जोधळ्याची लाही तडतड करीत फुटते त्याप्रमाणे गोविंदराव आदिक फुटत होते. 'ही काय राज्यकारभाराची पद्धत झाली? याच पद्धतीने लोकाना भेटायचे असेल तर आधी वेळा कशाला ठरवायच्या?' वगैरे वगैरे. आदिक छन्न मार्गातच ओरडत होते. वातावरण तयार करण्यासाठी अशा चित्राचाही खूप उपयोग होत असतो.

¤

वसतराव पाटील याच्या खुर्चीखाली अशा रीतीने सुरुग पेरण्याचे काम सुरू झाले आहे. आमदाराचा दबाव वाढल्यामुळे भ्रष्ट मत्र्याना काढले तर निवडणुकीच्या तोडावर विरोधकाच्या हातात जबरदस्त कोलीत मिळणार आहे आणि आमदारानी कितीही ओरड केली तरी भ्रष्ट मत्र्याना काढले नाही तर पक्षाची इभ्रत चव्हाट्यावर येतेच आहे शिवाय केद्र सरकारला हस्तक्षेप करण्यास सधी मिळणार आहे दादाच्या मत्रिमडळातील नाइकाचे मत्री काढले तर त्या लोकाचा गट यशवतराव चव्हाण याच्या गटाविरुद्ध कारवाया करणार. यशवतराव चव्हाणानी तत्त्वाचे राजकारण कॉंग्रेसजनाना कधी शिकवले नाही, त्याची ही सर्व परिणती आहे गटबाजीचे राजकारणच ते करीत आले प्रत्यक जिल्ह्यात दोन गट झुजवत ठेवून आपले नेतृत्व प्रस्थापित करण्याची नीती त्यानी अवलबिली. काही काळ ती यशस्वी ठरली. आता त्याच्यावरच ती उलटली आहे. सध्या महाराष्ट्र कॉंग्रेसमध्ये गट तरी किती? शकरराव चव्हाण, यशवतराव चव्हाण, दादा–नाईक असे प्रमुख तीन गट निर्माण झाले आहेत उपगटाची सख्या जवळपास तेवढीच होईल. हे सर्व गट विरोधी पक्षापेक्षा पक्षातील गटाला अधिक पाण्यात पाहात असतात, हे आणखी एक विशेष!

¤

कॉंग्रेसमधील गटबाजीच्या राजकारणाला विधानपरिषदेच्या निवडणुकीच्या वेळी उधाण येईल. विशेषत. विधानसभा मतदारसंघातून परिषदेवर पाठवावयाच्या एका जागेच्या वेळी मारामाऱ्या होण्याची शक्यता फार आहे. विधानसभा मतदारसघातून आदिवासी कल्याणमत्री नाशिकराव तिरपुडे परिषदेची निवडणूक लढवणार आहेत. मुबईतील कॉंग्रेस आमदारापासून महाराष्ट्रातील आमदारातील मोठ्या गटाचा तिरपुडे याना विरोध आहे. पक्षशिस्त मानून हे आमदार तिरपुडे याना मतदान करणार की बडखोरी करणार हे लौकरच दिसेल या निवडणुकीच्या निमित्ताने कॉंग्रेसमध्ये फाटाफूट होइल असे दिसते. कॉंग्रेसला बहुमत राहणार नाही एवढी फाटाफूट होईल असे काहीजण बोलत आहेत जुलैमधील विधानसभा-अधिवेशनकाळात कॉंग्रेसचे बहुमत घटले आणि विधानसभा अधिवेशनानतर ऑगस्ट–सप्टेंबरपर्यंत महाराष्ट्रात राष्ट्रपतीची राजवट येऊन ऑक्टोबरमध्ये नव्या निवडणुका होतील असे आजचे महाराष्ट्रातील वातावरण आहे.

¤

महाराष्ट्रात जनता–शे. का. प सयुक्त सरकार येण्यास अडचण येणार नाही असे शे. का पक्षाचे कृष्णराव धुळप माझ्याशी बोलताना म्हणाले. तसे झाले तर धुळप महाराष्ट्राचे मुख्य मंत्री होण्याची शक्यता नाकारता येणार नाही तो त्याचा हेतू असल्यामुळेच राज्यसभेची मुदत असूनही धुळप विधानसभेची निवडणूक लढवणार आहेत. कॉंग्रेसवाले आपापसात लढत बसले तर आज अशक्य वाटणारी संयुक्त सरकारची कल्पना शक्य होऊनही जाईल ☐

---

२९ मे १९७७

प्रति,

श्री. सपादक, साप्ताहिक 'माणूस' याना,

'शहादे चळवळ : पुढील टप्पा' या शीर्षकाखाली दिनाक २८ मे १९७७ च्या 'माणूस' च्या अकात शेवटच्या पानावर एक पत्रक आपण प्रसिद्ध केले आहे. या पत्रकामध्ये माझे नाव टाकण्यात आले आहे. मी शहादा भागातील श्रमिकांच्या चळवळीत बरेच वर्षे भाग घेत आहे. आपण छापलेल्या पत्रकात माझे नाव ज्यानी छापण्यास दिले असेल त्यानी ते मला न विचारता दिले आहे.

ज्या 'पाणीपुरवठा परिषदे' साठी हे पत्रक काढले आहे त्या मागणीला माझा विरोध नाही.

कृपया वरील खुलासा प्रसिद्ध करावा.

आपली

**भुरीबाई भ्र. मानसींग**

मुक्काम दिल्ली

# युवाशक्ती काँग्रेसला पूर्णपणे प्रतिकूल

प्रा. प्रवीण सप्तर्षी

अमृतसर एक्स्प्रेस नव्या दिल्लीला पोचण्यापूर्वी अगोदरच्या ३–४ उपनगरी स्टेशनावर थांबत जाते. हजरत निजामुद्दीन स्टेशनपासूनच नवी दिल्लीतील वैशिष्टये दिसू लागतात. पार्लमेंटची बिल्डिंग आणि त्यापासून निघालेले लांब–रुंद व एका दोरीत आखलेले रस्ते दिसू लागतात त्यावर फिरणाऱ्या देशी-विदेशी गाड्या आणि उंच उंच इमारतीच्या खिडक्यातून डोकावणारे एअर कूलर्स दिल्लीचं वैभव जाणवून देतात दिल्लीमध्ये तपमान जसे अगदी टोकाला जाऊन चढते तसेच थंडीही अतिशय तीव्र असते. राजकारणामध्येसुद्धा असे टोकाचे बदल होऊन सत्ताधाऱ्यांचे झोके इकडून तिकडे फिरतानाची साक्षही दिल्लीकर देतात. लोकसभा निवडणुकीच्या वेळी जनतेचा सहभाग अगदी पराकोटीला पोचला होता, परंतु आज मात्र राजकीय वातावरण निवडणुका जवळ येऊनही म्हणावे तेवढे तापलेले दिसत नाही त्याचे नेमके कारण काय, याचा शोध घेणे आवश्यक आहे.

लोकसभा निवडणुकामध्ये जनतेतील सर्व थरातील लोकांचा सहभाग होता. या उत्स्फूर्त पाठिंब्यामुळेच कॉंग्रेस अक्षरश: दिल्लीत उखडली गेली. अनेक पक्ष एकत्र आल्यावर जनमानसात धीर आला. त्या धीरापोटीच लोकशाहीवर होणाऱ्या आघाताकडे बघ्याची भूमिका घेणारे दिल्लीकर क्रियाशील झाले होते; परंतु ती क्रियाशीलता टिकवून धरण्याइतपत दिल्लीमध्ये उत्साहाचे वातावरण आज उरले नाही. जनता पक्षामध्ये तिकिट-वाटपाच्या प्रश्नावरून जो वाद निर्माण झाला त्याचा हा परिणाम आहे, असे अनेकांचे मत आहे. महाराष्ट्रातही बऱ्याच जणाचा असा समज निर्माण झालेला आहे जनता पक्षाची नेतेमंडळी अर्थातच याचा इन्कार करतात. तरी पण अतिशय गोंधळ होता गर्दी इतकी उसळली की, आम्हाला निर्णय घेण्यास फारच थोडा अवधी मिळाला. एवढ्या थोड्या वेळात आमच्याजवळ अधिकारवाणीने सांगता येईल, अशी माहिती उपलब्ध नव्हती अशा तऱ्हेने जनता पक्षात कबुलीचा सूर थोडा दिसून येत आहे. तरी पण प्रश्न अजून मिटलेला नाही. चंद्रशेखर, मोरारजी देसाई यांच्या हरियाना–उत्तर प्रदेश दौऱ्यात तरुणाकडून जे अडवणुकीचे प्रश्न त्यांना विचारले गेले यावरून हे स्पष्ट झालेच आहे.

दिल्लीपुरता विचार करायचा झाल्यास येथे दोन निवडणुका आहेत. एक 'उपरवाली' आणि दुसरी 'नीचेवाली.' उपरवाली म्हणजे 'दिल्ली मेट्रोपोलिटन कौन्सिल' आणि नीचेवाली म्हणजे 'दिल्ली म्युनिसिपल कॉर्पोरेशन.' 'उपरवाली'साठी ५६ जागा असून 'नीचेवाली'साठी १०० जागा आहेत. या दोन्ही जागांना मिळून सुमारे २०० 'जनता बंडखोर' उमेदवार आहेत जनता पक्षाच्या विरुद्ध उभ्या राहणाऱ्या अपक्ष उमेदवारांना निवडून आले तरी कदापीही पक्षात घेतले जाणार नाही, अशी ठाम भूमिका येथील नेतेमंडळी भाषणातून सांगत आहेत. त्याचा परिणाम म्हणून काही लोक उमेदवारी मागे घेत आहेत आतापर्यंत जनता–बंडखोरांपैकी सुमारे ७० ते ८० टक्के उमेदवारानी आपली उमेदवारी मागे घेतली आहे; परंतु उमेदवारी मागे घेण्याची तारीख केव्हाच उलटून गेली असल्याने मतपत्रिकावर त्यांची नावे असतील तेव्हा प्रत्यक्षात उमेदवारी मागे घेतली गेली तरी ती कागदोपत्री मागे घेता आलेली नाही म्हणूनच ही मंडळी आपली एकनिष्ठा प्रगट करण्यासाठी प्रचाराचे काम जास्त ठळकपणे करीत आहेत. निर्दलीय किंवा बंडखोर उमेदवाराचे महत्त्व बरेचसे कमी झालेले आहे. बहुतेक युवक संघटनानीसुद्धा जनता पक्षाच्या अधिकृत उमेदवारांना पाठिंबा दिलेला असल्याने दिल्लीमधील तिकिट-वाटपाचा प्रश्न जनता पक्षाच्या दृष्टीने सुटलेला आहे, असे म्हणावे लागेल

## युवकांचा पाठिंबा

दिल्लीमधील विद्यार्थिवर्गास फार महत्त्व आहे. विशेषत नेहरू विश्वविद्यालयामध्ये विद्यार्थिवर्ग राजकीय दृष्टया जागृत आहे गेल्या लोकसभा–निवडणुका आणि त्यापूर्वीचा आणीबाणीचा काळ यात याच विद्यापीठातील विद्यार्थी क्रियाशील होते. पूर्वीची समाजवादी युवजनसभा आणि इतर संघटना एकत्र येऊन 'युवा-जनता' ही जनतापार्टीची यूथ–विंग म्हणून स्थापन झाली 'अ. भा. वि प'ने मात्र आपले अस्तित्व वेगळे ठेवलेले आहे त्यांच्या मते त्यांची संघटना 'राजकीय' नाही, म्हणून राजकीय पक्षाची ती यूथ–विंग होऊ शकत नाही तरी पण 'अ. भा. वि प'ने जनता पक्षाच्या अधिकृत उमेदवारानाच पाठिंबा दिलेला आहे. आज तरी 'अ. भा वि. प' आणि 'युवा–जनता' यांची नेतेमंडळी खांद्याला खांदा लावून जनता पक्षाचे काम करीत आहेत. पूर्वीच्या जनसंघाची एक यूथ–विंग होती जनसंघ जनता पक्षात विलीन झाल्यावर 'जनसंघ युवक आघाडी'चे नाव बदलले व 'जनता युवा मोर्चा' हे नवे नाव त्यांनी धारण केले. 'जनता युवा मोर्चा' 'युवा जनता'मध्ये का सामील होऊ शकला नाही, याची समाधानकारक उत्तरे त्यांचे नेते देऊ शकत नाहीत. तथापी याही युवकसंघटनेचा आतून व बाहेरून जनता पक्षासच पाठिंबा आहे. दोन–तीन उमेदवाराच्या निवडीबाबत मात्र युवकमानस नाराज आहे असे दिसते. चांदणीचौक मतदारसंघास लागून असलेल्या मिन्टो-रोड मतदारसंघात त्यामुळे तिहेरी सामना महत्त्वाचा ठरलेला आहे पूर्वीच्या जनसंघाचे कौन्सिलर श्री दलजितकुमार टंडन आता अपक्ष म्हणून उभे आहेत युवकांचा त्यानाच पाठिंबा आहे. जनता युवा मोर्चाने त्याना अधिकृत पाठिंबा जाहीर केलेला आहे. 'युवा–जनता'चा कार्यकर्ता सुधीर गोयल यास विचारले असता तो अत्यंत त्वेषाने अधिकृत उमेदवाराबद्दल सांगू लागला, 'माझा व्यक्तिगत पाठिंबा तरी टंडनलाच आहे. कारण जनता पक्षाचा अधिकृत उमेद-

वार अॅड. विरेश प्रताप सिंह याने मला व अरुण जेठलीला (अ भा. वि. प. चा अध्यक्ष) नेहरू विद्यापीठात प्रवेश न देण्यासाठी वकिली केली. आणीबाणीच्या काळात विद्यार्थ्यांकडून जे काही रिट पिटिशन दाखल करण्यात आले त्यात हा विद्यार्थ्यांच्याविरुद्ध व विद्यापीठाच्या बाजूने उभा होता शिवाय त्याचे वडील अॅड. देसराज चौधरी आणीबाणीचे समर्थक व दिल्ली मेट्रोपोलिटन कौन्सिलचे डे मेयर बनले होते.' त्यावर मी विचारले, 'जनता पक्षाचे व 'युवा जनते'चे नेते तर अधिकृत उमेदवार म्हणून त्यालाच पाठिंबा देणार तेव्हा तुला असा विरोध करून कसे चालेल ?' तो म्हणाला, 'We are not slaves of Chandrashekhar or leaders of 'Yuva Janata'.' नंतर शांत होऊन म्हणाला, 'आम्ही आमच्या नेत्याच्या अडचणी समजू शकतो. तरीसुद्धा फार थोड्या, अगदी अपवादात्मक रीत्या काही जागांच्या बाबतीत ते चुकले. त्यांच्या चुका आम्ही दुरुस्त करीत आहोत.'

तर एकंदरीत बहुतेक सर्व जनतापार्टीच्या उमेदवारांच्या पाठीशी युवा-जनता, जनता युवक मोर्चा व अ. भा. वि. प. या युवकसंघटना आहेत. ही एक महत्त्वाची 'शक्ती' म्हणून मान्य केलीच पाहिजे. कॉंग्रेसच्या बाबतीत युवकशक्तीचा पाठिंबा फारच कमी आहे 'युवक-काग्रेस'खेरीज त्यांना कोणाचा पाठिंबा नाही. युवक-कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये आपल्या नेत्याच्या चुकाबद्दल असलेली अपराधीपणाची जाणीव पूर्णपणे गेलेली नाही. त्यांचा पवित्रा थोडा सरक्षणात्मकच आहे युवाशक्तीचा कौल या निवडणुकीमध्ये दिल्लीत महत्त्वाचा ठरणार आहे. १२ तारखेस होणाऱ्या निवडणुकांच्या प्रचाराची खरी सुरुवात १ तारखेला होऊनही निवडणुकामध्ये शेवटच्या निर्णायक दिवसामध्ये युवाशक्तीच रंग भरू शकेल असे वाटते.

## सर्वसामान्य माणसाची उदासीनता

लोकसभा निवडणुकाच्या वेळची दिल्ली आणि आत्ताच्या निवडणुकाच्या मोसमातली दिल्ली यात फार फरक दिसून येतो 'लोकशाही की गुलामगिरी' या घोषणेने खवळून उठलेला माणूस या निवडणुकामध्ये उदासीन झालेला आहे. खरे म्हणजे या निवडणुका स्थानिक पातळीवर आहेत. त्यामुळे राष्ट्रीय प्रश्नापेक्षा स्थानिक प्रश्न महत्त्वाचे झालेले आहेत म्हणूनच निवडणुकाची धामधूम गल्लीगल्लीतून दिसायला हवी, परतु चादणीचौक या कौन्सिल विभागातील काही भागाचा अपवाद सोडला तर सबंध दिल्लीभर निवडणुकीची धामधूम फारशी दिसत नाही. भित्तिपत्रकाचे युद्ध, निशाणाची गर्दी, रस्त्यारस्त्यातून फिरणारे लाऊड स्पीकर्स, सभा, मोर्चे याचे प्रमाण अगदी कमी आहे त्याची कारणमीमासा करणे आवश्यक आहे

या उदासीनतेचे एक कारण म्हणजे गेल्या लोकसभेच्या निवडणुका *या निवडणुकाचा हॅंगओव्हर अजून पूर्णांशाने गेलेला नाही.* त्यामुळे लोकसभा-निवडणुकामध्ये रस घेणारे लोक आता थोडेसे सुस्तावल्यासारखे दिसतात लोकसभेच्या निवडणुकामधील घोषणाच अजून भिंतीवर दिसतात कॉंग्रेसच्या बूथमध्ये तर इंदिरा गांधीचे चित्र असलेली पोस्टर्स आजही नव्याने लावलेली दिसतात. लोकसभा-निवडणुकानंतर लगेच या निवडणुका घेतल्यामुळे मेट्रोपोलिटन कौन्सिलच्या निवडणुकाही अजून त्या प्रभावाखाली दबलेल्या आहेत. त्यामुळे उमेदवाराना व नेत्याना सध्याच्या निवडणुका महत्त्वाच्या वाटत *असल्या तरी सर्वसामान्याना तो जीवनमरणाचा प्रश्न वाटत नाही.*

दिल्लीतले वाढलेले तपमानही या उदासीनतेत भर टाकीत आहे तीव्र उन्हाळ्यामुळे सकाळी १०॥ ते साय. ५ पर्यंत रस्त्यावर स्कूटर्स (दिल्लीत रिक्षाना स्कूटर म्हणतात) फिरणेही शक्य होत नाही. **लोकसभा-निवडणुकांचे वेळी जो सुशिक्षित व श्रीमंतवर्ग कॉंग्रेसच्या** विरुद्ध ठाकलेला होता तो सध्या उन्हाळ्यामुळे थोडासा बाजूला राहिलेला आहे त्यातील अनेकजण थंड हवा खाण्यासाठी बाहेरगावी आहेत तर येथे असलेल्यापैकी बरेचसे उन्हाळ्याच्या भीतीने बाहेर पडत नाहीत. रस्त्यावर येऊन वातावरण तापविण्यास मदत करणारे असे *किती तरी लोक तापलेल्या रस्त्याच्या भीतीने निवडणुकाच्या रिंगणात* उतरलेले नाहीत एका एल्. आय. सी. वर्करला याबाबतीत विचारले असता तो म्हणाला, 'वे लोग तो हिलस्टेशन जा बैठे। मालूम नहीं बारह तारीख को आयेंगे या नहीं।'

सरकार बदलले. आणीबाणीच्या अत्याचाराची हद्द झाली तेव्हा निराश झालेले सर्वसामान्य लोक गेल्या निवडणुकामध्ये सामील झाले. जनतापक्ष निवडून आला. या सर्व वेगवान घटनांमुळे देशात प्रथमच राजकीय वातावरणाची प्रक्रिया दिसून येत होती. त्यामुळे *समाजातील अनेक थरातून आशा-आकांक्षा फुलविल्या गेल्या.* त्या कदाचित अवास्तवही असतील; पण त्याची पूर्ती होत नसल्यामुळे लोक अस्वस्थ बनले आहेत. एक प्रकारचे नैराश्य त्याच्यात दिसून येत आहे कॅनॉट प्लेसमधील एका दुकानदाराचे बोलणे फार सूचक आहे. तो म्हणाला, 'जनता मंत्रीको हमे देखनेकी फुरसतही नही मिलती। कॉंग्रेस तो बुरी थी, लेकिन इन्होने ऐसा *क्या किया है* की जिसकी वजहसे हम, उनके हाथ बढाये।' श्रीमत दुकानदाराबरोबरच स्टेशनवरचे हमालही आपली असहायता प्रगट करतात 'कोणाचे का सरकार येईना आम्हाला वॅगाच उचलाव्या लागणार!' यावरून एक तर दिल्लीतला माणूस मोठमोठ्या राजकीय घटनाचा जवळचा साक्षीदार असल्यामुळे अतिशिष्ट तरी बनलेला असावा किंवा दुसरे म्हणजे गेल्या निवडणुकीत सुरू झालेली राजकीयीकरणाची प्रक्रिया सपून उदासीनतेची प्रक्रिया सुरू होत आहे माझ्या मते दोन्ही कारणे *बरोबर असली तरी दुसरे कारण जास्त* महत्त्वाचे आहे. दिल्लीच्या उपनगरात किंवा आसपासच्या खेड्यातही सर्वसामान्य माणसाची हीच प्रक्रिया दिसते 'अब वो हमारी दाढी पकडते है लेकिन बादमे हमे उनके पाव पकडने लगते है।' जनतापक्षाच्या सरकारने दोन महिन्यात जादूची कांडी फिरवायला पाहिजे होती का? असे विचारल्यावर मात्र एक फेरीवाला म्हणाला, 'कमसे कम हमारे जैसे झगडे तो नही करना चाहिए।'

अर्थात जागावाटपावरून झालेल्या वादाचा अत दिल्लीपुरता तरी झालेला आहे सुमारे २०० जनता बंडखोरांपैकी १५० बंडखोरानी आपली उमेदवारी मागे घेऊन अधिकृत उमेदवाराचे काम सुरू केलेले आहे. कॉंग्रेस बंडखोरही फारसे त्रासदायक ठरणार नाहीत *'सतनगर' या भागातून कॉंग्रेस बंडखोरानी निवडणुक*-चिन्हावरून कोर्टातून स्टे आणण्याचा प्रयत्न केला. तो अयशस्वी झाल्यावर इतर ठिकाणच्या बंडखोरानीही कोर्टाची धमकी देणे सोडून दिले आहे, तरी सुद्धा उमेदवाराची वाढती संख्या हा एक महत्त्वाचा मुद्दा उदासीनतेत भर टाकीत आहे. 'सतनगर' या राखीव कॉर्पोरेशन मतदारसघातून एकूण १६ उमेदवाराची नावे पत्रिकेवर छापली जातील. जनता पक्षाचे तिकिट नाकारलेला एक दलित उमेदवार म्हणाला, 'अरे भाई, मैं तो जनताकाही आदमी हूँ। लेकिन हमने जब चद्रशेखरको पूछा हम क्या करे, तो उन्होने बताया सबके सब अर्जी भर दो, बादमे वापस लेलो।' आणि यामुळे 'मैं भी कुछ कम नही,' या न्यायाने अनेकानी अर्ज भरलेले आहेत तेव्हा कॉंग्रेस काय, जनतापक्ष काय, त्याच्यातील बंडखोर फारसे प्रभावी नसून जवळजवळ सर्व ठिकाणी दुरंगी सामनाच दिसतो.

## 'उपरवाली' व 'नीचेवाली'चे भिन्न प्रश्न

उदासीन वातावरणातसुद्धा काही प्रश्न या निवडणुकाच्या काळात व येऊ लागलेले आहेत, दिल्ली मेट्रोपोलिटन कौन्सिल व दिल्ली

पृष्ठ ३१ वर

# अवती-भवती

शरद कृष्णन्

## □ निवडणुका- जनतापक्ष आणि जनता-

घाईगर्दीने विधानसभा विसर्जित केल्या...आणि विविध राज्यांच्या २, ३०५ उमेदवाराची निवड करताना इतकी तारांबळ उडाली की, मतदानाचा दिवस येऊन ठेपला तरी जनता पक्षाचा अधिकृत उमेदवार कोण याचा पत्ता जनतेला लागणे मुष्किल होऊन बसले. लोकसभेच्या निवडणुकामध्ये जे अभूतपूर्व यश मिळाले त्यामुळे दिल्लीचे सत्ताधारी इतके तांठून बसले को, डाव्या कम्युनिस्टाच्या दोस्तीची गरजच राहिली नाही. तामिळनाडूमध्ये डी. एम्. के. बरोबर केलेली दोस्ती इतकी महागात पडली होती की – त्या दोस्तीला रामराम ठोकणे अपरिहार्य होते. जनता पक्षाचे पहिले तेज ओसरले, अतर्गत लाथाळघा, घटक पक्षाचो अधिक जागा पदरात पाडून घेण्यासाठी चाललेली धडपड, चरणसिगाचे गिरीक्षकपदाच्या राजीनाम्याचे नाटक,– आणि निवडणूक–आयोगाला लिहिलेल्या पत्राचे प्रकरण,– या साऱ्या गोष्टी जागरूकतेने पाहणारा मतदार नेमके काय करील ? गोव्याच्या निकालावरून प्रचाराचा एवढा गदारोळ उठवूनही गोव्याच्या जनतेने ' जनतेच्या बाजूने कौल देण्याचे नाकारले हे स्पष्ट झाले आहे; पण उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश, प. बंगाल, ओरिसा आणि अन्यत्र मतदार काय करतील हे सागणे कठिण होऊन बसले आहे. प्रत्येक राज्यामधील परिस्थिती वेगळी असून निवडणुकीनंतर राजकीय चित्र पुष्कळच बदललेले दिसेल, यापेक्षा पुढे जाऊन विधान करण्याचे धाडस कोणीही राजकीय निरीक्षक करताना दिसत नाही.

जनता पक्ष काय किंवा कांग्रेस काय दोघाजवळही सागण्यासारखे नवीन काही नाही. जनता पक्षाने आणीबाणीचा कोळसा पुन्हा पुन्हा उगाळत राहयचे, सजय–इदिरेच्या चविष्ट गोष्टी रगवून सागायच्या यापेक्षा जास्त सागण्यासारखे जनता पक्षाजवळ काहीही नाही. या नकारात्मक भाडवलावर जेवढे काही मिळवता येण्यासारखे होते ते त्याने लोकसभेच्या निवडणुकीमध्ये मिळवलेच होते. पुन्हा लोकशाहीच्या नावानेच आवज उठवायचा असेल तर मतदारासमोर साधा प्रश्न पडतो तो असा की, लोकशाहीचा महिमा सागणाऱ्या जनता पक्षाने केंद्रस्थानी आणि राज्यातही जनता पक्षाचेच सरकार असले पाहिजे असा आग्रह काय म्हणून धरावा ? आणि तसा त्यांनी तो धरला तरी जनतेने तो कितपत जुमानावा ? जनता पक्षावरून दुसरीकडे नजर फिरवण्यापूर्वी– गेल्या तीन चार महिन्यातील केंद्रशासित शासनाच्या कार्यकर्तृत्वाकडे पाहिले तर, एक गोष्ट निर्विवादपणे मान्य करावी लागेल, की जनता पक्षाने लोकशाहीच्या रक्षणाबाबत जी आश्वासने दिली होती, ती पूर्ण करण्याच्या दृष्टीने धाडसाने पावले टाकली आहेत. वृत्तपत्रीय स्वातंत्र्याची वाट मोकळी झाल्याने वातावरण खुले झाले आहे. आकाशवाणीवरील कार्यक्रम ऐकण्यामध्ये पुन्हा रस निर्माण झाला आहे. दूरदर्शनवरील राजकीय आणि सामाजिक चर्चासत्रे अर्थपूर्ण झाल्याचे जाणवत आहे. बातमीपत्रे जास्तीत जास्त नि पक्षपाती ठेवण्याची वृत्ती दिलासा देणारी आहे. आणीबाणीमधील अत्याचाराना जबाबदार असलेल्या मडळीविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यास प्रारभ झाला आहे. या गोष्टी मतदार लक्षात घेतल्याशिवाय राहणार नाही; पण त्याच्या मताची दिशा शेवटी आर्थिक आघाडी निश्चित करणार आहे. गोड्या तेलाचे भाव काय आहेत ? तांदूळ-गहू बाजारामध्ये मिळतो की नाही; कापड-मार्केट तेज आहे की नरम आहे आणि त्याच्या हातात पडत असलेल्या रुपयाची क्रयशक्ती काय आहे या गोष्टी त्याच्या हिशेबी अधिक महत्त्वाच्या आहेत उद्योगपतीच्या सहकार्याने किंमती गोठवण्याची योजना, शुद्ध खाद्यतेलाची आठ रुपये पन्नास पैसे दराने विक्री करण्याची घोषणा, याचा अनुकूल परिणाम जरूर होईल; पण तरीही जनता पक्षाला होणारे मतदान हे खुषीचे असणार नाही, तर बव्हशी नकारात्मक असेल.

जनता पक्षाला मत द्यायचे नाही तर ते द्यायचे कोणाला ? जिथे पडणाऱ्या मतासाठी वाटा जास्त आहेत तिथे पुरेसा गोंधळ उडणारच आहे. उदाहरणार्थ पश्चिम बंगालमध्ये डाव्या कम्युनिस्टाची आघाडी भरपूर मते आणि बऱ्यापैकी जागा घेईल. तेथील जनतेला आणि जनता पक्षाच्या केंद्रीय नेत्यानाही पश्चिम बगालमध्ये जनता-डावे कम्युनिस्ट एकजूट टिकली तर ती हवीच होती, पण स्थानिक नेत्यानाच या दोस्तीमध्ये फारसा रस नव्हता. जनता पक्षाचे जे तिकिट वाटप झाले ते प्रामुख्याने– सघटना कांग्रेस आणि जनसघ या घटक पक्षाना अनुकूल ठरणारे, त्या खालोखाल लोकशाहीवादी कांग्रेस आहे. विर्सजित विधानसभेमध्ये ज्याच्या केवळ दोन जागा होत्या त्या जनसघाला ६६ जागा मिळाल्या म्हणजे मेजवानीच म्हणायची मक्तेदाराचा–भाडवलदाराचा पाठपुरावा करणारे असख्य उमेदवार जनतापार्टीच्या तिकिटावर तेथे निवडणूक लढवीत आहेत. ज्या डाव्या कम्युनिस्टाबरोबर लोकसभेच्या निवडणुकाच्या वेळी दोस्ती केली– त्याच्यावर चौफेर आणि उदड दुगाण्या झाडण्याचे काम पी. सी. सेन आणि मडळी करीत आहेत निर्विवाद बहुमताच्या गप्पा जनता पक्ष करीत असला तरी पश्चिम बगालमध्ये ही गोष्ट सोपी नाही हे सगळेच ओळखून आहेत. ज्योती बसूचे नरमाईचे धोरण अधिक शहाणपणाचे आहे. कारण त्याना माहीत आहे की कदाचित उद्या निवडणुका झाल्यावर आपल्याला जनता पक्षाबरोबर सत्तेमध्ये वाटा उचलावा लागेल. जनता पक्षाबद्दल ते अत्यत नरमाईने बोलत

पृष्ठ २८ वर

# विधानसभा निवडणुका

## ' जनता 'स गोव्याचा हादरा

वा. दा. रानडे

गोवा विधानसभा निवडणुकीच्या निकालाने जनता पक्षाला हादरा दिला आहे. इतर राज्यातील निवडणुकावर याचा परिणाम होणार नाही असे जनता पक्षाचे अध्यक्ष चंद्रशेखर यानी म्हटले आहे. केंद्रशासित प्रदेशातील निकाल राष्ट्रीय प्रवाहाशी विरोधी व विसंगत असतात असा अनुभव यापूर्वीही आलेला आहे. तेव्हा या निकालाना फारसे महत्त्व देण्याचे कारण नाही असा त्याच्या निवेदनाचा सूर आहे. जनता पक्षाने तीस जागा लढविल्या त्या अर्थी बहुमत मिळविण्याची त्यास आशा वाटत होती, पण अवघ्या तीनच जागा मिळाल्याने या आशेला वस्तुस्थितीचा आधार नव्हता हे स्पष्ट झाले आहे. आपल्याला एवढे अपयश का आले, अंदाज कोठे चुकले याचे वस्तुनिष्ठ आत्मपरीक्षण पक्षाच्या कार्यकर्त्यांनी करायला हवे. गोव्याचा जाणकार यावर अधिक प्रकाश पाडू शकेल. येथे फक्त मतदानावरून निघणारे काही निष्कर्ष मी मांडीत आहे.

पहिला महत्त्वाचा निष्कर्ष म्हणजे एकाही मतदारसंघात ५० टक्क्यापेक्षा कमी मतदान झालेले नाही. मतदाराचा उत्साह त्यावरून दिसून येतो. महाराष्ट्रवादी गोमतक पक्षाने पधरा म्हणजे निम्म्या जागा जिंकल्या. शिवाय एक अपक्ष त्यानी पुरस्कृत केलेला आहे. त्यामुळे आपण सरकार बनवू शकतो असा त्याचा दावा आहे. पण अगदीच अल्प बहुमत असल्याने आयाराम-गयारामाना संधी असून स्थिर सरकार राहणे कठीण दिसते. कॉंग्रेसला या वेळी दहा जागा मिळाल्या त्या मुख्यतः युनायटेड गोमतक पक्षातला एक गट कॉंग्रेसमध्ये विलीन झाल्याने. या जागा मुख्यतः त्या गटाच्याच आहेत. गोव्यात जनता पक्ष स्थापन झाला तो यु. गो. पक्षातलाच सिकेटा गट त्या पक्षाला मिळाल्याने राष्ट्रीय पातळीवरच्या दोन पक्षानी यु गो. पक्षातल्या या दोन गटाचा पाठिंबा मिळवून गोव्यात मूळ धरण्याचा प्रयत्न चालविला आहे. जनता पक्षाने सिकेटा गटाला जवळ करण्यापेक्षा म गो. पक्षाशी समझोता करणे योग्य झाले नसते का ? त्या पक्षाच्या कार्यकर्त्यांनी या दृष्टीने आत्मपरीक्षण करावे.

कॉंग्रेसला पराभूत करणे व म गो. पक्षाला निर्णायक बहुमत मिळू न देणे हे आमचे दोन उद्देश साध्य झाले आहेत असे जनता पक्षाचे चिटणीस हेडगे यानी सांगितले हेच दोन उद्देश होते तर मग तीस जागा कशासाठी वाढविल्या ? काही मतदारसंघात म. गो. पक्ष व जनता यात मतदाराची मते विभागली गेल्याने कॉंग्रेसचा विजय झाला असल्याचे मतदानाच्या आकड्यावरून दिसते. म्हणजे जेथे विजयाचा थोडाही संभव नाही तेथे उमेदवार उभे करून जनता पक्षाने कॉंग्रेसच्या विजयालाच हातभार लावला असे म्हणावे लागेल.

लागोपाठ चौथ्या निवडणुकीत म. गो. पक्षाने विजय मिळविला. इंदिरा लाट आणि जनता लाट या दोघाचाही प्रभाव गोव्यात पडलेला नाही. मंत्रिमंडळाचा कारभार आदर्श आहे असे मला म्हणावयाचे नाही; पण जनतेचा पाठिंबा अजून म. गो. पक्षाला आहे ही वस्तुस्थिती राष्ट्रीय पातळीवरील पक्षाना नाकारता येणार नाही हे या निवडणुकीने पुन: एकदा दाखवून दिले.

उत्तरेकडील राज्यात पंजाब आणि हरियाना विधानसभा निवडणुकासाठी मतदान १२ जूनला असून एक दिवसातच ते पुरे होत आहे. या दोन्ही राज्यात लोकसभा निवडणुकीत कॉंग्रेसला एकही जागा मिळाली नाही, आता विधानसभा निवडणुकाच्या वेळी जनतालाट तेवढी जोरदार नाही. असे असले तरी, त्याचा फायदा कॉंग्रेसला मिळणार नाही. तो पक्ष पराभवातून अजूनही सावरलेला नाही.

पंजाबमध्ये लोकसभा निवडणुकीप्रमाणेच या वेळीही अकालीदल, जनता आणि मार्क्सवादी याची आघाडी आहे. एकूण ११७ जागापैकी अकाली ६८. जनता ४० व मार्क्सवादी ९ असे आपसात वाटप त्यानी केले आहे. निर्विवाद बहुमतासाठी किमान ५९ जागा जिंकायला हव्यात. अकालीदल तेवढ्या जागा जिंकील काय आणि जिंकल्यानंतर केवळ स्वत.चे मंत्रिमंडळ बनवील की जनता आणि मार्क्सवादी याच्याशी आघाडी चालू ठेवील ? अकालीदलास एकट्याला बहुमत मिळाले तरी केवळ स्वतःचे मंत्रिमंडळ न बनविता आघाडी आम्ही चालू ठेवू असे या प्रश्नाचे उत्तर अकालीदलाचे नेते व संभाव्य मुख्य मंत्री प्रकाशसिंग बादल यानी दिले आहे. अकालीदलाचे सर्व प्रमुख नेते वर लोकसभेवर निवडून गेल्याने मुख्य मंत्रिपदास लायक नेता अकालीजवळ राहिला नाही म्हणून बादल याना विधानसभा-निवडणूक लढविण्यास सांगण्यात आले. फरीदकोट जिल्ह्यातील गिदरबाहा मतदारसंघातून ते उभे असून त्याच्याविरुद्ध कॉंग्रेसचे श्री. बळदेवसिंग लढत देत आहेत. अकालीदलाचे बहुसंख्य उमेदवार बादलगटाचे आहेत. तिकिटे देताना अधिक पात्र उमेदवार बाजूला सारून प्रमुख अकाली नेत्याच्या नातलगाची वर्णी लावण्यात आली अशा तक्रारी आहेत प्रकाशसिंग बादल याचे बधू गुरुदाससिंग बादल, खासदार सुरजितसिंग बर्नाला याच्या पत्नी सुरजितकौर, अकालीदलाचे कार्यकारी अध्यक्ष खासदार जगदीशसिंग तळवंडी, याचे बंधू देवराजसिंग तळवंडी, खासदार मोहिंदरसिंग सैनवाला याचे बंधू चिरंजीव हरजितसिंग अशा नातलगाचा अकाली यादीत समावेश आहे

जनता पक्षाच्या यादीत निम्म्यापेक्षा अधिक जनसंघाचे उमेदवार आहेत. त्यामुळे अकाली-जनता आघाडी म्हणजे प्रत्यक्षात पूर्वीची अकाली-जनसंघ आघाडीच होण्याचा संभव आहे. निवडणुकीसाठी अकाली-जनता -मार्क्सवादी अशी तीन पक्षाची आघाडी असली तरी त्यापैकी अकाली व जनता हे दोनच पक्ष संयुक्त प्रचारमोहीम करणार

आहेत. मार्क्सवादी त्यात सहभागी होणार नाहीत. दुसऱ्या बाजूला कॉंग्रेस आणि कम्युनिस्ट यानी सयुक्त आघाडी केली असली तरी, त्याची प्रचारमोहीम सयुक्त राहणार नाही. आपसातील लढती टाळण्यासाठी जागांच्या वाटपापुरता समझोता असेच या सहकार्याचे मर्यादित स्वरूप आहे. पंजाबमधील या वेळच्या निवडणुकाचा आणखी एक विशेष म्हणजे कम्युनिस्ट व मार्क्सवादी यानी एकमेकाविरुद्ध लढती टाळल्या असून निरनिराळ्या मतदारसघांत आपले उमेदवार उभे केले आहेत. आपसात लढून दोघांनीही पराभूत होण्यापेक्षा आपले बळ असलेल्या भागात उभे राहून निवडून यावे हा विचार त्यामागे दिसतो.

हरियानामध्ये कॉंग्रेसच्या विरोधापेक्षा स्वतःच्या पक्षातील बडखोराचाच विरोध जनता पक्षाला अधिक जाणवणार आहे. जनता पक्ष सर्व ९० जागा लढविणार असला तरी ६० जागासाठी अधिकृत जनता उमेदवाराविरुद्ध बंडखोर उभे आहेत. एकही सरळ लढत या वेळी नाही. तीन तिरंगी लढती असून बाकीच्या ८७ मतदारसघात बहुरंगी सामने आहेत हरियानातील जनता पक्ष मुख्यतः भारतीय लोकदल आणि जनसंघ याचा बनलेला आहे. जनता यादीत ९० पैकी ५० तिकिटे भालोद गटाला मिळाली आहेत देवीलाल हे या गटाचे नेते. ते जाट असून केंद्रीय गृहमंत्री चरणसिंगाना जवळचे असून भावी मुख्य मंत्री म्हणून देवीलाल याच्या नावाचा उल्लेख केला जात आहे. पण हरद्वारीलाल या दुसऱ्या जाटनेत्यास जनता पक्षाने तिकिट दिलेले नाही. बन्सीलाल यांच्या हुकूमशाही राजवटीविरुद्ध त्यानी निर्भयपणे लढत दिली. या राजवटीतील अन्यायावर विदारक प्रकाश पाडणाऱ्या पुस्तिका प्रसिद्ध केल्या त्याबद्दल बन्सिलाल यानी हक्कभगसमिती नेमून हरद्वारीलाल याचे सभासदत्वच रद्द केले; पण ते दबले नाहीत त्यानी हायकोर्टात प्रकरण नेऊन तेथे विजय मिळविला. त्याना खरोखर तिकिट मिळायला हवे होते; पण हरियानाच्या जनता पक्षात देवीलाल-चडराम याचा गट निर्माण झाला असून चरणसिगाचा त्यास पाठिंबा आहे. उमेदवारनिवडीची सूत्रे या गटाकडे होती. त्याने हरद्वारीलाल याना डावलले अशी त्याची तक्रार आहे. चडराम हरिजननेते आहेत. हरियानाच्या पहिल्या कॉंग्रेस मन्त्रिमंडळात ते मंत्री होते.

बन्सीलाल यांची कॉंग्रेसमधून हकालपट्टी झाली असली तरी हरियानातील कॉंग्रेस पक्षावर त्याच्या गटाची अजून पकड आहे. बन्सीलाल यांचे चिरंजीव सुरिंदरसिंग तोशम मतदारसघातून उभे आहेत. युवक कॉंग्रेसचे ते खजिनदार असून आणीबाणीतील अनेक घटनाशी त्याचे नाव निगडित आहे भिवनी लोकसभा मतदारसंघाच्या कक्षेत हा विधानसभा मतदारसंघ येतो. लोकसभा निवडणुकीत फक्त याच मतदारसघात कॉंग्रेसला जनतापक्षापेक्षा जास्त मते मिळाली होती. बन्सीलाल याची जी गत झाली तीच त्याच्या मुलाची होते की तो निवडून येतो हे पाहण्याच्या दृष्टीने ही निवडणूक महत्त्वाची ठरणार आहे कॉंग्रेस पराभवाने तर खचली आहेच पण बन्सीलालगट आणि बन्सीलाल विरोधी गट याच्यातील झगडयामुळे ती अधिकच कमकुवत झाली आहे. त्यामुळे बहुरंगी लढती असल्या तरी कॉंग्रेसवर त्याचा फारसा परिणाम होण्याची शक्यता नाही.

तामिळनाडूमध्ये प्रादेशिक पक्षाच्या हातीच सत्ता राहते की राष्ट्रीय पातळीवरील पक्षाच्या हाती येते हा महत्त्वाचा प्रश्न आहे आणि प्रादेशिक पक्षच राज्याची सूत्रे आपल्या हाती ठेवणार असे दिसते, पण एक महत्त्वाचा बदल म्हणजे गेल्या दोन निवडणुकीत सत्तारूढ झालेल्या द्र. मु. क. पक्षाची जागा अण्णा द्र. मु. क. पक्ष घेणार असे लोकसभा निवडणुकीतील त्याच्या विजयावरून वाटू लागले आहे. लोकसभा निवडणुकीत एका बाजूला द्र. मु. क जनता पक्ष आणि मार्क्सवादी तर दुसऱ्या बाजूला अण्णा द्र. मु क. कॉंग्रेस आणि कम्युनिस्ट अशा दोन आघाडया होत्या. या वेळी अशा सरळ दोन आघाडयात सामना नाही. कारण आघाडया भंगल्या आहेत. लोकसभा निवडणुकीतील पराभूत कॉंग्रेस पक्षाशी आघाडी करण्याने आपला फायदा होण्याऐवजी उलट हानीच होईल असे अण्णा द्र. मु. क. पक्षाला वाटते तर द्र. मु क. शी समझोता करण्यात आपली चूक झाली अशी कबुली पंतप्रधान मोरारजी देसाईंनी दिली असून या निवडणुकीत ती चूक त्यानी सुधारली, पण दुसरी चूक केली. लोकसभा निवडणुकीतील विजयानंतर देशात सर्वत्रच जनतालाट असल्याचे त्या पक्षाच्या नेत्याना वाटू लागले असून आपल्या सामर्थ्याबद्दल काहीसा जाडा आत्मविश्वास त्याच्यात दिसून येऊ लागला आहे. वास्तविक जनतापक्ष आणि अण्णा द्र. मु. क. याच्यात समझोता होऊ शकला असता, पण एकटयाच्या बळावर निवडणुका जिंकू असे जनता नेत्याना वाटू लागले तामिळनाडूतला जनता पक्ष म्हणजे सघटनाकॉंग्रेस निर्णायक बहुमत मिळविण्याइतके त्याचे बळ नाही हे पूर्वीच दिसून आलेले आहे लोकसभा निवडणुकानतर बळ थोडे वाढले असेल. पण राज्याची सत्ता हाती घेण्याइतके ते वाढलेले नाही. केवळ तामिळनाडूमध्येच नव्हेतर इतर राज्यातसुद्धा तेथल्या प्रभावी प्रादेशिक पक्षाशी जनता पक्षाने समझोता करायला हवा होता. पश्चिम बंगालमध्ये मार्क्सवाद्याशी ( मार्क्सवादी हा प्रादेशिक पक्ष नव्हे, पण त्याचा मुख्यत प्रभाव पश्चिम बंगालमध्ये आहे. या उद्देशाने त्याचा येथे उल्लेख केला. ) काश्मीरमध्ये शेख अब्दुलाशी आणि गोव्यात महाराष्ट्रवादी गोमतक पक्षाशी समझोता करायला हवा होता, पण अकाली पक्ष सोडला तर इतर प्रादेशिक पक्षाशी जनता पक्षाने या वेळी समझोते केलेले नाहीत हे धोरण योग्य आहे का याचे उत्तर निवडणूकनिकालच देतील गोव्याच्या बाबतीत ते उत्तर मिळालेच आहे

पाँडिचरीतील चित्र तामिळनाडूसारखेच आहे. तेथे ३० जागांसाठी १३१ उमेदवार आहेत. निवडणूक–समझोता फक्त कॉंग्रेस व कम्युनिस्टात असून बाकी सर्व पक्ष एकमेकाविरुद्ध निवडणूक लढवीत आहेत. लोकसभा–निवडणुकीतील यश लक्षात घेता अण्णा द्र. मु. कला बहुमत मिळण्याची शक्यता दिसते.

प्रादेशिक पक्षाशी समझोता जनता पक्षाने करायला हवा होता, असे सुचविताना प्रादेशिक पक्षाचा पुरस्कार मला करावयाचा नाही. प्रादेशिक पक्ष राष्ट्रीय एकात्मतेस पोषक नाहीत. त्यातून प्रादेशिक वृत्ती बळावते; पण या पक्षाच्या प्रादेशिक राजकारणावर केवळ टीका करून त्याचा प्रभाव कमी होणार नाही. राष्ट्रीय पातळीवरच्या पक्षानी त्या त्या प्रदेशाच्या न्याय्य मागण्या समजून घेऊन त्या पुऱ्या करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. नियोजनातील प्रादेशिक असमतोलातून प्रादेशिक भावनाना खतपाणी मिळून प्रादेशिक संघर्ष निर्माण होतात. समतोल–नियोजनाने असे सघर्ष टाळता येतील आणि आपल्या न्याय्य मागण्याची दखल राष्ट्रीय पातळीवरील पक्ष घेत आहेत, असे दिसताच प्रादेशिक पक्षाना मिळणारा पाठिंबा कमी होईल. □

# असा आहे ' किस्सा कुर्सीका '

अरुण टिकेकर

आपदस्थितीच्या १९ महिन्यात कुणावर, कसे नि किती अत्याचार झाले याच्या सुरस नि चमत्कारिक कथा दिवसानुदिवस प्रकाशात येत आहेत त्यापैकीच एक कहाणी. ही कहाणी कुणा विरोधी पुढाऱ्याची नाही, कुणा विचारवंताची नाही, कुणा तस्कराची तर नाहीच नाही, तर ती आहे एके काळी श्रीमती गाधींच्या राजकीय अंतर्वर्तुळात वावरलेल्या एका लोकसभा–सदस्याची एका कलावंताची. एका चित्रपट–निर्मात्याची. 'संत ज्ञानेश्वर' सारखा निर्मळ सोज्ज्वळ चित्रपट काढणाऱ्या अमृत नहाताची

श्री. नहाता यानी काही वर्षांपूर्वी 'सबसे बडा सवाल' नामक चित्रपट काढण्यासाठी जुळवाजुळव केली होती, पण अनेक अडचणीमुळे त्याना प्रयत्न सोडावा लागला होता; परतु आणीबाणीच्या परिस्थितीत त्याना आलेल्या अनुभवानी पुन्हा उचल खाल्ली आणि सुदैवाने 'फिर भी' फेम शिवेन्द्र सिन्हासारखे समानधर्मीही त्याना मिळाले. शबाना आझमी, रेहान सुलताना, चमन वग्गा यासारखे कलावत, के. के महाजनसारखे अनुभवी कॅमेरामन, रघुनाथ सेठसारखे संगीतकार मिळाले महेन्द्र कपूर– आशा भोसलेनी उसना आवाज दिला. फोर्ड फौंडेशन, कुतुबमिनार, विज्ञान–भवन आदि ठिकाणी चित्रीकरण झाले. १९७५ च्या फेब्रु-मार्चमध्ये चित्रपट तयार झाला. सर्वांनी मन लावून काम केल्याने एक उत्कृष्ट 'राजकीय' चित्रपट निर्मिल्याचा आनद प्रत्येकाला झाला. आपले आसन टिकविण्यासाठी मदाध राज्यकर्ते कोणत्या थराला जाऊ शकतात, अनन्वित अत्याचार करण्यास प्रवृत्त होतात हे विडबनात्मकरीत्या दाखविण्याचा हेतु श्री नहाताचा होता. श्री नहाताना आपल्या चित्रपटाच्या यशाची खात्री होती. मोठ्या आत्मविश्वासाने त्यानी आपला चित्रपट १९ एप्रिल १९७५ ला सेन्सॉर–बोर्डाच्या शिक्कामोर्तबासाठी सुपूद केला सेन्सॉर–बोर्डमध्ये हलचल उडाली अनेक सदस्याना विचाराती चित्रपटात काही गैर आढळले नाही, पण बोर्डाचे चेअरमन चित्रपटाच्या विरुद्ध दड ठोकून उभे राहिले. त्यानी केंद्रीय सरकारकडे धाव घेतली. २½–३ महिने काहीच झाले नाही. ११ जुलैला श्री. नहाताना जवळजवळ ४० हरकतीचे पत्र माहिती आणि नभोवाणीखात्याकडून आले साऱ्या हरकतीचे निरसन करणारे उत्तर त्याच दिवशी त्यानी पाठविले, पण त्याच खात्याकडून चित्रपट 'नापास' झाल्याचे कळविले गेले. २६ जूनला आणीबाणी जाहीर झाली १४ जुलैला श्री नहाताचा चित्रपट डी आय. आर. खाली जप्त करण्याचा आदेश निघाला श्री. नहातानी सुप्रीम कोर्ट गाठले, पण त्या कोर्टानेही श्री नहाता याना चित्रपटाची रिळे सरकारकडे देण्यास सागितले चित्रपट योग्य प्रकारे साभाळण्याची जबाबदारी केंद्रीय सरकारची, असाही फतवा काढला. थोडयाच दिवसानतर बॉम्बे फिल्म्स लॅबोरेटरीत ट्रक भरून आलेल्या पोलिसानी धाड घातली आणि निगेटिव्ह, साउड ट्रॅक, सपादनात काटछाट झालेले फिल्मचे तुकडे आदि सर्व जप्त केले २९ ऑक्टो १९७५ ला सुप्रीम कोर्टाने सरकारला चित्रपट कोर्टाला दाखविण्यास सागितले, पण सरकारने चित्रपटाची रिळे सापडत नसल्याचे कळविले कोर्टाने चित्रपट शोधून काढावा अन्यथा निगेटिव्हवरून नवीन प्रिंट काढावा असा आदेश दिला २२ मार्च १९७६ ला सरकारने निगेटिव्हसुद्धा हरविल्याचे कळविले !!

श्री नहाताना शका वाटते की, श्रीमती गाधींच्या वैयक्तिक सूचनेवरून ही फिल्म नष्ट करण्यात आली असावी चित्रपटनिर्मितीसाठी श्री. नहातानी केवळ ९ लाख रुपये खर्च केले आतापर्यंत २ लाख रुपये व्याजाचे ते धनी झाले आहेत. आणीबाणी गेली. इदिरा सरकार गेले. श्री. नहाता- 'जनता' पार्टीच्या तिकिटावर पुन्हा निवडून आले. आता त्यानी नभोवाणीमत्री श्री. अडवानी याच्याकडे लकडा लावला आहे– "माझी फिल्म परत करा किंवा एक कोटी रुपये नुकसानभरपाई द्या. !"

श्री. नहातानी निर्मिलेला चित्रपट जनसामान्याना पाहावयास मिळाला नाही कदाचित मिळणारही नाही पण ज्या थोडया महाभागानी तो पाहिला त्याना तो भयकर आवडला एका एम् पी ने उद्गार काढले, 'हा चित्रपट पाहिल्यानतरच माझ्या लक्षात आले की, चित्रपट हे किती प्रभावी साधन आहे' एक माजी मत्रीमहोदय म्हणाले, "जर 'किस्सा कुर्सीका' रिलीज् झाला असता, तर ह्या एकमेव चित्रपटामुळे निवडणुकीत कॉंग्रेस हरली असती.", माहिती व नभोवाणीखात्यातले एक अधिकारी म्हणाले, "नहाताची फिल्म भविष्यसूचक आहे !!!"

जेव्हा श्री नहाताची खात्री झाली की, इतक्या मेहनतीने तयार केलेला चित्रपट रुपेरी पडद्यावर कधीच येऊ शकणार नाही, तेव्हा त्यानी एका पुस्तिकेद्वारे 'किस्सा कुर्सीका'ची शोकातिका कथन केली त्यात त्यानी आपल्या चित्रपटनिर्मितीचा इतिहास थोडक्यात दिला आहे आणि श्रीमती गाधीवर आणि त्याच्या सरकारच्या अधिकाऱ्यावर आग पाखडली आहे ते म्हणतात,

'One evening, some of us were having a dinner with Mrs Gandhi and during our conversation Mrs Gandhi asked me, 'Nahataji, what is right or wrong in politics?' I was shocked I was stunned Here was a Prime Minister, of the country of Gandhi and Nehru, who did not attach any significance to means and for whom the end was everything and the means had no sanctity. As political events developed I became more and more convinced that in Mrs Gandhi, the country had an immoral Prime Minister'

श्री. नहाता यांचा राग समजून घेण्यासारखा आहे; पण असं काय चित्रित केलं होतं त्यांनी की, श्रीमती गांधींनी चित्रपट नष्ट करण्याचा आदेश द्यावा?

### कथानक

जन गण देश. राष्ट्रपतीच्या निवडणुकीची धामधूम. दोन वजनदार प्रतिस्पर्धी. एक, शेठ गरीबदास. पार्टीचे नाव निळी पार्टी निवडणूकचिन्ह घोडा दुसरे, बॅरिस्टर भिकारीमल पिवळी पार्टीचे उमेदवार. चिन्ह सायकल. एका क्लबमध्ये निवडणुकीची चर्चा सर्व पुरुषमंडळीत एकटी मीरा स्त्री (रेहाना सुलतान); पण तिचेच सर्वांवर वर्चस्व निवडणुकीत तिसरा उमेदवार उभा करण्याची टूम निघते. कुमारी मीरादेवी. सुस्वरूप श्रीमंत. 'एम. ए. विथ पॉलिटिक्स.' तिलाच उभे करावे, असा एक आवाज. सर्वांचे अनुमोदन; परंतु तिचा नकार. 'भेसळ करणाऱ्या व्यापाऱ्याची मी मुलगी. मला कोण मते देईल?' तिचे म्हणणे रस्त्यात योग्य उमेदवाराच्या शोधार्थ भटकताना तिची गगूशी भेट होते. एका भोळू बेंदूचा मंदबुद्धी नोकर. अतियोग्य उमेदवार त्या बिचाऱ्याला त्याच्यावर कोसळणाऱ्या आपत्तीची कल्पनाच नसते. गगूचा गगाराम बनतो. मीराच्या नव्या पार्टीचे नाव काळी पार्टी. चिन्ह छोटी कार. निवडणुकीची तयारी धुमधडाक्यात गंगूला कळतच नसते काय होतय. गगूची प्रेस कॉन्फरन्स मीरा गंगूच्या वतीने उत्तरे देते. गगूवर नाना तऱ्हेचे सोपस्कार घडविले जातात. त्याजकडून भाषणे पाठ करवून घेतली जातात त्याची आणि जनता (शबाना) नावाच्या गरीब मुक्या मुलीची गाठ घालून दिली जाते. गंगू जनतेशी प्रेमालाप करतो, तिला भुलवितो, थापा मारतो, तिचे स्वप्नरंजन करतो जनसामान्य गंगूवर बेहद्द खूष. भल्या मोठ्या मिरवणुका, 'जय'चे नारे, छोट्या कारची भरपूर पोस्टर्स. बाकीचे दोन उमेदवार हादरतात. पैसे घेतात नि उमेदवारी मागे घेतात. गंगू जनगण देशाचा राष्ट्रपती होतो. मीरा चीफ सेक्रेटरी. राष्ट्रपतीच्या खुर्चीवर तो बसताक्षणीच बाजूला फेकला जातो. आकाशवाणी होते. पुढील मूलतत्त्वे उच्चारली जातात.

१. ज्या शिडीने वर चढलास ती फेकून दे, नाही तर इतरही तीच शिडी वापरतील.

२. ज्यांनी मदत केली त्या मित्राना विसरून जा.

३. 'जनते'ला दिलेली अभिवचने विसरून जा.

४. आरामाचे, थाटाचे आयुष्य जग.

५. कानात तेल ओतून घे

६. डोईवरील केस स्वच्छ ठेव, उवा शिरतील त्यात.

७. माझी पूजा कर, माझे रक्षण करणे हे तुझे परम कर्तव्य होय, त्यासाठी तू जे जे करशील ते योग्यच ठरेल.

राष्ट्रपतीचे प्रचंड घर, सुखसोयी त्याला दाखविल्या जातात रात्र होते. रूबी नावाच्या मुलीबरोबर तो झोपला असताना उंदरांच्या खडखडाटामुळे जाग येते. ताबडतोब तो आणीबाणीची घोषणा करतो. मध्यरात्री इमर्जन्सी – मीटिंग बोलवितो. सर्व सदस्य डोळे चोळत, जांभया देत येतात. कुणी अंडरवेअरमध्ये तर कोणी बायकोच्या कपड्यात. आर्किमिडीजच्या आनंदात राष्ट्रपती जाहीर करतात की सत्य सापडले. ते असेही जाहीर करतात की उंदीर हा राष्ट्राचा शत्रू आहे आणि त्याला नष्ट करणे हे आपले आद्य कर्तव्य आहे. 'हायलेव्हल इन्क्वायरी कमिशन' नेमले जाते हजारो फायली तयार होतात. अहवाल राष्ट्रपतीना सादर केला जातो – 'उंदराना मारण्यासाठी मांजरं लागतील.' आणि आपल्या देशात तर मांजरच नाहीत.'

जनगण देश आणि शेजारी राष्ट्राचा समन्वय होतो. कुत्री एक्स्पोर्ट करून मांजरं इम्पोर्ट करण्याच्या ठरावावर सह्या होतात. राष्ट्रपतीला काहीच समजेनासे होते. अधिकारी मंडळी त्याना 'फॉरेन ट्रेड' बद्दल माहिती सांगतात आणि शेवटी स्पष्टीकरण देतात की कुत्रीही एक्स्पोर्ट होणार नाहीत किंवा मांजरंही इम्पोर्ट होणार नाहीत, तेव्हा निश्चित असावे. फक्त दहा लाख डॉलर्स राष्ट्रपती, शेजारी राष्ट्राचा प्रतिनिधी आणि अधिकारी यात वाटले जातील. फॉरेन बँकांत खाती उघडली जातील. ह्या तोडग्यावर राष्ट्रपती खूप खूष होतात.

अन्युटेड स्टेटस् देशातून एक तज्ज्ञ बोलविला जातो, त्याचा सल्ला विचारण्यात येतो, तो म्हणतो, 'उंदीर मारणं ह्या प्राण्यांचा प्रश्न नसून मनुष्यमात्राचा आहे.' म्हणून अनेकविध उपायाची आवश्यकता आहे. उंदीरमाऱ्याना रोख रकमाची पारितोषिकेही द्यावीत. राष्ट्रपतींना सल्ला पटतो. एक उंदीर मारला की रोख दहा रुपयाचे बक्षीस राष्ट्रपती जाहीर करतात. खास प्रकारची 'प्रशस्तिपत्रके' छापण्यात येतात. ती वाटण्यासाठी एक खास ऑफिस उघडण्यात येते प्रत्येक मेलेल्या उंदरामागे ऑफिसरला तीन व नागरिकाला सात रुपये मिळणार असतात. अशा तऱ्हेने लाखो रुपये सरकारी खजिन्यातून खर्ची पडतात. लाखो उंदीर मेल्याचे / मारल्याचे सरकारतर्फे अधिकृतरीत्या सांगण्यात येते, परंतु उंदराचा सुळसुळाट काही प्रत्यक्ष कमी होत नाही.

मुकी 'जनता' खरोखरच काही उंदराना मारते आणि बक्षिसाच्या आशेने ऑफिसमध्ये येते. उंदरांच्या त्या प्रेताकडे पाहून ऑफिसमध्ये कोण गडबड उडते कर्मचारीवर्ग एकदा मृत उंदराकडे व एकदा 'जनता'कडे पाहातच बसतो त्याचा प्रमुख शेवटी 'जनते'वर प्रश्नाची सरबत्ती करतो. 'हे उंदीर तूच मारले का? कशा प्रकारे? कुठल्या बिळातले? कुठलं वीष वापरलं? कुठून मिळालं? तुझ्याकडे वीष मिळविण्याचा परवाना आहे का? कुणी दिला? हे उंदीर तूच कशावरून मारलेस? प्रुफ काय? दुसऱ्यानी मारलेले उंदीर तू बक्षिसाच्या आशेने चोरून कशावरून आणले नसशील?'... वगैरे वगैरे. अधिकारी पुढे म्हणतो, की ह्या साऱ्या प्रकाराची रीतसर चौकशी होईल आणि असं आढळून आलं की हे उंदीर तूच मारले आहेस तर 'प्रशस्तिपत्रक' तुला पोस्टाने पाठविले जाईल.

'जनते'ला ह्या साऱ्या प्रकारची चीड येते. ते मृत उंदीर घेऊन ती सरळ राष्ट्रपतिभवनात जाते. गगारामची भेट घेते. गगाराम मृत उंदीर पाहून, खूष होतो आणि जास्त खूष होतो, सरकारी उपक्रमात 'जनते'चा सहभाग पाहून, परंतु तो 'जनतेला' सांगतो, की आता तिच्याकडे पाहायला त्याला वेळ नाही, तिने पुन्हा कधी तरी यावे. 'जनतेला' आश्चर्याचा धक्का बसतो.

इकडे गणरायाच्या मूषकवाहनाचा चाललेला संहार न पाहवून एक स्वामी उपोषणास बसतात. राष्ट्रपती बिथरतात,

परंतु चीफ सेक्रेटरी मीरा, याना सांगते की स्वामीना सोन्याचा उदीर भेट देऊ. तो मिळताक्षणीच व्हिस्कीचा एक घोट घेऊन स्वामी उपोषण सोडतात.

राष्ट्रपती नशाबंदी – सप्ताह, अनाथालय आदीचे उद्‌घाटन, 'गरिबी हटविण्या'च्या मोहिमेतील भाग म्हणून, करतच राहतात. शेठ गरीबदास याना छोटी कार 'गरिबा-साठी' निर्माण करण्यासाठी सरकारची परवानगी देण्यात येते. गरिबी हटविण्यात शेठ गरीबदास यांचे सहकार्य पाहून राष्ट्रपती त्याना २ कोटी इन्कम टॅक्स माफ करतात.

'वृक्ष–रोपण' कार्यक्रमात 'जनता' सहभागी होऊ इच्छिते. एक रोपटेही ती लावते, पण ते पाडण्यात येते. कारण त्या भागात रोपटी लावण्याचे कॉन्ट्रॅक्ट दुसऱ्या-जवळ असते.

राष्ट्रपती बँक्स, चित्रपटगृहे, फॅक्टरीज्, वृत्तपत्रे...या सर्वांचे राष्ट्रीयीकरण घडवून आणण्याचा मनसुबा रचतात 'समाजवाद कधीही थाबू शकत नाही' अशी त्याची धारणा असते. 'जनता' राष्ट्रपतीची भेट घेण्यासाठी धडपडत असते. तिला धक्केबुक्के मारून बाहेर हाकलण्यात येते व नोटाची पुडकी घेऊन आलेल्या एका शेठजीची वर्णी लागते.

वार्षिक पदवी–वितरण–समारंभात छद्म–श्री, छद्म–भूषण आणि छद्म–विभूषण अशा पदव्या अनुक्रमे एक इजिनिअर, उद्योगपती आणि तस्कर यांना दिल्या जातात. राष्ट्रपती स्वत.ला 'जनता–जनार्दन'चे भूषण बहाल करवून घेतात.

देशातली गरिबी हटलेली असते. शेठ तेलवालाची गरिबी हटविण्यासाठी वनस्पति-तेलाच्या किमती वाढविण्याची विनती राष्ट्र-पतीना केली जाते. वाढत्या किमती प्रगतीचं द्योतक असतात असा दावा केला जातो. राष्ट्रपती तेलाच्या किमती वाढविण्याची सूचना करतात. 'जनता' आत घुसण्याचा प्रयत्न करीतच असते, पण राष्ट्रपतीना वेळ नसतो तिची भेट घ्यायला.

शेवटी 'जनता' आजारी पडते. डॉक्टर येतात नि निदान करतात की तिला 'गरिबी' नामक भयकर रोग झालाय्. ह्यावर कुठ-लाही उपाय नाही. खाणे अजिबात बंद. अपमान गिळणे व शिव्या खाणे चालेल. पाणी पिण्यास हरकत नाही. डोक्यावर घराचे छप्पर नको. लिहिणे–वाचणे बद रडणे तर अजिबात बंद तक्रार कामाची नाही.

स्वामीमहाराज, वाढत्या अधर्माबद्दल चिता व्यक्त करतात. गगारामकडून राजी-नामा मागतात. राष्ट्रपती त्याला धन देऊन देशाची गरिबी हटविण्याच्या प्रयत्नात त्याचा सहभाग विकत घेतात.

शेठ धिर्ला गहू, साखर गडप करतात, शेठ गरीबदास यत्रे हडप करतात; शेठ तेलवाला साबण, तेल.. इत्यादि गिळकृत करतात. 'जनता' बिचारी अनेक रागात उभी असते देशात मंदीची लाट येते. मोर्चे निघतात. घोषणा होतात -देशातले वाता-वरण तापते. राष्ट्रपतीना चिता वाटू लागते. ते अधिकाऱ्याशी सल्लामसलत करतात आणि जाहीर करतात, जनगण देशातल्या अस्थिर वातावरणाला जबाबदार आहे त्याचं शेजारी–राष्ट्र 'अधेरनगरी' राष्ट्रपती गंगाराम अधेरनगरीच्या राजाची भेट घेतात व जनताजनार्दनाचे लक्ष भुकेकडून राष्ट्रा-कडे वळविण्यासाठी दोन्ही राष्ट्रात लढाई घडवून आणण्याचा सल्ला देतात लढाईला तोड लागते. राष्ट्रपती 'देशासाठी रक्त' मागतात, त्यागाची भीक घालतात. गरीब जनता रक्तदान करते. पुन्हा 'अविश्वासाचा ठराव' येतो. पुन्हा 'इमान' विकणे-विकत घेणे होते. कुणाला राजदूत-पद मिळते, तर कुणाला 'इम्पोर्ट लायसन्स', कुणी पैशावरच समा-धान मानतात. जे मानीत नाहीत त्यांना नष्ट करण्याची गुप्त सल्लामसलत होते. मारले-त्याच्यावर स्तुतिसुमनांचा वर्षाव केला जातो. प्रामाणिक अधिकाऱ्याची गळचेपी होते

'जनता' उपासमारीने मरणाला टेकलेली दिसते ती मोर्चात भाग घेते. तिला पकड-ण्यात येते. अधिकारी तिच्यावर बलात्कार करतो जेव्हा त्याला त्याच्या दुष्कृत्याबद्दल जाब विचारण्यात येतो तेव्हा तो म्हणतो, आजवर राष्ट्रपती आणि त्याचे सहकारी जे करत आले आहेत तेच त्याने केले. 'जनता' वैतागून आत्मनाश करून घेते.

मीरा राष्ट्रपतीवर उलटते. आणीबाणी जाहीर करते. राष्ट्रपतीची कृष्णकृत्ये फोडण्याची धमकी देते; पण गंगाराम तिचा खून करतो आणि सागतो की ती हेर होती, भ्रष्ट होती, देशद्रोही होती सारीकडे शात शात होते. जनगणदेशाचे गगाराम आजन्म राष्ट्रपती राहतात.

हे आहे 'किस्सा कुर्सीका'चे कथानक.

अशा रीतीने श्री. नहातानी जुलमी राज-वटीच्या अत्याचाराचे अनेक नमुने विड-बनाचा आधार घेऊनं कलात्मक रीतीने पेश केले होते. जनगणदेशच्या ह्या कथानकातील अनेक व्यक्ती आणि त्याची दुष्कृत्ये याचा सबध आपल्या देशातील व्यक्तीशी लावणे ही कुठल्याही सुजाण नागरिकाला कठिण बाब नव्हती आणि म्हणूनच कलेन अधि-काराची (आणि अधिकाऱ्याची) बटिक होऊनच वावरल पाहिजे अस मानणाऱ्या सरकारन 'किस्सा कुर्सीका' ह्या चित्र-पटालाही अधार–कोठडी दाखविली, यात नवल ते काय ? पण राजा कॅन्यूटचा सागरी लाटा अडविण्याचा प्रयत्न जसा इतिहासात मूर्खपणाचा ठरला तसाच हाही प्रयत्न ठरला. इतिहासाची पुनरावृत्ती होते ती अशी.

□

विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य
या मूलभूत मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्याना
विचार करायला लावणारी प्रभावी जीवनकथा

**। मॅक्झिम गॉर्की ।**

**। सुमती देवस्थळे ।**

मूल्य वहा रुपये
राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव पेठ पुणे ४११ ०३०

# एका नक्षलवाद्याचा छळ

मुलाखत : चंद्रकांत दीक्षित

नक्षलवादी म्हटले की तो कुणी अंगावर चित्रविचित्र आकृत्या काढलेला, हातात कसले तरी शस्त्र, कमरेला एखादे धडुते गुंडाळलेला, सदैव ह्यॉ, ह्यॉ .... असा ओरडा करणारा अशी माझी धारणा होती. म्हणून पुण्यात कॉ. देवनाथन याचे भाषण होणे म्हणून मुद्दाम गेलो. त्याला पाहिले, त्याचे भाषण ऐकले. दोन्ही तऱ्हेने निराश झालो. एक तर कॉ. देवनाथन नक्षलवादी असूनही अगदी साधा दिसला. केवळ पॅंट–बुशकोटप्यू. दुसरे असे की ओषवत्या भाषेची अडचण. (कदाचित हिंदीत बोलण्यामुळे असेल) मनात म्हटले, अरे, हाही आपल्यासारखाच माणूस आहे. पकडा त्याला आणि देवनाथनशी बैठक ठरली.

कॉ. देवनाथन हा भारतीय कम्युनिस्ट पक्षाचा (मार्क्सवादी लेनिनवादी) सक्रिय कार्यकर्ता. मुंबईत पक्षाच्या संघटनात्मक कामाची जबाबदारी उचलणारा. उच्च शिक्षित असा तरुण. काळासावळा. चांगलाच जाड असलेला चष्मा. सडपातळ अंगकाठीचा. हा कॉम्रेड एम्. ए. पीएच्. डी. आहे. पी. एच् डी. तर त्याने 'प्रॉब्लेम ऑफ सोशॅलिस्ट प्लॅनिंग' वर प्रबंध लिहून मिळविली आहे. एका सुशिक्षित अधिकाऱ्याचा हा तरुण नक्षलवादाकडे वळतो याचे कुतूहल होते. कारण वडील नेव्हीत कमांडर. नाव त्याचे नाथन. कोर्ट मार्शलचे ते जज्ज. आई चन्नम्मा शाळेत शिक्षिका. आता दोघेही ६८–७० चे. एक बंधु सुदरनाथन सैन्यात मेजर, तर एक डॉ जनकनाथन मुंबईत वैद्यकीय संघटनेचे काम पहातात. असा परिवार. कळस म्हणजे पत्नी वासंती रामन सोशालॉजीची प्राध्यापिका.

कसब्यातील खाशाबा नलावडे याचे घरी सकाळीच गेलो तो लुंगी लावून देवनाथन तयारच. चहा झाला आणि गप्पा सुरू झाल्या. आणीबाणीच्या शेवटल्या काळात वृत्तपत्रात एक वृत्त झळकले होते. मुंबईच्या पोलिसानी अत्यंत चातुर्याने देवनारच्या जंगलात 'छापा टाकला व चार नक्षलवाद्याच्या टोळीस अटक केली.' बातमीने अनेक हादरले होते. कारण ह्या नक्षलवाद्यात एक स्त्रीही (वासंती रामन) होती. ती टोळी म्हणजे कॉ. देवनाथन आणि मडळी होती म्हटले तेथूनच सुरुवात करावी. म्हणून प्रश्न केला–

माझ्या प्रश्नावर कॉ देवनाथननी म्हटले : अरे भाई, मुझे जहा पकडा वहा जंगल कहाँ है ? (अर्थात मलाही माहिती नाही) एक म्युनिसिपल क्वार्टर भाड्याने घेतली होती. त्या खोलीत जाताना मला दोघा पोलिसानी धरले.

दि. २२ नोव्हेंबर ७६ ला सकाळी जवळपास दहा दिवसानी. त्या क्वार्टरकडे गेलो होतो. काही संघटनात्मक कागदपत्रे हलवायची होती म्हणून गेलो. तो अचानक पकडला गेलो. आधीमध्ये काही कॉम्रेड्स पकडले होते. त्यातील एकाने माझे नाव सांगितले होते म्हणून मुंबई पोलीस माझ्या मागावर होते.

आणीबाणी जाहीर झाल्याझाल्या भूमिगत झालो होतोच. त्यामुळे घरीही क्वचित जात होतो. या काळात कामगाराच्या छोट्याछोट्या बैठका घेत होतो इतर कॉम्रेड्सशी संपर्क राखत होतो काही पत्रके काढीत होतो. असे काम चालूच होते. ज्या वेळी पकडले त्या वेळी माझ्याबरोबर हॉटेलकर्मचारी संघटनेचे कार्यकर्ते मूर्ति होते. त्यानाही पकडले.

मला पकडले ते अरविंद या नावाखाली. खरं तर देवनार विभागात माझे नाव सुरेशकुमार होते. आम्हाला देवनारच्या औट–पोस्टवर नेले व तेथून मग स्पेशल ब्रँचला कळविण्यात आले आणि मग पुरा बंदिस्त झालो. कारण स्पेशल ब्रँचच्या गाड्या आल्या व त्यानी गुप्तचर शाखेच्या राजकीय शाखेच्या विशेष विभाग १ बीकडे आम्हाला सुपूर्त केले. तिथे सहाय्यक पोलीस आयुक्त सुरेश पेडसे व त्याचे सहकारी स्वागताला (!) होतेच.

आणि मग ?

मग काय, चौकशी सुरू झाली नावापासून, मी सुरेशकुमार सांगितले व मद्राससे नया नया आया है, असे बनावट सांगितले. पण ते काही खरे नव्हते. कारण पहिल्याच झापडीने डोळ्यासमोर काजवे चमकले कारण आता प्रत्यक्षात डायरेक्ट अॅक्शन सुरू झाली होती.

पोलीस–कहाणी सुरू झाल्याने माझ्या अंगावर काटा आला होता म्हणून म्हणालो, 'देवनाथजी पेडसे मारहाणीत भाग घेत होते ?'

: पेडसे यानी मला मारले नाही, पण मूर्तींना मारले. मला इन्स्पेक्टर व खास तयार माणसे होती.

: मारहाणीचे प्रकार ?

: कानावर कमावलेल्या हाताचा फटका मारावयाचा, तर मानेवर तिरपा फटका नाही तर दोन्ही हातांनी एकदम गालावर फटके मारावयाचे. पेडसे याची ऑर्डरच होती की, कुत्तेको खलास करेंगे !

हात वर टांगल्यासारखे करावयास लावीत आणि पाठीवर, ढुंगणावर सर्व शक्तीनिशी प्रहार करीत.

मार टळावा म्हणून दहिसर येथे माझ्या ओळखीचा आदमी आहे म्हणून सांगितले. त्यांनी चटकन गाडीत घातले. दहिसर रस्त्यावर सांगितले तेथे कुणीच ओळखीचे नाही. मग गाडीतच बडविले.

त्या रात्री केवळ दोन तास झोप आली म्हणजे घेऊ दिली होती.

तेवीस नोव्हेंबर मात्र फारच जड गेला, कारण सकाळीच भवानी झाली ती रुळाची. रुळाने शरिराच्या जॉइंट्सवर असे सडकविले की, अद्याप त्याचा त्रास होत आहे. केस धरून गदगदा हलविले. केस हिसकले एवढेच नव्हे तर तडातडा केस उपटले ! (देखो ना, कितने बाल पतले हो गये है !) रात्री तर बेड्या घालून टांगले व जिथे म्हणून मारता येईल तिथे तिथे बडविले.

पहाटे तिथे झोपलेला हवालदार उठला. त्याला मी फ्रेश वाटलो म्हणून त्याने पहाटेच मला ठोकपीट केली.

. मारहाण सतत एकच तुकडी करी काय ?

: नाही, नाही. सकाळी ताजी तुकडी सायकाळी वेगळी ताजी तुकडी.

एका तुकडीने मला टेबलावर झोपविले माझे पाय वर उचलले आणि दंडयाने दणादणा तळवे सडकविले. याला ते नालबदी म्हणत. तळवे सुजू नयेत म्हणून खोलीत मला पळावयास लावत. परत तळवे सडकीत

आणि मी तिसऱ्या दिवशी खरे नाव सागितले, की मी देवनाथन आहे.

पोलिसाना काही जिकल्याचा आनद झाला. पेडसे तर खदखदा हसले मलाही चहा दिला गेला काही वेळ स्वर्गसुखाचे क्षण (सर्वांनाच) मिळाले मारहाणीस काहीसा आराम. पोलीस दक्ष आता पुढे काय ? आणि स्वर्गसुख आटोपले.

पण तीन दिवस खरे नाव लपवायचे कारण काय ?

: या तीन दिवसात माझे सहकारी मुबई सोडू शकत होते. दूर दूर जाऊ शकत होते. म्हणून मीच ठरवले होते की, तीन दिवसापर्यंत आपले खरे नाव सागू नये.

. आय सी

: आता वेगळे सेशन लागले होते. नवी फ्रेश तुकडी आली होती. तीत मारहाणीतील एक्स्पर्ट असे लोक (नागरी वेशातील पोलीस) आले होते.

दस्तगीर म्हणून कुणी हेडकॉन्स्टेबल होता. काळाभिन्न, सतत तोड पानाने रगलेले. त्याने असे काही बडविले की, विचारता सोय नाही. (पण एक मानले पाहिजे, की तो खरोखरीच मारहाणीत ट्रेड होता.) अगदी शास्त्रीय पद्धतीने सर्व डोके रुळाने बडविले. मार तर लागतो; पण जखम होत नाही. (डोक्याचे मॉलिश करताना कसे सर्व डोके तासले जाते तसे. अर्थात मॉलिशचा आनद असतो. येथे तर बिंदुएवढी जागा सडकावयाची राहिली नव्हती. पंख्याने केस हलले तरी वेदनाच वेदना होत.

*आता मारहाणीसाठी वेगळी मेथड होती.* हाताचे दोन्ही अंगठे बारीक दोरीने एकत्र बांधले गेले होते. नंतर हात बांधले व टागल्यावर काखेत काठ्या घातल्या आणि मान व खादे बडवून काढले. मला टागलेले सोडले त्या वेळी एकदम खाली पडलो उभे राहणे शक्यच नव्हते. बोटे खलास झाली होती तर सर्व अग बधिर झाले होते. दोन्ही गाल पोलिसानी असे काही मॉलिश केले की जेवताच येईना !

' जेवण देत होते तर ?

. होय. हॉटेलातून चागले जेवण आणीत होते, परतु जबडा असा दुखायचा की खाताच येत नव्हते.

आता आणखी एक्स्पर्ट पोलीस आला. त्याचे नाव पाडू जमादार, तो गुन्हा अन्वेषण-शाखेकडील होता. त्याने सरळ धमकी दिली– पुछे सवालोको साफ साफ जबाब दो वरना शूट करूगा (आपन बहुत खराब आदमी है ) असे आठ दिवस काढले पोलीसठाण्यावर एका रात्री लॉकअपमध्ये टाकले लॉकअपमधील इतर कैद्यानी माझ्याकडे बघितले, की हा सुजलेला नवा अवतार कोण ?

महिनाभर प्रश्नोत्तरे चालली. त्या अवधीत माझे बधु, वकील घरचे लोक आले, परंतु त्याना कुणालाच भेटू दिले नाही. लॉकअपमध्ये टाकण्यापूर्वी काठीच्या चुकीच्या फटक्याने डोके फुटले होते. लॉकअपच्या स्वच्छते( ? ) मुळे जखम वाढत होती आणि एक दिवस आध्रातून माझ्या चौकशीला पोलीस आल्याचे समजले. आता पुरा सपलो असे वाटले. कारण आध्रात नक्षलवाद्यासाठी वेगळा पोलिसविभाग आहे. त्या विभागातील सुपरिटेंडेंट सुब्बा रेड्डी, एक डी. वाय. एस. पी. व एक इन्स्पेक्टर आले होते.

: माझ्या पोटात आधीच गोळा उठला होता *की आता देवनाथन काय सागणार ?* म्हणून उगाचच चेहऱ्यावर रुमाल फिरविला आणि म्हटले मग ?

. सुब्बा रेड्डी व त्याच्या सहकाऱ्यानी ताब्यात घेतले व पेडसे याच्यासमोर त्याची कारवाई सुरू झाली.

एका खुर्चीवर बसविले खुर्चीचे हातावर माझे हात ठेवले आणि काही बोलण्याआधीच *त्याचेवर रूळ रगडले. असा कळवळलो पण* ओरडताही येईना तोडावर हात होता ना ! कधी तर हाताचा पंजा चक्क उलटा मोडीत माझ्यासमोर खुर्चीवर बसत, पण खुर्चीचे पाय माझ्या पायावर असत. हातावर स्टुलाचे पाय ठेवून त्यावर ते बसत. त्याने हाताची कातडी सोलली गेली, पायाचीही गेली शिवाय अद्यापही काहीशी सूज आहे फार लिहिता येत नाही, की बसमध्ये उभे राहिलो तर आधारासाठी बार पकडता येत नाही

खरं होते ते हातावर सूज होती. मी हात न्याहाळले. देवनाथचा चेहरा आताही व्याकुळ झाला होता तेवढ्यात चहा आला म्हणून बरे झाले

देवनाथन आता स्वत च पुढे चालला होता त्याने म्हटले, मी मार टळावा म्हणून मला माहीत असलेल्या आध्रातील काही घटना सागितल्या परतु त्या त्याना आधीच माहिती होत्या. म्हणून परत बडविले. हाताचे बोटात टाचण्या खुपसल्या. दीर्घ किंकाळी फोडली पण उपयोग नव्हता. विलक्षण सहन केल !

खरंय ते

: महिना गेला. डोक्याची जखम चिघळली होती शिवाय मी काहीही बोलणार नाही हे ठामपणे सागितले. जखमेमुळे पोलीस घाबरले होते. त्यानी माझ्यासह जी. टी हॉस्पिटल गाठले. तो दिवस होता २१ डिसेंबर माझे डोके नळावर आपटल्याने ती जखम झाल्याचे इन्स्पेक्टरने तेथे उपस्थित लेडी डॉक्टरना सागितले.

: खरच का रे डोके नळावर आपटले ? डॉक्टर.

मी ढिम्म.

' परत विचारणा, मी गप्पच परंतु शेवटी डॉक्टरना सागितले, की पोलिसानी मारहाण केली आहे

आणि लेडी डॉक्टरानी ज्येष्ठ डॉक्टराना बोलाविले. त्यानी तपासले आणि पोलिसाना म्हटले, याला आम्ही ॲडमिट करतो.

पोलीसइन्स्पेक्टर घाबरले. वरिष्ठाना विचारतो म्हणून सटकले वरिष्ठ आले. त्यानी डॉक्टरांना सागितले, आम्ही याला पोलीसरुग्णालयात नेतो, परतु डॉ. तोडीवाला ठाम होते. म्हणाले, नाही. त्याला मी येथून हलवू देणार नाही.

*आणि आठवडाभर रुग्णालयात राहिलो.* डोक्याला प्लॅस्टिक सर्जरी केली. जखम

पृष्ठ १७ वर

पु. ल. देशपांडे, वि. स. खांडेकर, द. वा. पोतदार ही नावे जरी आपल्या मुलीला माहीत नसली तरी शुभदाबाईंना वाटतं ' It is quite natural, what's the harm in it ? '

# कॉन्व्हेंट शाळा : कशासाठी हा अट्टाहास ?

राजेंद्र पटवर्धन

' ए मम्मी, की नाही Ow Sister चा Brithday आहे ना आज ? म्हणून मला Ten Rupees ची Gift द्यायची आहे. दे न मला एक Teirne. '

होय, ह्याच त्या द्वादशवर्षीय कुमारी पिंकी. आज काय ' फेट ' आहे म्हणून पाच रुपये, उद्या काय ' गुड फ्रायडे ' आहे म्हणून केक्स करून आणा, परवा काय फादर डेमियनची पासष्टी आहे, म्हणून झकपक कपडे, पुअर बॉईजसाठी चॅरिटीज् म्हणून फीत दहा रुपये जादा ! पैसा वाहतोय्. पण पिंकीचे डॅडी–छे, हे काही दादा, बाबा करण्यातले नाहीत हं – म्हणतायत, ' पिंकी आमची कॉन्व्हेंटमध्ये जाऊन कशी स्मार्ट झालीय्. She is bold, she is outgoing. ' पण पैशाबरोबरच पिंकीच्या मम्मीच्या – सौ. शुभादेवी – डोळ्यातून नकळत पाणीही वाहतंय् पण आता उशीर झालाय्

' × × × to this country ! I'm going to U. S. A.– the land of fun & fiolic, rock is roll ... साला क्या है ये कंट्रीमें ? I don't want to rot over here. ' ओळखलंत ? हे श्री. सुरेंद्र मधवानी, B. E.( Telecom ) फर्स्ट क्लास फर्स्ट. अभ्यासात आणि हुशारीत नंबर एक. पण या ' Goddam Indian culture 'मध्ये अडकून पडणं हे त्यांना ' earthly reasons ' साठी पटत नाही. यांचं आयुष्य गेलं पुण्यात; पण पुण्यात मराठी साहित्य, सांस्कृतिक–सामाजिक–राजकीय प्रवाह यांच्याशी संबंध ठेवणं किंवा असे काही प्रवाह असू शकतील का याची चौकशी करणं याची कधी आवश्यकता त्यांना वाटली नाही. तीर्थरूपांबरोबर दारू आणि विड्या ओढायला लागल्यापासून घरात वैचारिक स्वातंत्र्य आलं, मग ' इंटलेक्चुअल ' व्हायला कितीसा वेळ ? आता अमेरिकेला गेल्यावर सर्वत्र मधवानी कुटुंबियात आयुष्यात कृतकृत्यता न पसरली तरच नवल

' Mey, who was this Shivaji × × × ? That × × × × जो IAS के टाईम History में सताता था. वोही क्या ?' हे अगदीच आपले श्री. महादेवराव बापू जाधव भारत सरकारच्या Archeological विभागाचे सचीव कोल्हापूरहून I A. S. ला बसून पराकोटीचे कष्ट घेऊन I. A. S पास झालेले जाधवसाहेबांना फार मोठा मान: ' इंग्रजी काय फर्डे बोलत्यात ! ' पण काय असेल ते असो, सिंहगडाला गेल्यावर जाधवसाहेबांना तसं काही वाटलं नाही ' शिवाजी कोण ? ' हा प्रश्न त्यांनी कसा सेकंदात सोडवला.

' Marathi Drama ? Forget man. These awful Marathi was do की नाही, कसले हेवी. I get bared तुम्हीच जा बुवा alone– I ' would prefer reading Star Dust. ' सौ. शुभदा गोखले, पूना विमेन्स कौन्सिलच्या अध्यक्षा. मुलांना ' इंग्रजी ' म्हणजे आपलं ' free & liberal ' अशा वातावरणांत वाढू देण्याइतकी प्रगत मनोवृत्ती असलेल्या. ' आमच्या मुलीचा किती छान mixed group आहे हो ! They have parties, they go on picnics But they are a nice group, so cosmopolitan—Kousalya Kalyanasundaram, Venu Ray, Peter D 'Souza, Deven Sharma & so on ' मग कु. शरयूला ह्या सौ. शुभदाबाईंच्या कन्यका– पु. ल देशपांडे, वि. स. खांडेकर, द. वा पोतदार – ही नावे माहीत नसली, तर शुभदाबाईंना वाटतं. ' It is quite natural. what's the harm in it ? '

पिंकी भिडे, सुरेंद्र मधवानी, जाधवसाहेब, शरयू गोखले ही कुणाची मुलं ? ही त्या ' हाय हाय ' सोसायटीची की आपल्या समाजाची, की आपल्या देशाची . . की त्यांच्या आईबापाची ? का विचारात पडलात ? उत्तर तसं अवघड नाही, जरी ते अवघडत द्यावं लागलं तरी ! ही सतती आहे आपल्या कॉन्व्हेंट शाळांची.

भारतात एक चमत्कारिक दृश्य दिसून येतं. कॉन्व्हेंट शाळा आणि उच्च उत्पन्न यांच एक अतूट आणि घनिष्ठ नात दिसून येतं. डॉक्टर, वकील, चार्टर्ड अकाउंटंट, मनदी अधिकारी, सधन शेतकरी, मोठ्या कंपन्यांचे अधिकारी यांपैकी बहुसंख्यांची मुलं कॉन्व्हेंटमध्ये शिकत असलेली दिसतील. घरची उत्कृष्ट सांपत्तिक स्थिती, आधुनिक सायुज्जता असल्यास जन्मजात बुद्धिचातुर्य आणि उच्चपदावर असल्यामुळे साहजिकच मिळालेली पालकाची सत्ता व प्रभाव यामुळे ही मुलं उत्तरायुष्यात लौकिकदृष्ट्या खूप पुढे येतात

आता एक प्रश्न असा आहे की, या मुलांचा विचार इतक्या खोलात जाऊन सहृदयपणे करण्याची इच्छा मला का व्हावी ? आणि आपण माझं म्हणणं ऐकावं असं मला मनोमन का वाटाव ? प्रश्न वास्तवतेला आणि लोकशाही विचारसरणीला धरूनच आहे. भारतात सधन लोक फक्त ५ टक्के. त्यांची मुलं कुठं का शिकेनात ? आपल्याला काय त्याचं ? त्यांच्यामुळे उरलेल्या ९५ टक्क्यांचं काय होणार आहे ?

या सगळ्याच उत्तर हेच आहे की, ही जी बोटावर मोजण्याजोगी का होईना, कॉन्व्हेंटमध्ये जाणारी मुलं आहेत त्यांच्यापैकी बहुसंख्य

आयुष्यात 'यशस्वी' होऊन खसवणार आहेत. 'I F S, I A S' मध्ये पहिली येणार आहेत, आपले 'मेहमान रावसाहेब कलेक्टर' म्हणून येणार आहेत. भारतात पाच हजार रुपये महिना असणाऱ्या ज्या बोटावर मोजण्याएवढ्या नोकऱ्या आहेत, त्या नोकऱ्या-ही मुल पटकावणार आहेत. परदेशांत आपल्या सास्कृतिक शिष्टमंळाचे नेते म्हणून जाणार आहेत. डॉक्टर, सी. ए, आय्. सी. डब्ल्यु. ए इत्यादी परीक्षा उत्तीर्ण होऊन स्वतःचे व्यवसाय थाटून सुबत्ता मिळवणार आहेत. अहमदाबादमध्ये Harvard Model वर M B A होऊन Business Executive होणार आहेत.

या सगळयाचा अर्थ एकच. इंग्रजी सभाषणावरच (भाषेवर असेल अगर नसेल) प्रभुत्व, छानछोकीचे कपडे आणि दैनंदिन जीवनात पुरेल इतपत बुद्धिमत्ता – या तीन वस्तूच्या भाडवलावर ही मुलं समाजाने देऊ केलेल्या सर्वोत्तम प्राप्तीच्या जागा गिळकृत करतात. – इतराचा पराभव करून! पाश्चात्य तऱ्हेचे उपभोग करण्यातली कुशलता आणि भारतीय भाषा, संस्कृति इतिहास, साहित्य, विचारप्रवाह, सगीत, कला यासबंधीच सपूर्ण अज्ञान ह्या दोन सर्वोच्च गुणांमुळं ही मुलं आपल्यावर सत्ता गाजवतात. नव्हे, नव्हे, आपण सर्वजण आपले भवितव्य त्याना बहाल करतो.

समस्या ही आहे की, या समानाच्या सर्वोच्च आणि सर्वोत्तम पारितोषिकाना ही मुलं लायक आहेत का? ज्याला तुलसीदास, ज्ञानेश्वर, अण्णासाहेब किर्लोस्कर, लाल–बाल–पाल, महात्माजी–यांच्याविषयी गंधही नाही, ज्याला 'आपली' म्हणावी अशी संस्कृतीच नाही, जो असा कालप्रवाहात अधातरी लोंबकळत दिसेल ती वस्तू गिळकृत करतोय, अशा व्यक्तीला तुम्ही सर्व आर्थिक साम्राज्यावर बसवताय, हा इतर समाजावर कठोर अन्याय नव्हे काय? पण हेच होतय आज.

'That ×××× शिवाजी' म्हणाणारा आपल्या ऐतिहासिक आणि पुराणवस्तु जतन करणाऱ्या प्राधिकरणाचा तो मुख्य होतोय ज्याला इंग्रजी भाषेशिवाय इतर भाषा बोलण्याचा कमीपणा वाटतो, ज्याचं मित्रवर्तुळ फक्त समान प्राप्तीच्या आणि सवयींच्या बदिस्त परिमितीत बंदिस्त आहे, ज्याला Soulsong हे माहीत आहे, पण लावणी म्हणजे काय माहीत नाही. रामायण आणि महाभारत यांना 'That mythological stuff' अशी सभावना जो करील, झोपडपट्टी ही ज्याला 'गलिच्छ' वस्ती वाटते. असा हा तरुण शासनाचा ब्लॉक डेव्हलपमेंट ऑफिसर किंवा समाज कल्याण खात्याचा किंवा सास्कृतिक खात्याचा सचालक होतो. अशा या नेमणुका या देशाला तारक की मारक असा प्रश्न वाचकानी स्वत लाच विचारावा.

पण ही झाली एक बाजू. पुढची आणि कॉन्व्हेंट शाळांची जी सर्वघातक बाजू आहे तिचा मी सविस्तर ऊहापोह करणार आहे.

मुलांच्या वयाची ३ ते १० वर्षे ही आत्यतिक महत्त्वाची असतात. मुलांच्यावर घराचे, समाजाचे, शाळेचे संस्कार जास्तीत जास्त होतात ते याच वर्षांत. मुलाची विचार करण्याची, कोणत्याही प्रश्नाची कारणमीमांसा शोधण्याची जिज्ञासु वृत्ती ही या वयात जोपसली जाते. प्रत्येक देशाचे जे खास मानबिंदू असतील–समजा छत्रपति शिवाजीमहाराज, महाभारत इ.–ते मुलांना कळून त्याच्या अंतर्मनाची घडण होते. लाक्षागृहात पांडवाना जाळण्याचा कौरवांनी केलेला प्रयत्न असेल, जिवाची बाजी लावून बाजीप्रभूने पावन केलेली घोडखिंड असेल, निर्भयतेने ब्रिटिश साम्राज्यसत्तेविरुद्ध गांधीजींनी दिलेला दांडीयात्रेचा लढा असेल, स्वातंत्र्यवीर सावरकरांनी बोटीतून घेतलेली ब्रिटिशांविरुद्धची झेप असेल, या घटनाचा तपशील अलाहिदा, पण या आणि अशा घटना या वयात मुलाना माहीत होऊन त्यांच व्यक्तित्व साकार होण्यास फार महत्त्वाच्या ठरतात. घरात आजी–आजोबा नातवडांना खूप गोष्टी सांगतात. मोठ्याना नमस्कार करावा, रामरक्षा म्हणावी इत्यादि कित्येक बारीक बारीक गोष्टी असतात आई–वडिलांशी कसं वागाव, त्याचा आदर कसा ठेवावा हे सगळं या वयात कळत असतं

उपरिनिर्दिष्ट गोष्टी याच 'भारतीय सस्कृतीचा शोभेल असा भावी नागरिक' असं ज्याच वर्णन करता येईल असा कुमार, तरुण नागरिक तयार करण्यास पुरेशा आहेत असा दावा कुणीच करणार नाही, पण उत्तरजीवनातील कर्तबगारी दाखविण्यास जी सास्कृतिक बैठक आवश्यक आहे किंबहुना व्यक्तित्वाला पूर्णता येण्यासाठी जी बैठक आवश्यक आहे ती बैठक तयार होण्यास वरील सर्व गोष्टींचा फार मोठा हातभार आहे असे म्हटले तर ते वावगे ठरू नये.

या सर्व गोष्टी मुलांच्या अगवळणी पडण्याचे माध्यम एकच आणि ते म्हणजे मातृभाषा, म्हणजेच एतद्देशीय भाषा. या भाषेचे जे बाळकडू मिळेल, त्यावरच मुलाची मूलभूत वैचारिक बैठक तयार होते.

कॉन्व्हेटच्या मुलाच दुर्दैव हे की, लहानपणापासूनच त्याना इंग्रजीसारख्या परकी भाषेशी मुकाबला करावा लागतो. या झगड्यामध्येच त्याची पाच ते दहा ही वयाची सर्वांत महत्त्वाची वर्षे वाया जातात. मग वैचारिक बैठक वगैरे सोडाच. जी मानसिक पोकळी निर्माण होते ती अत्यत दयनीय असते. तानाजीच्या शौर्याची हकिगत वाचून, श्री. बाबासाहेब पुरंदऱ्याच्या शिवचरित्रात बेभान होऊन, प्रत्यक्ष सिंहगडावर जाऊन तानाजीच्या प्राणांनी पुनीत झालेल्या भूमीला वदन करण्यामध्ये जो चित्त थरारणारा अनुभव आहे तो या मुलाना अनुभवायलाच मिळत नाही. श्रीरामाचा 'रामा' होतो. मग त्या रामायणातली अवीट गोडी या मुलाना कशी चाखायला मिळणार? मुलाच्या बौद्धिक वाढीला जे जे ऐतिहासिक, सास्कृतिक खाद्य पोषक आहे, तेच त्याना नाकारलं जातं. त्याच्या भावी व्यक्तित्वात त्यामुळे एक प्रचंड आणि कधीही न भरून येणारी पोकळी निर्माण होते.

या सगळयातून जे निर्माण होत ते चित्र चित्त विदीर्ण करणार नसलं तरच नवल. या मुलाचं मूलभूत अज्ञान जोपासलं जाऊ लागतं मराठी किंवा इतर स्वदेशभाषामध्ये शिकणारी मुल आपल्यापेक्षा दर्जाने कमी आहेत अशा त्याच्या समजाला सक्रिय खतपणी घातले जाते– अर्थात पालकाकडूनच! हा काही मुलाचा दोष नव्हे हे मात्र खरे. बाबाना 'ए डॅडी' म्हणणं स्वातंत्र्याचे, आधुनिकतेचे लक्षण होते. मग या मुलांना कौटुंबिक, धार्मिक कार्यक्रमाचा Boredom यावयाला लागतो. मराठी वाचता येत नाही आणि इंग्रजीच तुटपुजं ज्ञान यामुळे वर्तमानपत्राशी संबंध शून्य–आजी–आजोबाशी बोलतां येत नाही. नातेवाइकांशी बोलण्यात साहजिकच बेफिकिरी आणि तुसडेपणा येतो. या मुलाचे मित्रगण समाचरणीच, त्यामुळे याचा घोळका जमला की Rock N Roll सुरू, कारण सगीत हे तेवढंच ही कल्पना त्याची होते.

कदाचित हे परिणाम कोणाला फारसे गंभीर वाटणारही नाहीत. पण या सर्वांपेक्षा एक भयानक परिणाम होतो तो हा की, या मुलांची जर काही जन्मजात सांस्कृतिक, कलात्मक देणगी असेल, तर ती बाहेर येण्यापूर्वीच चिरडली जाते. कॉन्व्हेंटमधल्या मुलाना आपल्याला कु. माधुरी पारसनीससारखी बालकवयित्री चुकूनही सापडणार नाही, श्री. रविशंकरासारखा सतारिया दिसणार नाही, श्री. सतीश आळेकर, श्री. जब्बार पटेलासारखा प्रथितयश लेखक दिसणार नाही! खासाहेबाला दरमहा पुरेपूर प्राप्ति होईल, इतपत फी देऊन संगीत शिकणारे काही कॉन्व्हेंटमधले महाभाग दिसतील, पण त्याचा उपयोग फक्त पुढे संगीतकार्यक्रमाची तिकिटं खपवण्यापुरताच होतो.

जगात कोणत्याही पुढारलेल्या देशात लहान मुलाना परकीय भाषेतून शिकवण्याचा मूर्खपणा कोठेही होत नाही. माझ्या अनेक अमेरिकन मित्रांना जेव्हा मी भारतातील कॉन्व्हेंट शाळाचे प्रस्थ सांगितले तेव्हा त्यांचा विश्वासच बसेना. भारतात सगळ्यात आश्चर्य म्हणजे डॉक्टरलोकही आपल्या मुलाना आवर्जून कॉन्व्हेंट शाळात घालतात. कदाचित आपल्या मुलाची मानसिक आणि बौद्धिक वाढ खुटवण्याचे कार्य आपण करतो आहोत याची त्यांना जाणीवच नसेल. मग Child Psychology, Child welfare वगैरे विषयांचे उच्च शिक्षण तरी कशाला पाहिजे?

कोणी असे म्हणेल की, मुलाच्या मनाची जडणघडण होण्याला जास्त प्रभाव शाळेत कोणत्या भाषेतून शिक्षण दिले जाते, यापेक्षा घरात कसे वातावरण आहे यावर अवलंबून आहे. पालकानी जर भारतीय संस्कार आपल्या पाल्यावर केले, तर कॉन्व्हेंट शाळेत जाऊनही मुलांची व्यक्तिस्वं पूर्ण स्वरूपात येऊ शकतील. हा युक्तिवाद कितीही सोईचा वाटला तरी त्यात फारसं तथ्य नाही, याच कारण हे की, मुलाच्या स्वभावप्रवृत्ती या त्याच्या समवयीन मित्रावरून जास्त ठरत असतात. 'अमुक अमुक हा बोंगो शिकतो, म्हणून मी ड्रम्स शिकणार' असे असते. पुन्हा कॉन्व्हेंट शाळा म्हणजे पालकाना अभ्यास! सध्याकाळी छानपैकी कुठे खेळायला, हो हो अगदी हुंदडायला पोरानी जावं, तर इकडे संध्याकाळी 'मम्मी' 'फोर इंटू टू इज एट' अस आग्रहानं झटापट करून सागणार. बरं, जे काही अवातर जुजबी वाचन करावयाला वेळ मिळतो, त्यामध्ये ही मुल वाचणार काय तर 'फँटम कॉमिक्स'. ही कॉमिक्स वाचून दमल्यावर पुढचा उद्योग तर फार महत्त्वाचा—युनिफॉर्मला इस्त्री करण्याचा, बुटाला पॉलिश करण्याचा! 'आमच्या Mis की नाही, Clothes ना Iron केलेलं नसल तर annoy होतात वरं का!'—इति कु. पिंकी भिडे, त्यांच्या मम्मी त्यांच्याकडे कौतुकान बघत असताना. पण का हा अट्टाहास? त्याना मुलासारखं जगू द्या की जरा. हेअर स्टाइलस, झकपक कपडे, चकचकीत पॉलिश—हे सगळं पुढे आहेच की. वयाच्या दहाव्या वर्षापासून भोगलचं हे आपले सर्वस्व आहे अस मुलीना भासवून काय मिळवल या पालकानी? पण आपण हे विसरलात की, हे पालक एका प्रचड कॉस्मेटिक फर्मचे मार्केटिंग डायरेक्टर असण्याची शक्यता फार. पिंकी भिडे वयाच्या दहाव्या वर्षी लिपस्टिकचा हट्ट करते आणि भारतातील ५ टक्के अर्थसत्ताधीश फक्त स्वत साठीच्या चैनीच्या वस्तूंची बाजारपेठ निर्माण करतात, हा योगायोग नव्हे!

एकूण कॉन्व्हेंट शाळामुळे मुलाची अपूर्ण आणि अपरिपक्व अशी बौद्धिक, सास्कृतिक वाढ होते. त्याची असेल नसेल ती कलात्मक, साहित्यिक सर्जनशीलता खुरडली जाते, त्याच वर्तन वाऱ्याबरोबर उडत चाललेल्या दिशाहीन आणि दोरी तुटलेल्या पतगासारखं बेगुमान होतं, त्याची राहणी आणि विचारसरणी देशातील बहुसंख्य बाधवाच्या विचारांच्या, संस्काराच्या आणि समस्यापासून करोडो मैल दूर होते. 'स्वदेश', 'स्वभाषा', 'स्वधर्म' या उदात्त कल्पनाचं वारंही या मुलाना शिवत नाही... सगळे दुष्परिणामच! असे असून आपले सधन नागरिक आपल्या मुलाना कॉन्व्हेंट शाळामध्येच घालतात याला काय कारणं असावी?

प्रमुख कारण हे की, भारतात असलेले इग्रजीचे पुष्कळ प्रमाणामधील स्तोम आणि काही प्रमाणामधील महत्त्व. नवीन तत्रज्ञान इंग्रजीत असते. उच्चपदाच्या नोकऱ्यासाठी मुलाखती इग्रजीतून. कंपन्याचा कारभार इग्रजीतून. यामुळे भारतात 'इग्रजी येणे' म्हणजेच सुखासुखी नोकरी आणि पैसा मिळवणे असे समीकरण झाले आहे ही स्थिती समाजाच्या दृष्टीने कितीही घातक असली तरी, हे कबूल केलेच पाहिजे की, पुढील तीस वर्षे तरी भाषासंक्रमणाची जाणार, म्हणजेच इंग्रजीचे सध्याचे प्राधान्य २५ वर्षे तरी कायम राहणार.

दुसरे कारण हे की, पालकाचा असा दृढ समज असतो की मराठी किंवा कोणत्याही एतद्देशीय भाषेतील शाळेत जाणारी मुल बावळट आणि बुजरी होतात. त्याच्यात 'गटस्' नसतात. चर्चा, वादविवाद, मुलाखती या सर्वांमध्ये ती मागेमागे असतात. याउलट कॉन्व्हेंटमधील मुल टारगट असली तरी 'बोल्ड' आणि 'स्मार्ट' होतात.

तिसर कारण असे असते की, कॉन्व्हेंट शाळातून शास्त्रीय उपकरणे, क्रीडासाहित्य यांची रेलचेल असते, यामुळे मुलाना शिक्षण आणि आरोग्य दोन्हीची सायुज्जता पुष्कळ मिळते.

याखेरीज 'कॉस्मॉपॉलिटन' वातावरण, सगळेच बडे बापके बेटे असल्यामुळे मुलाना विषम पातळीवरच्या राहणीमानाचा उपसर्ग न पोहोचण्याची खात्री इत्यादी कारणे दिली जातात. अर्थात ती हास्यास्पद असल्याने आपण सोडून देऊ

पहिल्या तीन कारणामध्ये—म्हणजे सबबीमध्ये—काही तथ्य आहे. प्रश्न एवढाच आहे की, केवळ आपली मुल इग्रजीत निष्णात व्हावीत, बोल्ड आणि स्मार्ट व्हावीत, त्यांनी हजारो रुपये मिळवावेत, त्यांनी फर्स्ट क्लास फर्स्ट येऊन गोल्ड मेडलस मिळवावीत म्हणून पालकानी त्याची जन्मजात मनं खुरडून टाकायची? त्याची व्यक्तिस्वं कायमची अपूर्ण ठेवायची? त्याची कला, साहित्यजनक प्रतिभा दिसण्याआधीच मारून टाकायची? स्वसंस्कृति, स्वभाषा, स्वसमाज, स्वसमस्या इत्यादीविषयी संपूर्ण, सखोल व जागृत ज्ञान प्राप्त करून घेण्याचे या मुलाच जन्मजात स्वातंत्र्य पालकानी काढून घ्याव? आपली अद्भुतरम्य संगीतकला, आपलं नवनवोन्मेषशाली साहित्य याचे विस्तीर्ण प्रासाद नुसत्या नजरेखालून घालण्याचा हक्क पालकानी हिरावून घ्यावा?

मुलाना, 'स्मार्ट' बनवण्यासाठी ही किंमत? त्याच्या व्यक्तित्वाची? मुलाना इंग्रजी शिकवण्यासाठी कॉन्व्हेंटमध्येच जाव

लागतं असं नाही आपल्या हातात असलेलं इंग्रजी वर्तमानपत्र आपल्या मुलानी वाचाव, त्यात त्याना गोडी लागावी, अशा तऱ्हेचे प्रयत्न किती पालकानी केलेत ? 'नॅशनल जिऑग्राफिक,' 'स्पोर्टस्-वीक,' 'टाइम,' 'इलस्ट्रेटेड वीकली' इत्यादि नियतकालिक मुलाना शाळातून उपलब्ध व्हावीत, अशी मागणी किती पालकानी शाळाकडून केली आहे ? एखादा उत्कृष्ट इंग्रजी उतारा दिसला, तर 'डिक्शनरी' समोर ठेवून, त्याचा अर्थ समजून घेण्याचा प्रयत्न आपल्या मुलान करावा, असं उत्तेजन त्याला किती पालकानी दिलय् ? आणि एक महत्त्वाचे म्हणजे हे पालक उच्चपदस्थ आहेत. त्यांच्याकडे सर्व नियतकालिक आहेत, डिक्शनरी आहे, सर्व आहे. त्यांच्यावर असं कोणतंच संकट नाही की, ज्यामुळे इंग्रजी येण्यासाठी त्यांच्या मुलानी कॉन्व्हेंट शाळातच गेलं पाहिजे !

'स्मार्ट'पणाच आपल्याला जरा जास्तच वेड आहे. ते कमी झाल तरी हरकत नाही. 'बोल्ड'नेस म्हणजे चागल्या अर्थाची धिटाई ही मराठी शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांत कमी असते, ही वस्तुस्थिती आहे अर्थात नाटकासारखे सास्कृतिक कार्यक्रम, वक्तृत्वस्पर्धा, काव्यगायनस्पर्धा, बौद्धिक चढाओढी या गोष्टी आपल्या शाळांतून दरवर्षी होत असल्या, तरी त्यामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग फार कमी असतो. पालक आणि शिक्षक याच्यात जर अधिक सुसंवाद असेल, आणि विवादाला मुरड न घालता विद्यार्थ्यांच्या म्हणजेच पाल्याच्या प्रत्येक शकेचे निरसन करण्याची सहृदयता असेल, तर मराठी शाळातील मुलं धीट होण्याला काही वेळ लागणार नाही. पुन्हा अलीकडे महाविद्यालयातील विद्यार्थी (यात सर्व विद्यार्थी आले ) धीट नाहीत, असे म्हणण्याची धिटाई फारच कमी प्राध्यापक दाखवतील.

वरील गौण मुद्दे जरा विस्तारानेच साग्ण्याचे कारण हे की, आपल्या 'उच्च' समाजावर अशी उपरती काही आलेली नाही की, जीमुळे आपल्या मुलासाठी 'कॉन्व्हेंट' शाळा हे एकच भाग्यस्थान त्याना दिसावे.

तर अशा या अपूर्ण व्यक्तित्वाच्या बऱ्याचशा सुखलोलुप आणि कमालीच्या अज्ञानी अशा या 'कॉन्व्हेंट' समाजाकडे आपण आपली सर्वोच्च पारितोषिके आदान करत आहोत; पण या मुलाचा काय अपराध ? त्याच्या आयुष्याचे विध्वसन त्याच्या जन्मदात्यानी आपल्या कॉन्व्हेंटच्या जाज्वल्य प्रेमाखातर केलेले आहे.

वाचकहो, आता जून महिना आला आहे. आपल्यापैकी खूप जणांचे चिरजीव, सुकन्या शाळांच्या उबरठ्यावर उभ्या असतील. आपण विचार करा, त्याना कोणत्या शाळेत घालणार ? कदाचित आपल्यापैकी काहींना अजूनही कॉन्व्हेंटचे आकर्षण असेल, मी केलेली मीमासा अतिरेकी आणि अवास्तव वाटली असेल, पण निदान आपल्यापैकी एकजण तरी या कॉन्व्हेंटच्या भस्मासुरापासून आपल्या मुलाना सोडवील. कदाचित या मुलामधूनच उद्याचे तानसेन, कालिदास, सोपानदेव, अभिषेकी उदयाला येतील ! त्यांच्यासाठी हा लेख

पुण्याला 'स्वच्छ शाळा' स्पर्धा दरवर्षी होते. मला नेहमी आश्चर्य वाटतं, या कॉन्व्हेंट शाळानाच पहिलं बक्षीस का मिळातं ? तस काही अनपेक्षित काही नाही त्या शाळाच्या भिती स्वच्छ, तिथल्या मुलाचे कपडे स्वच्छ; पण सगळयात स्वच्छ, कोरीकरकरीत म्हणजे तिथल्या विद्यार्थ्यांची मन ! इतकी वर्षे या शाळात जाऊन मन कशी कोरी-करकरीत, कोणत्याही सुबुद्ध, सखोल विचाराचा ठसा न उमटलेली ! त्या कोरेपणासाठीच आपल्या 'उच्च' समाजाचा हा कॉन्व्हेंट शाळाचा अट्टाहास .. ☐

---

**एका नक्षलवाद्याचा छळ** . पृष्ठ १३ वरून

भरली होती. पोलिसाचा घोशा होताच लवकर ताब्यात द्या म्हणून. नाही तर तुझ्या भावाला म्हणजे मेजरला नोकरीतून मुक्त करू. आई-वापाना पकडू, अशा धमक्या चालू झाल्या होत्या आणि खरोखरच त्यानी पत्नीला- वासंती रामनला अटक करून माझ्यापुढे उभे केले. केवळ अर्धा मिनिट !

आध्रीय अधिकारी तर तिच्यावर रेप करण्याची धमकी देत होते. उभी राहा, साडी फेड अशी दमदाटी तिला देत विशेष म्हणजे त्या वेळी एकही महिलापोलीस त्याचे बरोबर नव्हती. शिवाय माझे बधू डॉक्टर व त्याच्या आड संघटनेचे चिटणीस त्याच्या प्रयत्नाने मी रुग्णालयात जास्त राहिलो असे होईल म्हणून डॉक्टराना विनंती केली मला मुक्त करा.

आणि मी दोन हप्त्यानतर जानेवारीत मुक्त झालो. म्हणजे रुग्णालयातून. पोलिसांनी परत ताब्यात घेतले व १८ जानेवारी रोजी मला मिसा लावला माझ्याबरोबरच वासंती-लाही मूर्ति, खैरमोडे, रामचद्रन, मी या सर्वांची रवानगी नागपूरला तर वासंती येरवड्याला.

आम्ही मिसाबदी झालो व त्याच रात्री, उत्तर रात्री म्हणू या, लोकसभा-निवडणुका जाहीर झाल्या.

निवडणुका जाहीर होताच तुम्हाला इतराप्रमाणे सोडले नाही काय ? या प्रश्नाला देवनाथन खळाळून हसला. त्याने म्हटले 'जब तानाशाहीका पूरा खात्मा हुवा तब मुझे २१ मार्च को रिहा कर दिया !'

आमचे बोलणे सपले होते. जणू त्याची मारपीट मीच करीत होतो अशी माझी अवस्था, तर त्याची झाले एक पर्व अशी. अशा अवस्थेत उठलो असतो तर गंभीर वातावरण राहिले असते. म्हणून देवनाथनला पूर्व-आयुष्य विचारले. त्यानेही त्वरित भानावर येत सागितले तसा जन्मापासून मुंबईतच शिक्षणानतर मुंबईत लेक्चरर म्हणून काम केले. त्याच अवधीत ७०-७१ मध्ये कलकत्याला नक्षलवाद्यांनी मोर्चा काढला. त्यात भाग घेतला. त्या वेळेपासून त्या चळवळीत भाग. ७३ ला युवक विद्यार्थीचळवळीत भाग व या अवधीत मजूरचळवळीवर लिखाण करीत होतो. नतर पार्टीचे पूर्ण वेळ कार्य सुरू केले. अद्याप चालू आहे.

आणखी काही ?

सरकारने [ महाराष्ट्र ] आणीबाणीतील पोलिसानी केलेल्या अत्याचाराचे चौकशी-साठी खुद्द पोलिसमहाप्रमुखांनाच नेमले आहे. हा प्रमुख आपल्याच अधिकाऱ्याविरुद्ध अहवाल देईल काय ?

मग काय करावे ?

न्यायलयीन चौकशी समिती हवी.

ही सूचना मोलाची व योग्य होती. ☐

# पैसा नाही म्हणून मुलगी देवदासी होते, हे म्हैसाळमध्ये आज घडत नाही, घडणार नाही, अशी त्या स्त्रियांची जिद्द होती. . . .

# मुक्काम म्हैसाळ

कुसुम कर्णिक

म्हैसाळच्या हरिजन वस्तीतल्या समाजमंदिरात आम्ही जमलो होतो. पाऊणशे-शभर स्त्रिया, त्याची मुले सारे कुतूहलाने बघत होते मिरजेच्या कन्याशाळेतले दोन शिक्षक श्री. केळकर आणि श्री. देवल शास्त्राचे काही प्रयोग करून दाखवत होते. डब्यातून पडणारे पाणी छूमंतर करून थाबवत होते, सुरू करत होते आणि 'तुझ्या म्हशीच दूध असच बद करीन नाही तर हा ताईत घे,' असा देवऋपिछाप धाक दाखवत होते आणि हसत हसत हे सारे कसे घडते ते सोप्या शब्दात समजून देत होते. विस्तवाच्या स्पर्शाशिवाय पाणी मारलेला कागद कसा पेट घेतो, हे दाखवून त्यानी भानामतीमधली आगच काढून घेतली. चबूच्या तोंडापेक्षा मोठे असलेले अंडे हात न लावता त्यानी आत घालून दाखविले आणि तुझ्या पोराच्या अगातल भूत या बाटलीत आता बंद केल आहे, असे गमतीने सागून स्पष्टीकरण दिल. यासारखे अनेक प्रयोग त्यानी करून दाखविले आणि देवऋषी, भोंदू साधू, कुडमुडे ज्योतिषी याचे पितळ उघडे पाडले.

ही कल्पना गेले कित्येक दिवस श्री. मधुकरराव देवल मनात घोळवीत होते, इतराशी बोलत होते खेड्यातल्या माणसाच्या अंधश्रद्धावर प्रहार व्हायला हवेत. त्याला शास्त्रीय माहिती नसल्याने तो सारखा फसत जातो. खोट्या प्रचाराला, धमक्याना बळी पडतो आणि सर्वांत वाईट म्हणजे तो ज्ञानाकडे, सत्याकडे, वास्तवतेकडे, शास्त्राकडे त्यामुळे पाठ फिरवितो. यातून त्याची प्रगती थाबते, म्हणून त्याच्या अंधश्रद्धावर घाव बसायलाच हवा. तो व्याख्यानातून बसणार नाही, पण अशा प्रात्यक्षिकातून बसेल, ही त्याची कल्पना, चौकटीबाहेरचे शिक्षण समाजाला द्यायला ही प्रात्यक्षिके फार मोल्यवान ठरतील. त्या दिवशी ही कल्पना प्रत्यक्षात आली आणि तिच्या प्रभावाची साक्ष पटली.

सागलीपुढे मिरज, मिरजपासून ६-७ मैलावर म्हैसाळ आहे. ५-६ हजार वस्तीचे हे गाव आहे. तिथे श्री विठ्ठल संयुक्त सहकारी शेती सोसायटीचा संसार हरिजनवाड्यात आज उभा आहे. श्री. मधुकरराव देवलाच्या स्वप्नाचे हे प्रत्यक्ष रूप. हरिजनांची सावकाराकडे गहाण पडलेली जमीन सोडवून ती पाण्याखाली आणली आहे. त्यातून विविध पिके काढून हरिजन त्याच्या गरिबीला मूठमाती देत आहेत. शेतीच्या जोडीला घरोघरी म्हैस पाळून दुधाचा धंदाही सुरु केला आहे. हरिजनाची मान उंचावते आहे, त्याना माणुसकीचे दर्शन होते आहे त्याच्या जीवनाला मानवीपण लाभते आहे त्यांच्या घरात दोन वेळा चूल पेटते आहे

अशा या विठ्ठल सहकारी सोसायटीतल्या स्त्रियाचे शिबिर भरले होते तीन दिवस, १०, ११ व १२ मे ७७ पहिला दिवस चर्चेचा होता. सभेत बोलायला स्त्रिया किती तयार होतील, याचा काही अदाज नव्हता. पहिला प्रश्न मी उपस्थित केला–'आपण साऱ्याजणी आज एकत्र जमलो आहोत. आपल्याला एकत्र यायला आवडते का एकटेच बसावेसे वाटते ?' यावर अनेकजणी म्हणाल्या, 'एकत्र यावेसे वाटते '

'एकत्र का यावेसे वाटते ?' मी.

'गप्पा मारायला मिळतात ' एकजण म्हणाली

'वैरणकाडी, फाटी आणताना सोबत होते ' दुसरी म्हणाली

'कामात मदत होते. हडा उचलायला हात लागतो.' तिसरी म्हणाली.

'आजारपणात सोबत बरी वाटते.' चौथी म्हणाली.

'रोजगार मिळायला सोपं होत.' पाचवीने उत्तर दिले अशी भराभर कारणे मिळत होती.

'म्हणजे आपण एकत्र आलो आहोत ते बरोबर आहे, असे तुमचे सर्वांचे म्हणणे दिसते आहे ? ' मी विचारले.

'आज आपले बायाचे शिबिर इथे भरले आहे तसेच शाळेमध्ये पुरुषाचे शिबिर वेगळे भरले आहे. ही अशी वेगळी शिबिरे तुम्हाला बरोबर वाटतात का ?' मी विचारले.

'ताई, ते बरोबरच आहे. आम्ही बाया अडाणी आहोत, आम्हाला काय समजतंय ? आमची इकडे वेगळी सभा आहे ते बर आहे.'

'तुम्ही अडाणी कशा ? तुम्ही घरची सगळी काम करता, मुलाबाळाच तुम्हीच करता, म्हशीच सार तुम्हीच बघता, शेतीचं काम करता, मोलमजुरी करता मग तुम्ही अडाणी का समजता स्वत.ला ?'

'आमची अक्कल आमच्यापुरती म्हणून आम्ही अडाणी. आम्हाला काय कळतय जगाचं काय चाललंय ते !'

'अस्स, म्हणजे आपली अक्कल आपल्यापुरती म्हणून आपण अडाणी आणि म्हणून आपली वेगळी सभा.'

'व्हय, आन् आपली कामबी वेगळी आहेत वेळ मिळंल तसं आपण जमणार.'

'आपली काम वेगळी म्हणजे कोणती ?'

'आमचो काम म्हणजे घरच बघायचं, पोराबाळाच बघायच, दुखणबाणं काढायच, स्वयंपाक, भाडी, धुणी, पाणी, लाकूड-फाटा बघायचं, म्हशीचं करायच. या कामातून फुरसत मिळतीया कुठ? सकाळी उठल्यापासून सुरू होईल ते झोपेपर्यंत चालूच. कधी सुटका नाही की काही नाही'

'आपल काम वेगळ असत तर मग आपल्याला त्याविषयी माहिती देणारा वेगळा कार्यक्रम आपल्याला हवा का?' यावर होय उत्तर आल्यावर मी त्यांच्यापुढे शिबिराचा कार्यक्रम माडला. मिरजेहून डॉ. जुन्नरकर येणार आहेत. लहान मुलाचे आरोग्य, आजार, औषधपाणी, काळजी, घराची स्वच्छता या विषयावर ते सागणार आहेत पशुवैद्य 'माझी म्हैस' या विषयावर माहिती देणार आहेत. शास्त्राचे दोन शिक्षक शास्त्रीय वास्तव आणि जादू-टोणा यावर सागणार आहेत. शिवाय ग्रहणे कशी लागतात हे मॉडेलसह समजून देणार आहेत.' हा सारा कार्यक्रम मान्य झाला.

आमची बायाची सभा, त्यामुळे मुलेबाळे आमच्या भोवती होती. मधूनच त्यांचे रडणे, ओरडणे सुरू व्हायचे. बायाना गप्पाची लहर यायची आणि मग वाळवटातल्या झऱ्यासारखी आमची सभा लुप्त होऊन जायची. अशा वेळी मी गप्प बसून राहायचे. तर त्याच्यातला यलाप्पा अस्वस्थ व्हायचा, दटावायचा. 'गप्प बसा, शात बसा' असा घोशा लावायचा पण गडबड सुरू होणे किंवा थाबणे आमच्या हाताबाहेरचे होते. गडबड कमी झाली की, मी परत सभा सुरू करत होते.

'आपण एकत्र यायचे, सभा घ्यायची, हे सारे आपले ठरले आहे. सभेत आणखीही काही ठरवायचे असते. त्याला ठराव असे म्हणतात. असे आपण काही ठरवायचे का?' होय उत्तर आल्यावर मी पुढे माडले. 'आपण असे ठरवायचे का की आजपासून आपण अडाणी राहायचे नाही.' साऱ्यानी हा ठराव मान्य केला. मी पुढचा ठराव मांडला 'सभेमध्ये एका वेळी एकीनेच बोलायचे आणि बाकीच्यानी ते ऐकायचे' हाही ठराव मजूर झाला आणि आश्चर्य असे की आतापर्यंत आटोक्यात न आलेली गडबड थांबली आणि पुढची सभा सुरळीत सुरू झाली

मग मी माडले, 'सभा घ्यायची तर कशासाठी? सभेमध्ये आपण आपले दु:ख माडायचे असते, आपल्या अडचणी सागायच्या असतात आणि इतराच्या ऐकायच्या असतात आपले दु ख आपल्याजवळ ठेवायचे नाही आजपर्यंत आपल्याला हे शिकवले गेले की, 'घरोघरी त्याच परी, न बोलेल तीच खरी' हे बरोबर नाही. एकमेकीचे दु:ख समजले की, मग लक्षात येते की, आपले सर्वांचे दु:ख पुष्कळसे सारखेच आहे. आपल्याकरिता काही खास दु ख ठेवले आहे असे नाही. आपली दु खे एकाच परिस्थितीतून निर्माण होतात, भ्रष्टपणापासून निर्माण होतात. ती परिस्थिती बदलली म्हणजे ही दु खं कमी होतील हे समजून घेतले पाहिजे. एकमेकीच्या दु:खातला वाटा उचलला पाहिजे दु ख मुकाटचाने सहन करून मिटत नाही किंवा आक्रोश करून, भांडून ते सपत नाही.

दुपारच्या सत्रात अडाणीपणावर चर्चा झाली. अडाणीपणा घालवायचा तर आपल्यापुरता विचार करून थावायचे नाही, सर्वांचा एकत्र विचार करायचा. आपली अक्कल आपल्यापुरती ठेवून भागणार नाही. एकेकटचाने विचार करून उपयोग होत नाही. गरिबाच्या अडचणी एकत्र येऊनच सुटतात. आपल्या अडचणी खूप आहेत, दु.ख खूप आहेत. आपणच असे गरीब का? आपल्याला साधे औषधपाणीसुद्धा का मिळत नाही? आपल्याला शिक्षण नाही, रोजगार नाही, धड रस्ते नाहीत, काही सोयी नाहीत, गावात वीज असली तरी आपल्या घरात अधार आपल्या धान्याला भाव नाही. पण बाजारात सगळ्या गोष्टी महाग; असे का? या सर्व गोष्टींचा आपण विचार करायला हवा असे मी प्रथम माडले.

यावर चर्चा सुरू झाली. सोनाबाई म्हणाल्या, 'गोडेतेल इतक महागलय की तेल परवडत नाही. रोज १० पैशाच तेल आणलं तर काहीसुदीक होत नाही.' दुसरी म्हणाली, 'डोईचं तेल तर भेटतच नाहीस झालय.' तिसरी म्हणाली, 'आमच्या कपाळाला सारा दिवस काम लागलय ते काही सुटत नाही आता त्यातून ही म्हैस आमच्या डोक्याशी आणून ठेवलीय, ह्याच काय करायच ते सागा आम्हाला' ही स्त्री-वर्गाची नेहमीची तक्रार आहे आणि यावर काही तोडगा नजीकच्या काळात निघेल असे वाटत नाही, म्हणून मी हा विषय तसाच सोडून दिला.

सोनाबाई म्हणाल्या, 'आम्हाला शिक्षण हवे. कशावर अगठा करतो आम्हाला काही समजत नाही. सोनाबाई उठ, अगठा कर म्हटल की सोनाबाई अगठा करते. कशावर केला काय माहिती? मला कळायला पाहिजे.'

'हा आम्हाला शिक्षण पाहिजे या पोरी, दोनदोन तास पुस्तक पुढचात घेऊन त्यावरून डोळे फिरवीत बसतात. काय करत्यात काय माहीत? आम्ही पाहिले तर नुसते किडयागत वाटत त्या मजेत बसतात दोनदोन तास' दुसरी म्हणाली. अशी अनेक मते शिक्षणाच्या बाजूने मांडली गेली

दुसरा दिवस– सकाळी ९॥ च्या सुमाराला आम्ही समाजमदिरात गेलो बाया उत्सुकतेने जमत होत्या. कालपेक्षा आज सख्या जास्त होती. ह्या सत्रात प्रथम वर्णन केलेले शास्त्राचे प्रयोग झाले. दुपारचे सत्र होऊ शकले नाही. पावसाने खड आणला. दुपारी वैरणकाडी आणायला गेलेल्या बाया भिजून आल्या. बऱ्याचजणी एका कपड्यावरच असतात, त्यामुळे सभेला येणे कठीण झाले. डॉ. जुन्नरकराचे भाषण त्यामुळे होऊ शकले नाही डॉक्टरानी हे भाषण व फिल्म परत कधी तरी स्त्रियांच्या सोयीने करू असे सागितल्यामुळे बरे वाटले

तिसऱ्या दिवशी सकाळी सत्र मोठे होते. व्याख्याने आणि समारोप करायचा होता. बायाची संख्या आज ११५ पर्यंत होती. पहिले व्याख्यान 'माझी म्हैस' व दुसरे व्याख्यान 'पशुधन' यावर झाले. म्हशीची माहिती ऐकत असताना बाया माना डोलावून दाद देत होत्या. स्वत:ला अडाणी समजणाऱ्या बाया प्रश्न विचारत होत्या, अनुभव सागत होत्या. आता त्या अडाणी नव्हत्या. हा विषय त्याचा होता म्हणजे अनुभवाची कमतरता हेच अडाणीपणाचे खरे कारण आहे तर! घराशी बाधल्या गेलेल्या बाईला जीवनाच्या छोटचा वर्तुळातच सतत फिरावे लागते, हेच तिचे खरे दुःख आहे.

स्त्रियाचे कामाचे दु ख परत परत उसळून येत होते. एक म्हणाली, 'आज सभा म्हणून घरच्या धन्याला वैरण आणायला सागितली-

वैरण घालायला गेले तर पहिला तिच्यात साप हाताला लागला.' व्याख्यात्यापैकी एकाने विचारले, 'तो साप काही मुद्दाम आणला असेल का?' 'काय म्हायती परत सागू नये म्हणून पण आणला असेल.' तिने वैतागाने उत्तर दिले. मला शहरातला चहासुद्धा येत नाही म्हणणाऱ्या पुरुषाची आठवण आली. पण मी विषय परत टाळला 'म्हशी पुरुषाना दूध काढू देत नाहीत. त्यानी पहिल्यापासून कधी सवयच ठेवली नाही.' दुसरीचा उद्रेक

या स्त्रियाच्या उद्रेकावर श्री. केळकरानी उत्तर दिले, 'माझ्या घरात गळत होते चिखल होत होता. ते काम मला, माझ्या घरच्या लोकांनाच करावे लागले. घर आपले म्हटले की, घरचे काम आपोआप करावेच लागते. तुमच्या पुरुषाना घरात रस वाटेल असे तुम्ही वागविले पाहिजे.' हे उत्तर काहीसे निरुत्तर करणारे आहे. परंतु त्यातून निघणारे खूपसे प्रश्न अनुत्तरितच रहाणार आहेत.

नंतर श्री. देवलगुरुजी यानी भौगोलिक माहिती दिली. पृथ्वीचा आकार, तिचे भ्रमण, चंद्रसूर्य-ग्रहणे अशी ही माहिती होती. राहू-केतूची भीती, गैरसमजुती यावर हल्ला करण्यासाठी शास्त्राचा हत्यार म्हणून उपयोग करायचा आहे. वास्तवाची जाणीव माणसाला खोटया भीतीपासून मुक्त करते.

या सत्राला पुण्याहून माई केदारी आल्या होत्या. कमलाताई पाध्ये या शिबिराचे सचालन करणार होत्या. त्याची अनुपस्थिती फार जाणवत राहिली. माईंनी त्याच्या भाषणात स्त्रियाच्या सामर्थ्याची जाणीव दिली आपल्याला हवे ते आपल्याला मिळवायचे आहे, हे आग्रहाने सांगितले.

शिबिराच्या समारोपाला शिबिरार्थी स्त्रियानी बोलावे, अशी सूचना माईंनी केली. त्याप्रमाणे सोनाबाई, ताराबाई आणि रुक्मिणीबाई पुढे आल्या. शिबिराने आमचा फायदा झाला, आम्हाला माहिती मिळाली, आमच्या डोक्यात विचार सुरू झाले, आम्हाला अशी शिबिरे पाहिजेत आठ-पधरा दिवसानी आम्हाला सभा पाहिजे. आमच्या अडचणी आम्हाला माडावयाच्या आहेत. आमच्या मुलाना शिक्षण हवे आम्ही त्याकरिता पैसे गोळा करायला तयार आहोत. अशा अनेक गोष्टी त्यानी माडल्या

सभा सपल्यावर बाया खूप बोलत होत्या नव्या जाणिवा त्या घ्यायला तयार आहेत. त्याना अडाणीपणाबद्दल दुःख आहे शिक्षणाबद्दल आपुलकीने त्या बोलत आहेत. विठ्ठल सोसायटीच्या तरुण-वर्गाने इथला देवदासीचा प्रश्न सोडवायला घेतला आहे मुलीचे लग्न करता येत नाही म्हणून मुली देवदासी केल्या जातात, हे थाबले पाहिजे, यासाठी बस्तीतील मुलीच लग्न पैशावाचून अडून देत नाहीत सोसायटीतून त्याला कर्ज देतात. पैसा नाही म्हणून मुलगी देवदासी होते, हे आता म्हैसाळमध्ये घडत नाही, घडणार नाही अशी त्याची जिद्द आहे

'दादाच्या (देवलाच्या) मुळे आमची दशा पालटली' साऱ्याजणी माझ्याजवळ सागत होत्या. अभिमानाने स्वतःची म्हैस मला घरी नेऊन दाखवीत होत्या कर्जफेडीविषयी निर्धाराने बोलत होत्या. 'दादानी आमच्यासाठी खूप केले, आता आमी जरा हातपाय हलवले पाहिजेत. त्यानी किती करायचे!' असे सागत होत्या.

मला हा अनुभव खूप काही शिकवून गेला आहे □




# लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी १९४८-४९

**लेखक : पु. ल. इनामदार । राजहंस प्रकाशन, पुणे । मूल्य : वीस रुपये**

जेम्स अर्ल रे सापडला होता ... एक शिकार संपली होती.

# पाठलाग

## सौ. मेधा ताटके

८ जून १९६८. लंडन विमानतळ, मुख्य कचेरीत स्कॉटलंड यार्डचे काही गुप्तहेर प्रवाशांच्या नावांच्या याद्या तपासण्यात मग्न आहेत. काम अतिशय काळजीपूर्वक चालू आहे आता फक्त ब्रूसेल्सकडे जाणाऱ्या विमानप्रवाशांची नावे तपासण्याचे बाकी आहे या यादीत तरी त्यांना ते नाव सापडायला हवे, नाहीतर कितीतरी दिवसांचे श्रम फुकट जाणार आहेत 'हेच ते, हेच ते नाव!' त्यांच्यापैकी एकजण आनंदाने म्हणाला. स्वत:ची खात्री करण्याकरिता त्याने परत एकदा एफ. बी आय. ने काढलेल्या 'ऑल पोर्टस् वॉर्निंग'शी ते नाव पडताळून पाहिले आणि आनंदाच्या भरात सर्वांनी एकमेकांशी हस्तांदोलन केले.

स्वत:चा चष्मा अन् एक हलकासा रेनकोट सावरत तो एकटाच उभा आहे. थोड्याच वेळाने सुटणाऱ्या विमानाने तो ब्रुसेल्सला चालला आहे. एका खांबाला वळसा घालून तो जरा पुढे येतो न येतो तोच कोणी तरी त्याला म्हणाले, 'आपण कृपा करून जरा बाजूला येता का?' आवाज ओळखीचा नव्हता. शब्द प्रश्नार्थक असले तरी, उच्चार आज्ञार्थी होते. त्यात हुकमत होती.

आणि येथेच एका शिकारकथेचा शेवट झाला. डॉक्टर मार्टीन ल्यूथर किंग यांचा खून करून अमेरिकेच्या 'फेडरल ब्यूरो ऑफ इन्व्हेस्टिगेशन या संस्थेच्या गुप्त हेरांना गुंगारा देऊन हजारो मैलांचा प्रवास करणारा खुनी सापडला होता.

हा पाठलाग सुरू झाला ४ एप्रिल १९६८ च्या सध्याकाळपासून. सायंकाळी ठीक ६ वाजता डॉ. किंग मेंफिसमधील लॉरेन मोटेलमध्ये लोकांना भेटणार होते. लोक त्यांच्या लाडक्या नेत्याच्या दर्शनाला उत्सुक होते. रस्त्याच्या दुतर्फा गर्दी वाढतच होती.

तो आता त्याच्या हॉटेलच्या बाथरूममध्ये आला आहे. आत येताच त्याने बाथरूमचे दार बंद केले व बंदूक ठाकठीक असल्याची खात्री करून घेतली खिडकी उघडून त्याने अंतराचा अंदाज घेतला. बरोबर समोर असलेला लॉरेन् मोटेलचा व्हरांडा साधारणपणे २०० फुटावर होता. सर्व नीट जमले आहे आता फक्त समोर डॉ किंग दिसण्याचा अवकाश ..

२०० फुटांवरून सुटलेली ती गोळी वायुवेगाने डॉ. किंग यांच्या शरीराला भिडली. 'ओ! किंग हॅज् गॉन! डेड्!!' डबडबलेल्या डोळ्यांनी लोक आश्चर्य व्यक्त करू लागले.

बाथरूममधील त्या आकृतीने क्षणाचाही विलंब न लावता बंदूक पिशवीत घातली अन् पिशवी खांद्यावर अडकवीत झपझप पावले टाकीत तो हॉटेलमधून जाऊ लागला. 'हा आवाज तर बंदुकीच्या गोळीचा वाटतोय!' हॉटेलचे मालक त्याला म्हणाले. 'हो, वाटतोय खरा!' तो हसत उत्तरला आणि काही मिनिटातच त्याच्या पांढऱ्या फोर्ड मुस्तांगने वेग घेतला.

मेंफिस शहरातील पोलिसांना पहिल्या काही तासात असे कळून आले की, गोळी समोरच्या हॉटेलमधील बाथरूममधून आली असावी. सूक्ष्म ध्वनिदर्शक यंत्रातून बाथरूमची तपासणी करण्यात आली. हॉटेलमधील लोकांना अनेक प्रश्न विचारण्यात आले. मध्यरात्रीपर्यंत ही माहिती गोळा करून एफ. बी. आय. च्या प्रतिनिधीने वॉशिंग्टनच्या प्रमुख कचेरीस फोन लावला, 'त्याचं नाव जॉन विलर्ड. उंच, बांधा मध्यम, त्याच्याजवळ १९६६ च्या मॉडेलची पांढरी फोर्ड मुस्तांग आहे.'

मधल्या वेळात पोलिसांना रेमिंग्टन ३०.०६ या जातीची बंदूक सापडली. ती बंदूक, बंदुकीला असलेली दुर्बिण आणि बंदुकीच्या गोळ्यांचा एक डबा ३० मार्च रोजी हार्वे लॉयर नावाच्या माणसाने खरेदी केला होता. त्या भारी किंमतीच्या बंदुकीवरील ठसे अत्यंत अस्पष्ट होते जॉन विलर्ड आणि ती बंदूक खरेदी करणारा हार्वे लॉयर यांचा कल्पनेतही संबंध जोडण्यात येत नव्हता गुप्तहेर आता त्याच्या पांढऱ्या मुस्तांगच्या शोधात होते.

ती गाडी ११ एप्रिल रोजी अटलांटा शहरात सापडली. अत्यंत कसून तपासणी, नंतर गाडीच्या आतल्या बाजूला हिरव्या रंगाच्या दोऱ्याचे काही तुकडे सापडले. असलेच तुकडे मेंफिसमधील त्याच्या हॉटेलच्या खोलीत सापडले होते. गाडीत चिकटविलेल्या तक्त्यावरून असे कळले की, गाडी नुकतीच लॉस् एंजिलस्मधून साफसूफ करून आणली होती. गाडी विकत घेणाऱ्याचे नाव होते 'एरिक् एस्. गाल्ट' आणि पत्ता होता– '२६०८ हायलँड अॅव्हेन्यू, बर्मिंग हॅम्, अलाबामा.'

आणखी असेही समजले को, लॉस् एंजिलसमधील एका नृत्यशाळेतून पदवी घेऊन तो नुकताच बाहेर पडला होता. नृत्यशाला–प्रमुखाच्या मदतीने प्रतिनिधींना गाल्टच्या फोटोची प्रत मिळू शकली.

त्या फोटोला रेल्वेस्टेशन्स, हॉटेल्स् बार्स अशा ठिकाणी झपाट्याने प्रसिद्धी देण्यात आली. विलर्ड ऊर्फ लॉयर ऊर्फ गाल्ट नोव्हेंबर ६७ ते मार्च ६८ या काळात लॉस् एंजिलसमध्ये राहिला असावा, असे प्रतिनिधींचे मत पडले. शेकडो लोकांनी त्याच्याबद्दल माहिती पुरविली. तो मधूनच तिरळा बघे व बालेही तोतरा. तो कधी नोकरीधंद्यावर जाताना दिसलाच नाही. तो अतिशय मद्यपान करीत असे. त्याच्या अशुद्ध उच्चारावरून तो फारसा शिकलेला नसावा हे दिसत होते. तो बुद्धिमान नव्हता, पण खोटे बोलून लोकांना फसविण्यात पटाईत होता.

आता हळूहळू त्या 'शिकाऱ्याचे' अंधुक आकृतीवरून 'व्यक्तीत' रूपान्तर होत होते. परंतु त्याच्या सध्याच्या अस्तित्वाबद्दल फारसा बोध होत नव्हता.

अटलांटामधील हॉटेल्स आणि बोर्डिंग्ज यांची तपासणी करीत असताना अचानकपणे

एरिक एस्. गाल्ट या माणसाच्या नावावर आलेली काही पत्रे सापडली. एफ बी आय.च्या २२ प्रतिनिधींनी त्या पत्त्याच्या घराला वेढले. गाल्टने त्या घरातील खोली भाड्याने दिली होती. खोलीत काही नकाशे होते. पैकी एक होता अटलांटा शहरातील रस्ते दाखविणारा. नकाशावर डॉ. किंग याच्या घराभोवती पेन्सिलीने वर्तुळे काढलेली आढळली. याच प्रकारच्या खुणा त्याची गाडी जेथे सापडली तेथे केलेल्या आढळल्या. हा शोध बराच यशस्वी झाला होता. कारण बोटाचा एक स्वच्छ ठसा मिळाला होता.

या ठशामुळे एफ. बी. आय. चे काम आणखी वाढले. त्याच्याकडे एकूण ८२ दशलक्ष लोकांच्या बोटाच्या ठशाची नोंद होती. सर्व बोटाचे ठसे उपलब्ध असतील तर त्या व्यक्तीला काही मिनिटातच ओळखता येते. परंतु एकुलत्या एका ठशावरून त्या व्यक्तीला शोधून काढणे खरोखरीच कठीण होते. डायरेक्टर श्री. हूव्हर यांच्या सल्ल्यावरून फक्त पळून गेलेल्या माणसाचे ठसे तपासावयाचे ठरले. कारण गाल्ट हा पळपुटा गुन्हेगार असण्याची शक्यता जास्त होती. हे काम आणखी झटपट होण्यासाठी फक्त २५ ते ५० वर्षे वयाच्या लोकाचे ठसे तपासावे असे ठरले. हे काम अतिशय हुशार तज्ञावर सोपविले गेले.

१९ एप्रिलला एका तज्ञाने एक कार्ड बाजूला काढले. ते कार्ड व त्याना मिळालेला ठसा एकाच माणसाचा असावा, यावर सर्वांचे एकमत झाले. त्या कार्डावर नोंद होती 'जेम्स् अर्ल रे ! जन्म १० मार्च २८.'

रे च्या नोंदवहीवरून असे दिसले की, गुन्हा करून तो नेहमी पळून जात असे. त्याने लॉस् एंजिलसमध्ये एक टाइपरायटर चोरला, पण स्वतःचे बँकबुक तेथेच विसरल्याने तावडतोब पकडला गेला. शिकागो येथे दरोडा घालून परतताना तो एका तळघराच्या खिडकीत कोसळला. इतरही बरीच नोंद होती.

आता देशातील प्रत्येक बस आणि रेल्वे-स्टेशन्स, विमानतळ, दारूचे गुत्ते, हॉटेल्स इ. गुप्त निरीक्षणाखाली होती. सर्व देशावर गुप्त पोलिसाचे जाळे विणले गेले होते. आतापर्यंत कुठल्याच शोधासाठी एफ. बी. आय.ला एवढे परिश्रम करावे लागले नव्हते. दिवसांमागून दिवस जात होते. शोध काही लागत नव्हता. शेवटी असा निर्णय घेण्यात आला की, तो देशातून पळून गेला असला पाहिजे. पण तो गेलाच कसा ? सगळे विमानतळ तर आपल्याच निरीक्षणाखाली होते आणि त्याला पासपोर्ट तरी कसा मिळाला ? त्याने नाव तर बदलले नसेल ? अनेक प्रश्न निर्माण झाले.

तो तुरुंगातून पळाल्यापासून परदेशी जाण्यासाठी दीडदशलक्ष परवाने देण्यात आले होते. ते सर्व तपासणे जरूर होते. देशातील प्रत्येक विमानतळावर तज्ञांची पथके रवाना झाली. यात गुप्तता राखण्यासाठी पासपोर्टतपासणीचे काम फक्त रात्रीच करावे असे ठरले.

मे अखेरपर्यंत २४०,००० पासपोर्टस् तपासण्यात आले. जवळजवळ १२ पासपोर्टसवरील फोटो त्याच्या फोटोशी मिळतेजुळते होते. परंतु त्या बाराही अर्जात बेकायदेशीर असे काहीच आढळत नव्हते. असाच शोध चालू असता शनिवार दिनांक १ जून रोजी एका अर्जाने आणि त्या सोबतच्या फोटोने लक्ष वेधून घेतले. तो अर्ज केला होता. 'रोमन जॉर्ज स्नेड' नावाच्या गृहस्थाने. हाच 'त्याचा' अर्ज असावा, असे सर्वानुमते ठरले.

एफ बी. आय.च्या प्रमुख कचेरीत दि ६ जून रोजी अतिशय गुप्त हालचाली चालू होत्या. यासबंधीची माहिती फक्त सहाजणांपुरती मर्यादित ठेवण्यात आली होती. त्या अहवालाची फक्त एकच प्रत काढण्यात आली. त्याचा आशय असा होता, 'हस्ताक्षरतज्ञांच्या मते स्नेड या नावाने अर्ज करणारा माणूस जेम्स अर्ल रे हाच आहे.'

युरोपमध्ये रोमन जॉर्ज स्नेड या नावाचा वापर करणारी कोणी व्यक्ती आढळल्यास त्यास पकडण्यात यावे, अशी विनती युरोपच्या पोलीसखात्यास केली गेली.

शनिवार दिनांक ८ जूनला सकाळी ७। च्या सुमारास डायरेक्टर हूव्हर याचे मदतनीस श्री. डी. लॉच् याच्या घरी फोन खणखणला 'रोमन जॉर्ज स्नेड या नावाचा माणूस ब्रिटिशांनी पकडला आहे. तो इंग्लडमधून पळून जाण्याच्या विचारात होता. त्याच्याजवळ गोळ्यांनी भरलेली पिस्तुलं होती.' हा फोन लंडनहून आला होता.

कॅनन रॉ येथील पोलिसस्टेशनवर स्कॉटलंडयार्डचे दोन अनुभवी हुशार अधिकारी त्या प्रवाशाला प्रश्नामागून प्रश्न विचारून त्रासून सोडत होते. उत्तरे देणे त्यास टाळता येत नव्हते. बोलून बोलून त्याचा घसा कोरडा पडला होता. 'कृपा करून मला थोड प्यायला पाणी...' त्या प्रवाशाचे तोंडचे वाक्य पूर्ण होण्यापूर्वीच त्याच्यासमोर पाण्याने भरलेला एक स्वच्छ ग्लास ठेवण्यात आला. ते अधिकारी जणू याचीच वाट बघत होते.

प्रवासी पाणी पिऊन ग्लास खाली ठेवतो न ठेवतो तोच तो ग्लास तावडतोब तेथून उचलला गेला. त्यावर उमटलेले ठसे तपासण्यासाठी ११॥ वाजता लंडनहून वॉशिंग्टन प्रमुख कचेरीत फोन गेला, 'ठसे तपासले. सर्व जुळले आहेत.'

स्नेड ऊर्फ रे पकडला गेला. आठ आठवडे चाललेला हा पाठलाग शेवटी यशस्वी झाला. या पाठलागात एफ. बी. आय.ला १·४ दशलक्ष डॉलर्स गमवावे लागले ३०१४ लोक या शोधात गुंतले होते. त्याना ५ लाख मैलांपेक्षा जास्त प्रवास करावा लागला होता.

'जेम्स अर्ल रे सापडला आहे, शोध थांबवा,' अशा आशयाचा मजकूर अमेरिका व युरोपमध्ये प्रसिद्ध करण्यात आला. एक ऐतिहासिक पाठलाग थांबला होता. शिकारकथा संपली होती. □

( मूळ लेखक : जॅनिथ ओर्ली )

## सर्वोत्तम लेखक ('टाईम' वरून)

# अर्नेस्ट हेमिंग्वे

(१८९८-१९६१)

परिचय : जे. एन्. पोंडा
फिनिक्स लायब्ररी, पुणे

हेमिंग्वे हा इतका प्रसिद्ध आहे की, त्याच्या पुस्तकाबद्दल व त्याच्याबद्दल बऱ्याच लोकाना चागली माहिती आहे या कारणा-मुळे त्याच्यावर आणखी नवीन ते काय लिहायचे, हा प्रश्न पडतो, परतु हेमिंग्वे जाऊन सुमारे १७ वर्षे झाली म्हणून हेमिंग्वे-विषयी फारशी माहिती नसलेली एक नवीन पिढीच आता तयार झाली असेल.

अर्नेस्ट हेमिंग्वेचे वडील हे डॉक्टर होते हेमिंग्वेला ५ भावडे होती. हेमिंग्वेचे वडील हे उत्तम खेळाडू होते. त्याचे बालपण असेच रम्य परिसरात गेले. शाळेत तो सर्व क्षेत्रात यशस्वी होता तरी पण दोनदा घरातून तो पळून गेला होता. त्यानतर हॉटेलमध्ये वेटर म्हणून व शेतात मजूर म्हणून त्याने काम केले. नतर त्याने युद्धात स्वत ॲम्ब्युलन्स-ड्रायव्हर म्हणून काम केले त्यामुळे त्याला युद्धाविषयी चागलाच अनुभव मिळाला.

अर्नेस्ट हेमिंग्वे हा २५ वर्षांचा असतानाच एक नावाजलेला लेखक झाला लेखक होण्याच्या आधी तो उत्तम पत्रकार होता काही समीक्षक असे म्हणतात की, हेमिंग्वेने साहित्य व वृत्तपत्रव्यवसाय यांच्यामधली बारीक रेषा पुसून टाकली.

साहित्यक्षेत्रात कधीकधी असा लेखक होऊन जातो की, त्याचे जीवन आणि त्याचे साहित्य ही जणू एकमेकाची प्रतिबिंबेच होऊन बसतात. हेमिंग्वे अशापैकीच एक साहित्यिक होता. अशा साहित्यिकाच्या हातून जरी त्याच्या साहित्यात थोडे प्रमाद घडले तरी त्याचे साहित्य फार म्हणजे फारच वाचनीय असते, असे मी आधीच सागितले आहे. प्रमादाबद्दलच म्हणायचे झाले तर काही समीक्षक असे म्हणतात की, हेमिंग्वेची फिलॉसॉफी निगेटिव्ह आणि उथळ होती. सखोल समुद्रात मासे पकडणे, बदुकीच्या गोळ्या झाडणे, दारू पिणे, बैलाशी झुज देणे, बायकावर प्रेम करणे वगैरे गोष्टी या आयुष्यातील करमणुका असतात; पण हेमिंग्वेच्या जीवनात व साहित्यात त्या करमणुका न राहता असल्या प्रकारचे आयुष्य जगणे हे त्याचे ध्येयच होऊन बसले, असे हे समीक्षक म्हणतात, पण मला या समीक्षकाचं म्हणणच उथळ वाटत साहित्यात लेखकाने काय किंवा सामान्य जीवनात मनुष्याने काय स्वतःशी निष्ठ राहून त्याप्रमाणे लिहिणे व वागणे, यालाच कमिटमेंट म्हणतात. एक वेळ व्याकरणाचे किंवा भाषेचे नियम लेखकाने झुगारून दिले तरी हरकत नाही; परतु त्याने कमिटमेंट कधीच सोडू नये. वरील सर्व अनुभव घ्यायला हेमिंग्वे इतका हपापला होता, जीवनाला अधाशीपणे प्यायला तो इतका उत्सुक होता की, आपण त्याला कोण सागणार की, 'बाबा रे, तू थोडे आवरते घे! तुझे ध्येय तू बदलून टाक' शेवटी स्वतःशी निष्ठ राहावे, हीच सर्वांत उत्तम फिलॉसॉफी आहे.

हेमिंग्वेनी The Old Man And The Sea ही दीर्घकथा म्हणून लिहिली होती. एवढ्या दीर्घकथेवर आपल्याला नोबेल पारितोषिक मिळेल, असे हेमिंग्वेला स्वप्नात-सुद्धा वाटले नव्हते; पण १९५४ साली त्या दीर्घकथेसाठी हेमिंग्वेला नोबेल पारितोषिक मिळाले.

अमेरिकन साहित्यात स्वतःच्या शैलीमुळे हेमिंग्वेला विशिष्ट असे स्थान प्राप्त झाले आहे त्याची ती छोटी छोटी वाक्ये म्हणजे जणू टेलिग्राफिक भाषाच. विशेषत: मनुष्याच्या भावनाचे वर्णन करताना तो त्याचे वर्णन understatements वापरून इतक्या कौशल्याने करतो की, त्याचा असर भावनेच्या उद्रेकापेक्षा फारच प्रभावी ठरतो. त्याच्या या शैलीचे अनुकरण बऱ्याच लेखकानी केले, पण कोणालाच त्याच्याइतके कमी लिहून जास्तीत जास्त वाचकाच्या मनाला भिडेल, असे लिहिता आले नाही बऱ्याच लोकांना असे वाटते की, नेहमीच हेमिंग्वे टेलिग्राफसारखी छोटी छोटी वाक्ये वापरीत असे, पण For Whom The Bell Tolls या पुस्तकामध्ये त्याने लाब वाक्ये किती कौशल्याने लिहिली आहेत ते जाणवते. ही लाब वाक्ये म्हणजे दोन्ही टोकाकडे सारखे वजन असलेले तराजूच. काही लेखकाना लाब वाक्ये लिहिताना असा अनुभव आला असेल की, ती एका तागडीत जास्त वजन असलेल्या तराजूसारखी झुकतात; पण हेमिंग्वेच्या लाब वाक्यात प्रभावी शब्दाचे वजन सर्व ठिकाणी सारखेच असते एकदा हेमिंग्वे म्हणाला होता, 'Prose is architecture, and not interior decoration' (निव्वळ तंत्रा-लाच महत्त्व देणाऱ्या लेखकानी याची नोद घ्यावी) For Whom The Bell Tolls ही हेमिंग्वेची कादंबरी त्याच्या कादबऱ्यात सर्वोत्कृष्ट आहे. या कादबरीचे कथानक

### 'रूपवेध' तर्फे 'आपल्यासाठी कविता'

'रूपवेध' या सस्थेतर्फे 'आपल्या-साठी कविता' या नावाची एक कार्य-क्रमाची मालिका लौकरच सुरू होत आहे मराठीतल्या काही महत्त्वाच्या कवींच्या कविताचे वाचन आणि थोडक्यात रस-ग्रहण, असे या कार्यक्रमाचे स्वरूप राहील

दर महिन्याला एक कवी घेऊन त्याच्या निवडक कविताचे वाचन श्रीराम लागू करतील आणि रसग्रहण शाता शेळके आणि मगेश पाडगावकर करतील. एका महिन्यात दोन ते तीन वेळा एकाच कवीच्या विशिष्ट कविता सादर केल्या जातील आणि नतर कवी बदलला जाईल. जून १९७७ मध्ये मर्ढेकर, जुलैमध्ये पु. शि. रेगे, ऑगस्टमध्ये इंदिरा, सप्टेंबरमध्ये कुसुमाग्रज असे पहिल्या सत्रातले कवी असतील

सर्व कार्यक्रम दादरच्या छबिलदास मुलाच्या शाळेच्या सभागृहात होतील. अर्थ, नाद, लय या अगानी नाट्या-विष्कार अधिक संपन्न व्हावा, हा या कार्यक्रमामागचा हेतू आहे.

अगदी थोड्या दिवसापुरतेच मर्यादित आहे. या युद्धकथेमध्ये एक छोटा गट पूल उडविण्याचा प्रयत्न करतो. कादंबरीच्या पात्रांची सर्व धडपड या केंद्रबिंदूभोवती (पूल उडविणे) फिरत राहते For Whom The Bell Tolls या पुस्तकात हेमिंग्वेने युद्धात सैनिकात मैत्री कशी जमते व ती कशी टिकून राहते हे दाखविले आहे, तर Farewell to Arms मध्ये नावाप्रमाणेच युद्ध हे किती वैफल्य निर्माण करणारे व कोणतेच उद्दिष्ट न गाठणारे आहे, असे दाखविले आहे. A Farewell to Arms मध्ये हेमिंग्वेची शैली काव्याला जाऊन भिडते.

हेमिंग्वेचे पौरुषत्व नुसते ओसडत होते. त्याची ती केसाळ आणि रुंद छाती, वाढलेली. दाढी, बळकट स्नायू व जीवन आकठ पिण्यासाठी आसुसलेले डोळे पाहिले की बऱ्याच स्त्रिया नतमस्तक होऊन जात असत. हेमिंग्वेची स्त्रीपात्रे सुद्धा नेहमीच submissive असणारी आहेत. हेमिंग्वेला नेहमी अशाच स्त्रिया आवडत असत. तो egotist होता म्हणून त्याला submissve स्त्रिया आवडत असत हेमिंग्वेची स्त्रीपात्रे ही बहुताशी ब्रिटिश आहेत. हिंसा, मृत्यू, सुदर व submissive ब्रिटिश बायका अशा पार्श्वभूमीवर हेमिंग्वेचे कथानक खूपच रगत जाते.

हेमिंग्वेनी २ जुलै १९६१ रोजी स्वत वर गोळी झाडून घेतली जो लेखक जीवन आकठ प्यायला एवढा हपापलेला होता त्याच लेखकाने स्वत. होऊन मृत्यूच्या सामोरे जाणे हा एक विलक्षण विरोधाभास नियतीच समजू शकेल. विशेषत कलाकाराना परस्परविरोधी व्यक्तिमत्वाचे पैलू भरपूर प्रमाणात मिळतात हे मी ' माणूस 'मध्ये शेरॉन टेटचे खूनप्रकरण सागताना सागितलेच आहे. जीवनात कुठे तरी मोठा flaw आहे, कुठे तरी एक छोटा link लागत नाही. हा flaw काय आहे, ही link कोणती आहे, ते शोधण्याचा डॉस्टॉ–व्हॅस्की पासून कामूपर्यंत बऱ्याच लेखकानी प्रयत्न केला पण कुणालाच त्यात यश आले नाही. शेवटी रीपीट करून असच म्हणावे लागेल की Universal Scheme of things is sado-masochistic.

काही समीक्षक असे म्हणतात की हेमिंग्वेच्या शरीरात पुष्कळ प्रमाणात अल्कोहोल व निकोटीन (सिगारेटस्) गेल्यामुळे शेवटी शेवटी तो paranoid झाला. paranoia म्हणजे आपला सतत कुणी तरी छळ करीत आहे असे कारण नसताना वाटणे. हेमिंग्वेनी आत्महत्या केली त्याच्या आधी आपल्यामागे FBI लागली आहे असे त्याला उगीचच वाटे. त्याच्या बँकेत पुष्कळ पैसे शिल्लक असताना त्याला असे वाटे की आपण कफल्लक झालो आहोत. त्याचे सल्लागार त्याला नेहमी सागत असत की 'बँकेत पुष्कळ शिल्लक आहे ' परंतु त्यांच्या या सांगण्याचा काहीच उपयोग होत नसे, आणखीन काही समीक्षक असे सागतात की हेमिंग्वेच्या रोजच्या रक्तदाबात फार बदल होत असे म्हणून तो तसा झाला होता हेमिंग्वेनी आत्महत्या केली त्याच्या आधी तो रक्तदाबाच्या ट्रीटमेंटसाठी दवाखान्यात होता. एका मानसशास्त्रज्ञाची ट्रीटमेंटसुद्धा चालू होती त्यानी हेमिंग्वेला shock-treatment दिली होती

अल्कॉहॉल व निकोटीनच्या अति वापरामुळे हेमिंग्वेचे ज्ञानतंतू थोडे खराब झाले असतीलही परतु मला वाटते की हेमिंग्वेची death–wish अगदी सुरवातीपासूनच त्याच्या साहित्यात होती. ज्यानी हेमिंग्वेची सर्व पुस्तके वाचली असतील त्याना याची प्रचिती येईल. विशेषत त्याच्या The snows of Kilimanjaro या उत्कृष्ट दीर्घकथेत एका अमेरिकन लेखकाला गँग्रेन ( शरीरातल्या एखादा भाग सडणे किंवा मासपाक, कोथ) झालेले असते. आफ्रिकेमध्ये तो मृत्युशय्येवर पडला असता त्याला एकाएकी मृत्यू आपल्या जवळ जणू प्रपाताप्रमाणे धावून येत आहे असे वाटले व त्याला एक चमत्कारिक रितेपणाची जाणीव झाली. त्या रीतेपणामध्ये मृत्यूची दुर्गंधीही होती. मृत्यूची अशा प्रकारची वर्णने हेमिंग्वेच्या बऱ्याच पुस्तकात आहेत. एकीकडे तो जीवन जगण्यासाठी अघोर तृष्णेने पछाडलेला होता व दुसरीकडे मृत्यू व मृत्यूच्या इच्छेने (death–wish) त्याला ग्रासले होते !

हेमिंग्वेच्या बायकोने ( पूर्वीची पत्रकार ,वेल्श ) हिने हेमिंग्वेबरोबर १५ वर्षे ससार केला त्या वेळच्या आठवणी तिने ' How It Was ' ह्या ५३७ पानाच्या पुस्तकात दिल्या आहेत हेमिंग्वे जवळजवळ नेहमीच उभा राहून लिहीत असे एका दिवसात जास्तीत जास्त तो ७५० शब्द लिहीत असे, पण हे ७५० शब्द अगदीच उत्कृष्ट असत असे ती या पुस्तकात म्हणते. जेव्हा जेव्हा तो प्रवास करीत असे तेव्हा तेव्हा सुमारे ८० नग सुटकेसेस, पिशव्या व इतर सामान तो नेत असे व मोठमोठ्या पार्टीज देऊन बरेच पैसे उधळीत असे.

एकदा मेरी म्हणाली होती, ' अर्नेस्टबरोबर राहाताना 'कधीकधी भयानक वाटायचे तर कधीकधी कटाळवाणे वाटायचे, परंतु हे सर्व फक्त पाचच मिनिटे चालायचे. पाच मिनिटानतर परत त्याच्याबरोबर जगण्याचा एक आगळा–वेगळा अनुभव मिळत असे.' ☐


**SOME NEW TITLES RECEIVED**

| | | |
|---|---|---|
| (1) | **How To Be A Successfull Executive** – ( Tips for success by the richest man in the world ) J Paul Getty | 9 60 |
| (2) | **A Man Called Intrepid** – ( Best seller ) William Stevenson | 12·10 |
| (3) | **The Family Man** – ( Bestseller Novel ) Robin Moore | 12 80 |
| (१) | **झिरपलेली किरणे** – ( आणीबाणीतील कविता ) – सपादक– अरुण लिमये | |
| (२) | **पिंपळावेळ** – ( कथासग्रह ) – जो. ए कुलकर्णी | २०/– |
| (३) | **अमरवेल** – ( कथासग्रह ) – पु. भा. भावे | १२/– |

● पालकानो, आपल्या पाल्याला उत्तम सस्कार देण्यासाठी त्याना उत्तमोत्तम साहित्य उपलब्ध करून द्या. उत्तम साहित्य वाचणे हे पदवी मिळविण्याइतकेच ( किंबहुना जास्त ) महत्वाचे आहे आणि त्यासाठी " फिनिक्स लायब्ररी. "

**दि फिनिक्स लायब्ररी,**
७२७ सदाशिव पोस्टासमोर, पुणे ३०

# टेक इट लाईटली

संजीव मंगरूळकर

पुणे महानगरपालिका ही एक अतिशय क्रियाशील आणि गतिशील सघटना आहे त्या अनुषगाने अर्थातच आपल्या या महानगरपालिकेत सतत काही ना काही तरी लक्षणीय घडत असणार हे ओघाने आलेच. या सर्वच घडामोडी अतिशय रजक आणि उद्बोधक असतात. त्यावर बरेच काही स्वतत्र मनोरजक लेखन करता येणे शक्य आहे तरुण होतकरू लेखकानी या घडामोडीचा अभ्यास अवश्य करावा. दर्जेदार विनोदी लेखक बनण्याचा हा एकुलता एक हमखास मार्ग आहे

नमुन्यासाठी म्हणून परवाचीच गोष्ट सागतो गेल्या आठवड्यात पुणे महापालिकेच्या सभेत अगदी जोरदार आणि कडाक्याची चर्चा झाली. आता यात विशेष काय आहे ? तुम्ही–आम्ही निवडून दिलेले नगरसेवक तुमच्या–आमच्या विकासाच्या योजना आखीत अन् त्यावर चर्चा करीत महापालिकेत बसलेले असतात तेव्हा अशा चर्चा अधूनमधून जोरदार आणि कडाक्याच्या होणारच. पण परवाची चर्चा मात्र विशेष गाजली. कारण तिचा विषय थोडासा निराळा होता.

या सभेत सजय गाधीचे अभिनदन करणारा ठराव माडला गेला आणि त्यावर ही कडाक्याची, जोरदार वगैरे चर्चा झाली. आता हा विषय तसा खूपच वेगळा आहे. कारण हल्लीचा जमाना सजय गाधीना शिव्या देण्याचा आहे कित्येक मडळीनी रोज सकाळी उठून दिवसातून एकदा तरी सजय गाधीना शिव्याची लाखोली वाहण्याचा भाविक नेम केला आहे असेही ऐकतो. यामुळे या कित्येक मडळीना मनोमन पवित्र व शात वाटते. याखेरीज या लाखोलीमुळेच आपली राष्ट्रभक्ती, राष्ट्रविषयक जागरूकता आणि आपली 'जनतानिष्ठा' एकसमयावच्छेदेकरून सिद्ध होऊन जाते. तेव्हा अशा रीतीने स्वतत्र भारतातील तमाम जागरूक देशभक्त या सजयविरोधी झेंड्याखाली एकत्र येऊन आपल्या देशभक्तीचे पोवाडे गात असताना आपल्या महापालिकेत असा अचानक सजय गाधीचे अभिनदन करणारा ठराव माडला जावा ही घटना आजच्या या राजकीय आणि सामाजिक संदर्भात विशेष नव्हे काय ?

आणीबाणीच्या काळात आपल्या देशाची भरपूर प्रगती व्हावी या हेतूने श्री सजय गाधी यानी एक पाच कलमी स्वतत्र योजना देशासमोर माडली होती याच योजनेतील एक कलम होते–वृक्षारोपणाचे वृक्षारोपणाचे हे कलम सजय गाधीनीच देश तील युवकाना प्रथमच सागितले. त्यामुळे भारतभर वृक्षारोपणाची एक महाप्रचड लाट उसळून जाऊन भारताचे जगलच होते की काय अशी परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता काही विद्वानाना दिसू लागली. त्यायोगे भारतातील अवर्षण मिटले, जमिनीची धूप थाबली, थकल्या उपाशी मनाना हिरवीगार झाडे बघून आनद वाटू लागला. सर्व भारतीय अगदी उल्हासाने उड्या मारू लागले साराश–फार पूर्वी भारतात होऊन गेलेले सुवर्णयुग पुन्हा एकदा भारतात परतण्याची लक्षणे दिसू लागली सजय गाधीच्या या वृक्षारोपणाच्या लोकोत्तर कल्पनेमुळे भारताचे असे कोटकल्याण झाले. तेव्हा साहजिकच त्याबद्दल त्याचे अभिनदन करण्याची कल्पना काही माननीय नगरसेवकाना सुचली.त्यानुसार हा अभिनदनपर ठराव सभेत माडण्यात आला.

या ठरावावर अगदी कडाक्याचे वादग झाले आणि साहजिकच सजयविरोधाच्या या जमान्यात हा ठराव फेटाळला गेला. या ठरावाचा असा निकाल लागला यात काही नवीन नाही. नाविन्य आहे ते या ठरावाच्या निमित्ताने झालेल्या चर्चेत त्यामध्ये ठरावाच्या समर्थनार्थ व्यक्त केले गेलेले एक मत या सदर्भात पाहण्यासारखे आहे. ते असे–

**श्री. गांधी यांच्या इतर उद्योगांमुळे कांग्रेस पक्ष बदनाम झाला असला तरी त्यांनी हाती घेतलेल्या वृक्षारोपण–मोहिमेमुळे मात्र देशाचा फायदा झाला.**

हे विधान अगदीच नवीन आहे एक तर सजय गाधीच्या काही इतर उपद्व्यापाची जाणीव असल्याचे यात दिसते, परतु या उपद्व्यापामुळे फक्त कॉंग्रेस बदनाम झाली, देशाचे काहीच नुकसान झाले नसावे असे दिसते याचा अर्थ, सजय गाधीचे उद्योग कॉंग्रेसला नुकसान पोहचविण्यासाठीच चालले होते. कॉंग्रेसप्रेमी मंडळीनी या विधानाची गभीर दखल घेणे आवश्यक आहे. कारण संजय गाधीनी वृक्षारोपण करून देशाचे कल्याण केले आणि इतर उद्योग करून फक्त कॉंग्रेसचे मात्र वाटोळे केले असा जाहीर आदेश या वाक्यातून व्यक्त होतो.

याखेरीज हे वाक्य अतिशय समतोल वृत्तीचे निदर्शक आहे सजय गाधी ही व्यक्ती या युगातील एक महाभयानक, हिंस्र (वगैरे) खलनायक अशा स्वरूपात जगासमोर प्रोजेक्ट केली असता, त्याचे खलत्व मान्य करूनही त्याच्या गुणाना योग्य ती दाद देण्याची मर्मज्ञ रसिकता या विधानात आहे असा समतोल माणसात सहसा आढळत नाही. सजय गाधीनी सुरू केलेल्या हुडाविरोधी चळवळीबद्दलही त्याचे असेच स्वतंत्र अभिनदन केले जावे असे वाटते. किंबहुना भारतातील तमाम स्मगलर मडळीचेही अभिनदन करायला हरकत नसावी. त्याच्या कारवायामुळे भारताला काही बाबतीत नुकसान पोहोचले असले तरी त्याच्यामुळेच सामान्य भारतीयाला विदेशी वस्तू स्वस्तात वापरता येऊ लागल्या. अभिनदनासाठी असे किती तरी विषय शोधण्यासारखे आहेत या सर्वांवर यथासार आणि यथावकाश चर्चा होणे आवश्यक आहे.

आणि अशा चर्चा करायला महापालिकेला मोकळा वेळही भरपूर आहेसे दिसते. नाही तर कुणाच्या मृत्यूविषयीचा शोक, इदिरा गाधीचे अभिनदन, डायनामाइट–प्रकरण कोर्टातून काढल्याबद्दल निषेध यासारख्या ठरावावर मनसोक्त वाद घालणे आपल्या नगरसेवकाना शक्य झाले नसते. महापालि-

केचे कार्य हे आपल्या शहराची सुधारणा करण्यासाठी मुख्यत्वेकरून असते. त्यानुसार तेथील सभेत शहरवासियांच्या समस्यावर आणि नगरविकासावर चर्चा होणे अधिक आवश्यक आहे अशी सर्वसामान्य नागरिकाची कल्पना आहे. परंतु ज्या अर्थी अशा मनोरंजक विषयावर भरपूर चर्चा करण्यासाठी नगरसेवकाना वेळ उरतो त्या अर्थी एक तर त्याना त्याच्या कामाचा विसर पडला आहे, अन्यथा पुण्यनगरीत सर्वत्र आबादीआबाद असून सुधारण्यासारखे असे पुण्यात काही उरलेच नसावे. तेव्हा त्यांचा हा गैरसमज दूर करण्यासाठी त्याना पुढील चर्चेसाठी काही विधायक विषयाचा विचार करणे शक्य आहे हे विषय पुढीलप्रमाणे– पुण्यात बऱ्याच ठिकाणी रस्त्यांचे डावरीकरण करावयाचे आहे. कित्येक डाबरी रस्त्याचे नूतनीकरण करावयाचे आहे. कित्येक रस्त्यावर ट्यूब्ज बसविणे जरुरीचे आहे. म्युनिसिपल शाळामध्ये मुलाना चागले शिक्षण देता येणे शक्य आहे. महापालिकेतील व इतरही सार्वजनिक सस्थातील भ्रष्टाचार शोधणे व तो नष्ट करणे आवश्यक आहे. पुण्यातील झोपडपट्ट्याची समस्या सोडविण्यासारखी आहे. तेव्हा या आणि अशा इतर अनेक नागरी महत्त्वाच्या विषयावर महापालिकेच्या सभेत चर्चा झाल्यास त्यातून अधिक कल्याण होण्याची शक्यता आहे. बाकी कुटाळक्या करण्यास पुण्यातील कट्टे रिकामे आहेतच !

तरी यासारख्या काही विधायक चर्चांना महापालिकेत तूर्त तरी प्राधान्य दिल्यास बरे होईल. एकदा का शहराच्या सर्व समस्या सुटल्या की मग बरेच इतर ठराव चर्चिता येतील. यानतरच्या कुठल्या तरी सभेत रावणाचे अभिनंदन करण्याचा ठराव माडण्याचाही विचार असल्याचे ऐकतो. रावणाने सीतेला पळविण्याचा गुन्हा केला असला तरी तो अतिशय विद्वान, वेदवेत्ता होता. त्याच्या विद्वत्तेमुळे हिंदू सस्कृतीचा फार मोठा फायदा झाला. याबद्दल त्याचेही अभिनंदन करणे उचित होईल, पण ते अर्थातच आपल्या शहर-सुधारणा पूर्ण झाल्यावर ! तोपर्यंत नगरसेवकानी आपल्या कुवत्यारीतील विषयावर काही चर्चा आणि कृतीही केल्यास अधिक बरे वाटेल. □

रंगभूमी । शिरीष सहस्रबुद्धे

# पाहिजे जातीचे

## वेगळेपण सुखावणारे

'पाहिजे जातीचे' या विजय तेंडुलकराच्या नाटकाचे अगदी वरवरसुद्धा, सहजगत्या जाणवणारे आणि सुखावणारे वैशिष्टय म्हणजे तेंडुलकरी बाजाच्या इतर गाजलेल्या नाटकापेक्षा असणारे त्याचे वेगळेपण. तेंडुलकरानी आजपर्यंत हाताळलेल्या विषयापासून 'थीम्स'पासून हे नाटक खूप वेगळ असल्याच सुरुवातीलाच जाणवत आणि हा वेगळेपणाच अखेरपर्यंत आपल्याला पकडून राहतो. ग्रामीण भागातल्या कॉलेजजीवनासारखा एक निराळाच आणि पठडीबद्ध न झालेला विषय तेंडुलकर नेहमीपेक्षा निराळ्या शैलीत–किंबहुना शैलीच्या मिश्रणान–हाताळतात आणि हाती लागलेला अनुभव एकसंध नसला तरी, एक-साचीही नसतो, व्यापक, पैलूदार असतो.

'पाहिज जातीचे' या नाटकाचा इतिहास मोठा विचित्र आहे तेंडुलकराचं हे काही नव नाटक म्हणता येणार नाही. मुबईला याचा रौप्यमहोत्सवी प्रयोगही होऊन गेलाय. आपण पुण्यातला पहिला म्हणून पाहिलेला प्रयोग काही तरी सव्विसावा की अठ्ठाविसावा होता. पहिल्यादा हे नाटक उचलल 'आविष्कार'च्या अरविंद देशपाडे यानी. त्यानी मुबईच्या छबिलदास प्रशालेच्या प्रायोगिक रगमचावर याचे दणक्यात प्रयोग लावले, तेव्हा 'नटेश्वर'न हे नाटक उचलल आणि व्यावसायिक पातळीवर 'नटेश्वर प्रस्तुत आविष्कारीयन नाटक' अशा फॅन्सी बॅनरखाली सादर केल. चटकन उचलल्या जाणाऱ्या नाटकाच्या पठडीतला हा नाटयप्रकार नसल्यान नाटक मोठ्या नाटयगृहात उसळी घ्यायला वाट पाहावी लागत्येय. पुण्यात त्याचा पहिलाच प्रयोग व्हायला इतकं थाबाव लागल याचं कारण तेच.

आणि मुळात हे नाटक पुण्या–मुबईच्या प्रेक्षकासाठी नाहीच, असं मला वाटत. शहरी भागात ते प्रामुख्यान साश्चर्य करमणुकीच साधन बनून राहील. त्यातली मर्मभेदी भाष्य खऱ्या अर्थान 'पोचली' पाहिजेत ती ग्रामीण प्रेक्षकवर्गापर्यंत–ज्या प्रेक्षकवर्गाच्या परिचयाच वातावरण या नाटकाच्या लेखनाला प्रवृत्त करणारं ठरलं त्या प्रेक्षकवर्गापर्यंत. नटेश्वरन हाती घेतल्यामुळे आता ती शक्यता निर्माण झाली आहे, कारण निदान जिल्ह्याच्या ठिकाणी त्याचे तुरळक प्रयोग व्हायला लागलेत

नाटकाचा नायक आहे महिपती बभ्रुवाहन पोरपार्नेकर नावाचा एक उच्चशिक्षित मागासवर्गीय तरुण. परिस्थितीशी झगडत आणि एकीकडे पोट भरण्याचा प्रयत्न करता-करताच मराठी घेऊन हा इसम जनता क्लासमध्ये एम. ए. होऊन जातो. ज्या सस्थेत तो नोकरी करतोय तिचे चालक गाधीवादी ईश्वरभाई. महिपतीच एकीकडे अभिनदन करीत असतानाच दुसरीकडे त्याला नोकरीतून 'मुक्त' करतात. कारण एवढा शिकलेला माणूस सस्थेला परवडायचा कसा ? मग नोकरीची शोधाशोध. पुन्हा महिपतीची जात म्हणजे त्याच्याच शब्दात सागायच तर 'पुरेशी उच्चही नव्हती आणि पुरेशी खालचीही नव्हती.' अशी हा मधली-अधलीच जात प्राध्यापकी पटकावयाच्या त्याच्या मनोरथाआड येणार हे उघडच; पण कुठल्याशा आडगावातल्या एका कॉलेजात नोकरी मिळते. तीसुद्धा निवड-समितीला खड्या सुरात मुरारबाजीचा पोवाडा म्हणून खूष केल्यानतर.

नोकरी सुरू होते तसतशी ती टिकवायची खटपटही सुरू होते. त्यातही सतरा भानगडी

उपटतात. चेअरमनच्या वशिल्यानं त्यांची पुतणीही महिपतीची 'असिस्टट' म्हणून स्टाफमध्ये घुसते. हा महिपतीला कटवण्याचा डाव. तो उलटविण्यासाठी मग महिपतीही प्रतिडाव टाकतो–आपल्या असिस्टट नलिनी-लाच जाळयात गुतवून चेअरमनसाहेबाचा जावई होण्याची जगी धडपड सुरू होते. गावाच्या सरपचाचा बबन्या नावाचा एक अति इरसाल पोरटा महिपतीचा 'पेट' विद्यार्थी असतो. तोही महिपतीच्या मदतीला येतो. या द्विपक्षपद्धतीच्या लढाईत अखेरीस निष्पन्न होत ते एवढंच की, नलिनीच लग्न तिच्या खरदाज घराण्याला शोभणाऱ्या एका शहाण्णवकुळी धनवताशी ठरवल जातं आणि प्रा. महिपती बभ्रुवाहन पोरपार्नेकर नव्या नोकरीच्या शोधार्थ बाहेर पडतात. नसते धदे केल्याबद्दल 'बान घराबाहेर काढलेला' बबन्या सोबतीला असतोच.

ग्रामीण भागातल्य' कॉलेजजीवनाचं काही अस्सल आणि काही नक्कल बेमालूम मिसळून घडवलेल दर्शन हा माझ्या दृष्टीन या नाटकापासून मिळणाऱ्या आनदाचा एक मोठा आणि अविभाज्य घटक हे दर्शन विनोद-निर्मितीसाठी काही प्रमाणात अतिशयोक्त केल्याच जाणवत, (उदा. सहलीमध्ये प्रा. महिपतीन उनाड पोराबरोबर भरमसाट हात-भट्टीची ढोसण आणि टारगटपणे बडबडण) पण तरीही ते खूपच बोचर, चावर, भेदक आहे ग्रामीण कॉलेजच्या परिस्थिती–किंवा दु:स्थितीचा–विदारक उपहास तर त्यात आहेच पण मुद्दाम एखाद भाष्य न करता घडवलेल पण तितकच तीक्ष्ण अस वास्तव दर्शनही आहे सगळयात विशेष वाटल ते याच की फक्त कॉलेजजीवनाचाच उपरोध करण्यावर न थाबता तेंडुलकरानी केवढा कॅनव्हास त्यामागे घेतलाय आणि त्यातून किती नाना,अपप्रकाराच त्रिडबन करायचा प्रयत्न केलाय ग्रामीण कॉलेजमधल्या भ्रष्टा-चाराचे वाभाडे काढण हे त्या विस्तृत कॅन-व्हासमुळे या नाटकाच एकमेव उद्दिष्ट उरतच नाही. किंबहुना तो साइडइफेक्ट ठरतो बायप्रॉडक्ट ठरत आणि भलाथोरला काळा कॅनव्हास–काळीकुट्ट पार्श्वभूमी ठस-क्यात सामोरी येते–ती अर्थातच आपल्या समाजात खोल पाळमुळ रुजवून उभारलेल्या जातिव्यवस्थेची. एका नाटकानं जातिव्यव-स्थेच काही काडीच वाकडं होणार नसलं आणि याची खात्री तेडुलकरासह सर्वांना असली तरी तेडुलकरानी या नाटकात जाति-गोत्राच्या नव्या राजकारणाला लक्षात राहतीलसे तडाखे ठेवून दिले आहेत याबद्दल शका नाही. जातिभेदाचं 'नव' राजकारण अस म्हणायच कारण हे की ब्राह्मण–ब्राह्मणे-तर वादाइतकाच किंबहुना आज त्यापेक्षाही उग्र बनलेला उपटलाय तो मराठा आणि मराठेतर किंवा पददलित, मागासवर्गीय (आणि महिपतीसारखे अधलेमधले), जात-वाले याच्यामध्ये महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात–मग ते शाळा–कॉलेजमध्ये असो, झेड् पी मध्ये असो किंवा साखरकार-खान्यात असो–आज हिरीरीन खेळल जाणार जातीचं राजकारण आज हे असं आहे आणि त्याच अचूक आणि लाजिरवाणं प्रतिबिब पाहिजे जातीचे मध्ये उमटलय. नलिनी हे या प्रतिबिबाच एक प्रमुख अग. ही मुलगी ındıvıdual कमी आहे–कुळवंत वगैरे घरा-ण्याच्या चालीरीतीची आणि प्रतिष्ठा–सन्मानाची ती एक चालतीबोलती पुतळी, एक मूर्ती, एक सिम्बॉल, प्रतिमा आहे. कॉलेजात येऊन मराठी शिकवणारी ही बाई 'पुरुषाकडे पाह्यची आमच्या घराण्याची रीत न्हाई,' म्हणून अखंड पुस्तकात मान घालून बसते ते वाचत वगैरे बिलकुल नाही तिच लग्न ठरल्याची बातमी ती महिपतीला ज्या प्रकारे येऊन सागते तो सगळाच प्रसग लेखक-दिग्दर्शक–कलाकार या सर्वांनी मिळून काय प्रचंड ताकदीनं पेललाय, उच उचललाय! प्रखर उपरोधातून उद्भवणाऱ्या हास्याच्या लाटा विरत नाहीत तोपर्यंत हा प्रसग–नलिनीच्या घराणेदार विक्रीचा हा जाहीर-नामा–जाणत्या प्रेक्षकाना गडद कारुण्याच्या धारेन कापत जातो एकीकडे तिच काय जोरदार 'ब्रेनवॉशिग झालेलं असल पाहिजे हे तिच्या पोलादी मुद्रेवरून आणि साचेबद–थड–एकसुरी बोलण्यातून जाणवत जात आणि दुसरीकडे त्याच अलिप्त, एकसाची आणि पोलादी कथनपद्धतीतन उपहासाच हसू फुलल्याखेरीज रहात नाही. मोठा बेह-त्तरीन जमलाय हा नाटकाचा शेवट. खरा शेवट इथच होतो. पुढची पाच मिनिट ही पडदा पडायची वाट बघता यावी एवढ्या-साठीच असतात.

जातिव्यवस्थेखेरीज बऱ्याच गोष्टीना तेडुलकरानी जाता जाता बोचकारे काढलेले आहेत. शिक्षणसंस्थातली राजकारण, ग्रामीण कॉलेजेसच्या प्राचार्यांची संस्थाचालकासमोर होणारी थर्ल्ड (महिपतीचा 'इटरव्यू' चालू असतानाच चेअरमनसाहेब समोर अद-बीनं उभ्या असलेल्या प्राचार्यांना 'मास्तर, पाणी द्या' असही फर्मावायला कमी करीत नाहीत. अर्थात मास्तरही तत्परतेनं धावता-तच.), प्राध्यापकमंडळीतले मत्सर, हेवेदावे, उंडारलेल्या पोराचे चाळे, सर्वोदयी सस्था-चालकाचे वागणे अशा नाना गोष्टी.

या नाटकाचा आणखी एक महत्त्वाचा विशेष म्हणजे त्यात नकळतच (कदाचित जाणूनबुजून) होत गेलेल शैलीचं, forms चं एक आकर्षक पण गुत्यात टाकणार मिश्रण. नाटकाचा बहुताश हा वरवर विनोदी–क्वचित फार्सिकल सुद्धा–वाटणारा आहे अतिशयोक्तीतून आणि उपहासातून निर्माण होणाऱ्या विनोदाखेरीज, नाटकाच्या उद्देशाशी सबध नसलेले आणि निव्वळ कथावस्तू पुढे नेणारे असेही विनोदी फार्सिकल प्रसंग नाटकात आहेतच. बबन्या आणि महिपतीनं नलिनीऐवजी तिच्या खाष्ट आत्यालाच चुकून पळवून आणणं हे एक उदाहरण आणि दुसऱ्या बाजूला अजिबात अ-विनोदी असेही प्रसग येऊन जातात. नाटकाचा शेवट तर अपरिहार्यपणे शोकातिकेला जवळचा आहे. तेडुलकराच्या नाटकात नव्या नसलेल्या व्हायोलन्सचा–विशेषतः मॉब व्हायोलन्सचा (सौम्यसाच) आविष्कारही क्वचित दिसतो. (उदा कॉलेजमधला महिपतीचा पहिला दिवस, सहलीचा प्रसग) गाभीर्य, ताण, डावपेच (ıntrigue) गभीर उपरोध, असे अनेक प्रवाह विनोदाशिवाय जाणवतात या सर्वांच्या मिश्रणामुळे एरवीच्या नाटकातून येईल तसा एकच एक, अखड, एकसध परिणाम साधत नाही किंवा अनुभव येत नाही हे खरे, पण प्रत्येक कलाकृतीने एकच एक, सलग अनुभव पोचवावा अशी अपेक्षा करणेही तितकेसे न्याय्य आणि तर्कशुद्ध / कलानिष्ठ ठरणार नाही.

अभिनयाची आघाडी साघिकदृष्ट्या बुलद ठरली असली तरी बबन्या (नाना पाटेकर) नलिनी (सुषमा तेडुलकर) व सतत डोळे वटारायची सवय सोडल्यास महिपती (विहग-नायक) हे याच क्रमाने उत्तम. चेअरमन (अरविंद देशपाडे), प्राचार्य (प्रभाकर पोतनीस), ईश्वरभाई (अरुण काकडे) व अक्का (शरयू भोपटकर) हेही उल्लेखनीय. पार्श्वभूमीतली वीस कलाकाराची टीमही तशीच. □

## अवतीभवती : पृष्ठ ६ वरून

आहेत. पी सी. सेन आणि कंपनीने मात्र आपल्या बाजूने जास्तीत जास्त लाथा झाडण्याचे काम व्यवस्थितपणे चालू ठेवले आहे. पूर्णपणे गोंधळाची परिस्थिती असलेले आणखी एक राज्य म्हणजे तामिळनाडू ! ! तिथे खरी लढत आहे ती प्रादेशिक पक्षामध्येच डी. एम्. के. कै. *अण्णादुराई याच्या जमान्यात सत्तेवर आल्यापासूनचा* तेथील अनुभव असा आहे की तेथील जनता मतदान दिल्लीसाठी असो किंवा मद्राससाठी असो राष्ट्रीय पक्षाचा विचार करण्यास तयार नाही. अगदी नुकत्याच झालेल्या लोकसभा–निवडणुकामधील मतदारांच्या कल पाहिला तरी हीच गोष्ट प्रकर्षाने जाणवते. द्रविड मुन्नेत्र-कळघम हा एकजीवी पक्ष होता तोपर्यंतची गोष्टच वेगळी होती. पण आंबेडकराच्या रिपब्लिकन पक्षाचे जसे फाटाफुटीमुळे वाँगे झाले नेमके तसेच या डी. एम. के. चे झाले आहे. या पक्षाच्या असंख्य अनुयायाच्या निष्ठा विशिष्ट नेत्याजवळ बांधलेल्या आहेत नेत्याने पक्ष सोडला आणि वेगळा झेंडा उभारला की हे लगेच त्या नवीन झेंड्याखाली जमा होतात. फिल्मी सितारा एम्. जी. रामचद्रन *वेगळा झाला आणि त्याच्या मागे असणारा* फार मोठा गट अण्णा डी. एम. के. च्या मागे येऊन उभा राहिला. याच एम. जी आर. ने करुणानिधी आणि कंपनीला लोकसभेच्या निवडणुकीमध्ये माती चारली. आज विधानसभा निवडणुकामध्येही सगळ्यात बलिष्ठ पक्ष हाच आहे. करुणानिधीबरोबर भाडून बाहेर पडलेले नेदुचेरियन यानीही वेगळा झेंडा उभारलेला असला तरी आपली मर्यादित ताकद ओळखून त्यानी एम्. जी आर. बरोबर तडजोड केली आहे करुणानिधीवरील खटल्यामुळे बदनाम झालेली, लोकसभा निवडणुकामध्ये पराभूत झालेली डी. एम्. के , एम्. जी. रामचद्रनची पुण्याई आणि लोकसभा निवडणुकामधील यश यामुळे आत्मविश्वास दुणावलेली अण्णा डी. एम. के. याची प्रादेशिक पातळीवरील लाथाळी आणि *जनता आणि काँग्रेस याचे राष्ट्रीय पक्षाला मतदान* करण्याचे आवाहन, याच्या बेचक्यामध्ये मतदार सापडला आहे प्रादेशिक मर्यादा ओलाडून मतदार राष्ट्रीय पातळीवरील पक्षाबाबत विचार करण्यास प्रवृत्त झालाच, तर तो जनता पक्षाची निवड करण्याचा सभव जास्त. सत्ताधाऱ्यासमोर विनम्र होण्याचा सेवाभाव हे तामिळनाडूचे एक खास वैशिष्टय आहे. जनता पक्ष केंद्रस्थानी सत्ताधारी आहे आणि काँग्रेस पक्षाच्या बदनामीचे डके दक्षिणेमध्ये खोलवर जाऊन पोहोचले आहेत, ही वस्तुस्थिती जनता पक्षाला जास्त अनुकूल आहे. मद्रासमध्ये प्रादेशिक पक्षाचीच सत्ता पाहिजे असा हेका जर मतदारानी लावून धरला–तर सिनेमावाल्या रामचद्रनची सरशी होईल. निवडणूक बाईबरोबर लढवली आणि सत्तास्थानी जनता पक्ष आल्याबरोबर *आपले* सर्व खासदार घेऊन जनता पक्षाच्या पाठीमागे उभा राहणारा रामचद्रन–ही मद्रासच्या राजकारणामधली एक अजब शक्ती आहे. तामिळनाडूमध्ये होणाऱ्या निवडणुकाच्या बाबतीत एक *अत्यंत* महत्त्वाची गोष्ट अशी की सत्तासपादनाच्या सभाव्य शक्यतेबाबत धोका पत्करून काँग्रेस आणि जनता पक्ष या दोन्ही राष्ट्रीय पक्षांनी शक्तिशाली रामचद्रनच्या अण्णा डी एम. के. अथवा करुणानिधी याच्या डी. एम. के. या पक्षाबरोबर कोणतीही तडजोड केलेली नाही. त्यातही विशेष कौतुक जनता पक्षाचे केले पाहिजे–कारण जनता पक्षाला तडजोड करणे अधिक सोपे असूनही, जनता पक्ष हातमिळवणीच्या फंदात पडलेला नाही. कै. के. कामराज यांचे *उजवे हात म्हणून समजले जाणारे आणि सध्याच्या केंद्रीय* मंत्रिमंडळामधील ऊर्जा मंत्री श्री. रामचद्रन याच्या नेतृत्वाखाली जनता पक्ष स्वतंत्रपणे निवडणुका लढवतो आहे. राष्ट्रीय पक्षाला मतदान करा ही जनता पक्षाची मागणी असेल, तर त्यामागे नैतिक पाठबळ जरूर आहे. काँग्रेसचे तसे नाही–अण्णा डी. एम. के. बरोबर तडजोड व्हावी म्हणून काँग्रेसने शिकस्तीचा प्रयत्न केला पराभूत काँग्रेसच्या पायाखालची वाळू सरकल्याने हात पुढे करणाऱ्या कोणाही दोस्ताचा हात धरण्यास काँग्रेस उत्सुक असताना हतबल काँग्रेसला रामचद्रनसाहेबानी किती जागा देऊ कराव्यात–केवळ ३० ! ! राष्ट्रीय म्हणवणाऱ्या पक्षाचा याहून मोठा अपमान तो कोणता ? म्हणजे तामिळनाडूमध्ये काँग्रेस स्वतत्रपणे निवडणुका लढवते आहे त्यामागे *कोणतेही तत्त्व वगैरे नाही.* जनता पक्ष निदान चूक दुरुस्त केल्याची शेखी मिरवू शकतो, तर काँग्रेस पक्ष ए डी एम. के. च्या उद्दाम धोरणाबद्दल हळहळ व्यक्त करण्यापलीकडे फारसे काही करू शकत नाही. यशवतराव चव्हाण यानीही तामिळनाडूच्या दौऱ्यामध्ये–ए. डी. एम के. या पक्षाने आपल्याला केवळ तीस ते पस्तीस जागा देऊ केल्या त्यामुळेच तडजोड होऊ शकली नाही असे विधान केले आहे. हे विधान करतानाही मतदाराला गोंजारण्याचा प्रयत्न होताच. त्याना जणू काही असेच सुचवायचे होते की पहा–आम्ही तुमच्या ए डी. एम. के. बरोबर तडजोड करण्यास तयार होतो, पण त्यानीच आम्हाला झिडकारून लावले. असे सांगतात की ३०–३५ जागा फारच कमी आहेत अशी तक्रार ज्या वेळी काँग्रेस पक्षाने केली, त्या वेळी ७१ साली *काँग्रेस पक्षाने लोकसभेच्या जागाच्या* बदल्यात विधानसभा डी. एम. के. साठी पूर्णपणे मोकळी सोडली होती याची आठवण करून दिली. त्या वेळी लोकसभा सुरक्षित राखण्यासाठी तामिळनाडू विधानसभेवर काँग्रेसने पूर्णपणे पाणी सोडले होते. बळकट असलेली डी. एम के मजबूत करण्याचे काम काँग्रेसनेच केले आहे हे कसे विसरता येईल ? त्या वेळी केलेल्या पापाची फळे आता भोगावी लागत आहेत. तामिळनाडूमध्ये मतदार कसे मतदान करतील हे सागणेही अवघड आहे आत्ता अशक्य वाटणारी–कोणतीही तडजोड–निवडणुकीनतर सत्ता दृष्टिक्षेपात आली की सहज होऊ शकेल. काँग्रेस–जनता पक्ष यांचे सयुक्त सरकार हा एकमेव अपवाद वगळता ( बगालमध्ये तर ही अशी तडजोडही समर्थनीय असल्याचे काही नेत्यानीच सूचित केले आहे ) कोणतेही कडबोळे तामिळनाडूमध्ये सत्ताग्रहणासाठी पुढे सरसावेल.–दोन डी. एम के. ही कदाचित सत्तेच्या लोभापोटी एकत्र येतील किंवा काँग्रेस आणि जनता पक्ष यामधील जो जास्त वजनदार असेल, त्याची दोन डी. एम के पैकी जो गट निवडणुकीनतर प्रबळ ठरेल, त्याच्याबरोबर हातमिळवणी होईल. समजा तामिळनाडूच्या मतदारानी दोन डी. एम. के. पैकी

कोणत्याही एकाला सत्तेवर नेऊन बसवले तर राज्य-केंद्र संबधाचे निरीक्षण करणे हाच एक राजकीय अभ्यास होऊन बसेल.

## साठमारीचा खेळ

मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश, हरियाना, पंजाब, बिहार ही सगळीच्या सगळी राज्ये जनता पक्षाला बहुमत देऊन गेली असती; परंतु इथे तर जनता पक्षाचे लोकच जनता पक्षाचे शत्रू आहेत. या राज्यातून जी साठमारी चालू आहे ती आपापसात आहे. कॉंग्रेसला नामशेष करणारी या राज्यांतील जनता अजूनही खूप मोठ्या प्रमाणावर जनता पक्षाला अनुकूल आहे अगदी शेवटी आलेले या राज्यामधील वृत्त हेच सांगते की, भालोद, संघटना कॉंग्रेस, जनसंघ, लोकशाही-वादी कॉंग्रेस याच्यामधील लाथाळ्यांचा जनतेला उबग आला असला तरी ही जनता जनता पक्षाबद्दल सहानुभूती बाळगून आहे. त्यामुळे या भागात जनता पक्षालाच मोठ्या प्रमाणावर मतदान होईल, अशी अपेक्षा आहे. जुने नेतृत्व पूर्णपणे नाकारून, झाल्या चुकांची पूर्ण माफी मागून कॉंग्रेस जनतेला सामोरी जाती तर कदाचित या पक्षाला जास्त सहानुभूती मिळाली असती, पण राजा अपराधी असताना वजिराला बळी देण्याची जी खेळी खेळली गेली त्यामुळे जनतेचा कॉंग्रेसवरचा राग कायम आहे. जनता पक्षाच्या चुकांबद्दलचा राग काढायचा असेल तर त्याला मतदारासमोर पर्याय नाहीच असे नाही. जनता पक्षाकडून नाकारली गेलेली लायक मंडळी जेथे उभी आहेत तेथे त्यांना मोठ्या प्रमाणावर मतदान होईल, अशी खुद्द उमेदवारांचीच अपेक्षा आहे. त्यातल्या त्यात समाधानाची गोष्ट अशी की, जनता पक्षाच्या नेत्यांची भाषा नरम आहे. चुका झाल्या असतील तर सांभाळून घ्या, असा सूर त्यांनी लावला आहे. जनता पक्षाच्या धोरणाचा पाठपुरावा करणारा राष्ट्रपती तुम्हाला हवा आहे ना? तर मग हीच संधी आहे जनता पक्षाला मतदान करा आणि लोकसभा निवडणुकीचा उत्तरार्ध पूर्ण करा, असे जनता पक्षाचे अध्यक्ष जाहीर सभेमधून सांगत आहेत. बाबूजी, चंद्रशेखर, मोरारजी-भाई, चरणसिंग ही बडी मंडळी अखेरच्या पर्वामध्ये निवडणूक-प्रचारासाठी बाहेर पडली आहेत. त्याचाही नक्की अनुकूल असाच परिणाम होईल. आणीबाणीविरोधी लाटेवर बसून जनता पक्ष लोक-सभेमध्ये पोहोचला. त्याच लाटेवर बसून राज्याच्या विधानसभा सर करू, असा जो एक हिशेब होता, तो तितक्या सुलभतेने पार पडेल,असे मात्र वाटत नाही. अर्थात वातावरण कॉंग्रेसपेक्षा जनता पक्षाला अधिक अनुकूल आहे, इतकेच भाष्य आज मतदार मतदानासाठी निघाले असता करता येईल.

## पोटनिवडणुकीचे स्वरूप

निवडणुकीच्या धामधुमीमध्ये सापडलेले आणखी एक राज्य म्हणजे ओरिसा. ओरिसामधून ज्या बातम्या येत आहेत त्या नजरे-खालून घातल्या तर तेथे होत असलेली निवडणूक ही केवळ नंदिनी सत्पथी उभ्या असलेल्या एकाच जागेची निवडणूक आहे असे वाटते. या बाई जनता पक्षाच्या उमेदवार आहेत की नाहीत, यावरच उलट-सुलट भाष्ये चालू आहेत. नंदिनीबाई आणि सर्वोदयी यांच्यामधील झगड्यामध्ये कॉंग्रेस पडलेली नाही. जयप्रकाशजींनी तेथे जनता पक्षाच्या विरोधी उमेदवाराला प्रशस्तिपत्र दिले, तर जनता पक्षाचे एक प्रमुख नेते बिजू पटनाईक, आपण नंदिनीबाईंच्या मतदारसंघा-मध्ये अजिबात जाणार नाही, असे जाहीरपणे सांगत आहेत. मोरारजीभाईंना पत्रकारांनी विचारले, सत्पथीबाईंचे काय? तर पंतप्रधान सांगतात, मला जर विचारले तर मी सांगेन की, त्या मतदारसंघातील मतदारांनी नंदिनीबाईंनाच मतदान केले पाहिजे, कारण त्याच जनता पक्षाच्या अधिकृत उमेदवार आहेत.

विधानसभा निवडणुका इतक्या गोंधळाच्या वातावरणामध्ये प्रथमच होत आहेत आता मतदार त्यातून कशी वाट काढतात ते पाहायचे ! !

□

# □ एका अति धनाढ्य भारतीयाची गोष्ट

जहाज मालमत्तेच्या अनोख्या दुनियेमध्ये प्रचंड नाव मिळवून नाम-शेष झालेल्या धर्मतेजाचा किस्सा काही जुना झालेला नाही. याच दुनियेमध्ये खरेखुरे यश संपादून-भल्याभल्यांना अस्वस्थ करून सोडणाऱ्या एका भारतीयाची कहाणी अमृत-बझार पत्रिकेने प्रसिद्ध केली आहे. जहाजव्यवसायामध्ये अति धनाढ्य म्हणून नाव मिळ-वणाऱ्या या भारतीयाचे नाव आहे रवी टिक्कू. मद्री संस्थानचे आर्थिक सल्लागार म्हणून काम करणाऱ्या एम्. एस्. टिक्कू या काश्मिरी हिंदू गृहस्थाचे रवी हे चिरंजीव. पंजाब विद्यापीठामध्ये शिकत असतानाच त्यांनी गणित या विषयामध्ये आपल्या बुद्धिमत्तेची चुणूक दाखविली. शिक्षण संपल्यावर रविबाबूंनी भारतीय नौदलामध्ये व पुढे मर्चंट नेव्हीमध्ये अधिकारी म्हणून काम केले याच काळामध्ये स्वतःचे एक मोठे जहाजसाम्राज्य तयार करावे असे स्वप्न त्याने रंगवले. किर-कोळ योजना आणि फालतू गोष्टीमध्ये त्याला रस नव्हताच. आपल्या योजना भारतात राहून आकार घेऊ शकणार नाहीत हे लक्षात आल्यावर त्याने इंग्लंडमध्ये स्वत.चे बस्तान बसविले. आपल्या योज-नांना बँकांचा पाठिंबा मिळविण्यामध्ये त्याने यश मिळविल्याने बघता बघता मनात असलेल्या मोठ्या योजनांना आकार देता येईल, इतके भांडवल गोळा झाले आणि योजनेबरहुकूम तो काम करतो आहे, भांडवलावरील व्याज आणि परतफेड व्यवस्थित होते आहे हे लक्षात आल्यावर बँकांनी त्याला व्यापक प्रमाणावर सहकार्य दिले आणि रविमहाराजाच्या ग्लोबटिक कंपनीची जहाजे प्रत्यक्षात तरंगू लागली. या नवीन महत्त्वाकांक्षी माणसाबद्दल त्याचे समव्यावसाइक, अनेक देशांची सरकारे आणि काही मोठ्या संस्था यांना त्याच्या व्यवहाराबद्दल शंका वाटू लागली. जेव्हा चौकशीचे बुजगावणे पुढे उभे करण्यात आले तेव्हा चौकशी करण्यासाठी पाठविलेल्या शासकीय अधिकाऱ्यासमोर त्याने आपल्या निर्दोष योजना ठेवल्या. ग्रीक सागर-सम्राट निर्चोस, तसेच ओनॅसिस यांना असूया वाटावी इतके त्याच्या ग्लोबटिकचे महत्त्व वाढले. विशेषतः आपल्या जहाजांना १९९० पर्यंत पुरेल इतक्या कामाचे करारनामे रविने मिळविल्यानंतर त्याचे समव्यवसाईक खरे अस्वस्थ झाले. ज्या वेळी ही बडी धेंडे आपल्या मोठ्या जहाजांना निकालात काढण्याच्या योजना आखीत होती

याच वेळी ग्लोबटिकसाठी नवीन अवाढव्य जहाजे बांधण्याचे काम जपानमध्ये चालू होते. त्यासाठी भांडवलही उपलब्ध होत होते. ग्लोबटिक कंपनीच्या जहाजावर लिबिया, सायप्रस, सिंगापूर या सोइस्कर देशाचे झेंडे फडकताना दिसतात. सोइस्कर देश अशासाठी की या देशामध्ये जहाजनोंदणी केली की कमी कर, कामगार-कायद्याच्या बंधनाचा अभाव, जहाजावरील कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेबाबत असणाऱ्या बंधनाबाबत शिथिलता, असा सारा मालकाना अनुकूल असणारा मामला. त्यामुळे ग्लोबटिकच्या जहाजावर याच देशाचे ध्वज! या रवी टिक्कू याच्या कंपनीवर समव्यवसाइकाची नाराजी असली, कामगाराच्या होणाऱ्या हालाचे वर्णन पुढे करून चौकशीची मागणी होत असली तरी ब्रिटिश सरकारने-प्रचंड विदेशी मुद्रा मिळवून देणाऱ्या रवी टिक्कूला ब्रिटिश नागरिकत्व बहाल केलेले आहे. त्याला घद्यातून बाहेर काढण्यासाठी जहाजउद्योगामधील अनेक बडी मंडळी प्रयत्नशील आहेत. अिकॉनॉमिस्टने उपरोधाने असेही म्हटले आहे की आपल्याबरोबरच आपल्या कामगारविषयक कल्पना घेऊन याची कंपनी बाहेर पडली तरी व्यवसायाचे भले होईल. ब्रिटिश सरकारला मात्र अद्यापी या भारतीय उद्योगपतीबद्दल आस्था आहे.

केवळ १२ । १५ वर्षांमध्ये प्रचंड आर्थिक सत्ता संपादन करणारा टिक्कू काहीसा माणूसघाणा आणि उर्मट आहे उगाच समाजात मिसळणे मला आवडत नाही आणि मला म्हणण्यासारखे दोस्तही नाहीत. शिवाय काही तरी निमित्त करून एखाद्या पार्टीमध्ये वा समारंभामध्ये, कोणा थोरा-मोठ्यामध्ये मिरवण्याची मला गरजही नाही आणि हौसही नाही. पन्नास लक्ष पौंडाच्या शाही निवासामध्ये आपली पत्नी आणि दोन मुले याच्या सह राहणाऱ्या या उद्योगपतीबद्दल फारसे बोलले जात नाही कारण त्याला प्रसिद्धीची जराही हाव नाही. इंग्लंडमध्ये आपण परकीय आहोत ही भावना इतक्या वर्षांनंतर मनामध्ये रुजल्यामुळे असेल कदाचित परंतु स्वतःच्या बंगल्याभोवती त्याने कडेकोट बंदोबस्त तर ठेवलाच आहे, पण त्याखेरीज- सर्किट टी व्ही. ची व्यवस्था केली असून त्याच्या सुरक्षित आवारामध्ये माशी जरी घुसली तरी तिचा निभाव लागणार नाही असे तो म्हणतो. त्याच्या निवासी स्थानाखेरीज आज ज्याची किंमत ८० लक्ष पौंड होईल असा आणखी एक शाही बंगला त्याने खरेदी केला आहे. रोल्स राइसच्या किती गाड्या त्याच्या तैनातीमध्ये आहेत याची त्याला स्वतःलाही कल्पना नाही!

ब्रिटनमध्ये आज ना उद्या आपल्याला त्रास होईल हे लक्षात घेऊन आपला सारा बाडबिस्तारा आणि कंपनीची मुख्य कचेरी न्यूयॉर्कला हलवण्याचा त्याचा विचार आहे. अमेरिकेला जायचे तर व्यावसायिक स्वप्नही तेवढेच भव्य हवे. मोठी आणि अतिमोठी जहाजे त्याने हाताळली असली तरी अमेरिकेला गेल्यावर अणुशक्तीने परिपूर्ण अशी दोन अतिभव्य जहाजे बांधण्याची त्याची योजना आहे या कामाबाबतचा कच्चा आराखडा त्याने तयार केला आहे. त्याचे म्हणणे असे की चार करोड पौंडाहून ज्याची किंमत जास्त असेल अशी ही जहाजे बांधणे हे एकट्यादुकट्याचे काम नाही. त्यासाठी त्याना भांडवल हवे आहे आणि शासकीय परवानाही हवा आहे. ब्रिटन सोडून आवरा-आवर करून अमेरिकेला जायचे म्हटले तरी निर्णय घेतल्यापासून प्रत्यक्ष स्थित्यंतर होण्यास वर्ष-दीड वर्ष लागेल. स्थित्यंतराच्या या कामाला प्रारंभ झाला असून त्यानी ब्रिटनबाहेरून व्यवसायाची सूत्रे हलवण्यास प्रारंभ केला आहे. ब्रिट.मध्ये डर्बी रेसेसच्या वेळी- कराबाबतची सर्व प्रकरणे बाजूला ठेवली जातात. हा करमुक्तीचा काळ एक महिन्याचा असतो. रविबाबू म्हणतात आता केवळ तेवढा एकच महिना मी ब्रिटनमध्ये राहीन. बाकीच्या वेळी... न्यूयॉर्क .. अधिक मोठ्या योजना... अधिक पैसा... आहे की नाही एका अति धनाढ्य भारतीयाची गमतीदार गोष्ट! !

☐


**ग्रामीण आंदोलनांचा मागोवा घेणारे पुस्तक**

# श्री ग्रा मा य न

( दुसरी आवृत्ती : प्रकाशनाच्या वाटेवर )

**श्री. ग. माजगावकर**

**राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव । पुणे ३०**

मूल्य : पंधरा रुपये

# मुक्काम दिल्ली । पृष्ठ ५ वरून

म्युन्सिपल कार्पोरेशन या दोन्ही निवडणुका एकाच वेळी होत असल्या तरी त्याच्या निमित्ताने सभातून, प्रचारातून चर्चिले जाणारे प्रश्न भिन्न भिन्न आहेत. कौन्सिलसाठी किंवा उपरवालीसाठी असलेले प्रश्न थोडे व्यापक आहेत. आणीबाणीतील अत्याचार, लोकशाही, जनता सरकारचे हात बळकट करणे कसे आवश्यक आहे असा प्रचार जनता पक्षवाले करतात, परतु कॉंग्रेसवाल्यानी दिल्लीला राज्याचा दर्जा देण्याचा प्रश्न, भाववाढ वगैरे प्रश्न पुढे दामटण्याचा प्रयत्न चालविलेला आहे. दिल्लीला राज्याचा दर्जा देण्याची मागणी ज्या कारणासाठी कॉंग्रेस सरकार टाळत होते त्याच कारणासाठी जनतापक्षही ती टाळू पहात आहे. पूर्वी जनसंघाची ती एक प्रमुख मागणी होती. या प्रश्नावर अगदी अल्प प्रमाणात कॉंग्रेसला अनुकूल असा परिणाम दिसून येतो. कॉंग्रेसला फायदा मिळवून देणारा दुसरा प्रश्न म्हणजे भाववाढ होय. जनता पक्षातली फूट आणि भाववाढ हे प्रचाराचे प्रमुख विषय कॉंग्रेसपक्ष करू पहात आहे तरीसुद्धा कॉंग्रेसमध्ये या प्रश्नाचा आधार घेऊन लढाऊ असे नेतृत्व उभे राहू शकलेले नाही. त्यामुळे आणीबाणीतील अत्याचार, नसबंदी – शिबिरे, बुलडोझरचा माज याच्या ताज्या आठवणी मतदाराच्या मनात अजून आहेत दिल्लीकराचे वैशिष्टय म्हणजे त्यानी हे अत्याचार डोळचादेखत घडताना पाहिलेले आहेत व एकूण राजकीय घडामोडीच्या या केंद्रामध्ये देशभरच्या बातम्या जास्तीत जास्त प्रमाणात होत्या. त्यामुळे 'उपरवाल्या' निवडणुकीसाठी जनता पक्षाचे वर्चस्व आज दिसून येत आहे, परंतु लोकसभा–निवडणुकाइतके प्रचड बहुमत आज जनतापक्षास मिळणार नाही. कॉंग्रेस आपले बालेकिल्ले राखण्याचाच आटोकाट प्रयत्न करीत आहे.

चादणीचौक व करोलबाग या कौन्सिल मतदारसंघात जनतापक्षाखालोखाल कॉंग्रेस बडखोराचाच जोर जास्त आहे प्रचाराच्या निरनिराळ्या साधनसामुग्रीपेक्षा उमेदवाराची जेलयात्रा आणि मतदाराच्या घराबाहेरील रोडरोलरचे अस्तित्व जास्त बोलके ठरलेले आहे. पूर्वी जनसघाची सत्ता असताना ज्या पद्धतीने सरकारने कौन्सिलचा ताबा घेतला त्यामुळे जनता पक्षास सहानुभूती मिळालेली आहे जनता पक्षाची पोस्टर्स जनता सरकारच्या दोन महिन्याच्या कारकीर्दीतील ६ वैशिष्टचे सागतात. १ वृत्तपत्रस्वातत्र्य २ विरोधकाना आकाशवाणी व दूरचित्रवाणीवर सधी ३. सक्तीची नसबदी उठविणे ४. सी. डी. एस मागे घेणे ५. मिसा कायदा रद्द करणे ६. आयात परवान्याबाबत बदलती भूमिका, परतु यामध्ये दिल्लीकराना महत्त्वाचा वाटणारा 'आणीबाणीतील अत्याचाराबद्दल नेमलेल्या चौकशी समिती' चा उल्लेख असायला हवा होता. कारण मारुती मोटर्समधील कामगाराप्रमाणेच आणखी ५–६ ठिकाणी धरणे धरणाऱ्या लोकाचे तंबू नजरेत भरतात.

जामा मशिदीजवळील मतिहामहल मेट्रोपोलिटन कौन्सिलच्या मतदारसघात आणीबाणीच्या अत्याचाराबद्दल लोकाचा अजूनही राग निवलेला नाही. त्याचा फायदा जनता पक्षास निश्चित मिळेल. या मतदारसघातून दोन बेगमाची लढत दिसून येते बेगम हबीब किडवाई ( कॉं ) आणि बेगम खुर्शीद किडवाई ( जनता ) ह्या स्त्री उमेदवार वैयक्तिकरीत्या तुल्यबल आहेत ४५००० मतांच्या या मतदारसघातून कॉंग्रेसला १२००० मते लोकसभा निवडणुकामध्ये मिळालेली होती. रुखसान सुलतानाने उभारलेल्या मोठ्या नसबदी शिबिराचीही जाग आहे त्यामुळे बेगम हबिबा चागली कार्यकर्ती असूनही निवडून येण्याची शक्यता कमी आहे. बेगम खुर्शीदला पूर्वीच्या जनसंघातील कामाचा फायदा मिळेल आणीबाणीमध्ये 'जनतावाणी'चे वाटप करण्यात त्या अग्रेसर होत्या. शिवाय गोवधबदी, बगालदेश मान्यता वगैरे आदोलनांमध्येही त्या अग्रेसर होत्या या भागातले एक वैशिष्टय म्हणजे स्वतत्र उमेदवार अन्वर देहेलिया याची शेरशायरीयुक्त उर्दू पोस्टर्स फार लोकप्रिय झालेली आहेत जामामशिदीचे बुखारीसाहेब मात्र कोणत्याच उमेदवाराच्या प्रचारास बाहेर पडलेले नाहीत ही विशेष नोद करण्यासारखी बाब आहे. चांदणीचौक या भागात एकूण ८ कौन्सिल व १६ कॉर्पोरेशन मतदारसंघ आहेत. त्यात बहुताशी भागात कॉंग्रेसला निवडून येण्याची शक्यता कमी दिसून येते.

कॉंग्रेसचा बालेकिल्ला मानलेला 'करोलबाग' लोकसभा मतदारसघातील सुमारे ८ पैकी ७ कौन्सिलच्या जागा सध्या कॉंग्रेसकडे आहेत, परतु कार्पोरेशनच्या १६ पैकी १० जागा जनसघाकडे आहेत. यावरून या दोन्ही निवडणुकाचे बाबतीत प्रश्नभिन्नता कशी आहे हे दिसून येते या निवडणुकीत कौन्सिलच्या दोनच जागा कॉंग्रेसला मिळतील असे जनतापक्षाचे कार्यकर्ते म्हणतात. त्याचा हा दावा बरोबर वाटतो. पटेलनगर या मतदारसघातील दुकानदार तर कॉंग्रेसबद्दल फार तीव्रतेने बोलतात. ह्याचे कारण म्हणजे येथील नसबदीशिबिरामध्ये या दुकानदाराकडूनच बळजबरीने घेतलेल्या वस्तू वाटण्यात आल्या. मोतियाखान या संघातही पुष्पा काळे या आणीबाणीमध्ये जेल व अत्याचार भोगणाऱ्या कार्यकर्तीबद्दल लोकामध्ये आदरभावना आहे सराई रोहिला ह्या भागाचे वैशिष्टय म्हणजे या एकाच मतदारसघात कॉंग्रेस व कम्युनिस्ट आघाडीतर्फे कम्युनिस्ट उमेदवार उभा आहे, परतु त्याच्याचबरोबर 'जॉर्ज फर्नांडीसच्या रेल्वेसपात' ( हा शब्द त्याचाच ) काम करणारा कार्यकर्ता जनता पक्षातर्फे त्याच्या विरुद्ध उभा आहे.

अशा तऱ्हेने वेगवेगळ्या लोकसभा मतदारसघाचा विचार करता जनता पक्षाचे प्रभुत्व कौन्सिलसाठी दिसून येत आहे

कॉर्पोरेशनसाठी मात्र प्रश्न स्थानिक स्वरूपाचे आहेत प्रामुख्याने नळ, रस्त्याचे डाबरीकरण, पाणीपुरवठा इत्यादी. सतनगर, देवनगर वगैरे भागात दलिताचे प्रमाण जास्त आहे. त्या भागात संजयसाहेबांच्या योजनेचा फटका बसलेला आहे. रस्त्यावरचे नळ बद केले होते ते जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी झगडून नुकतेच परत मिळविले आहेत. त्यामुळे त्या भागात जनता पक्षाच्या विजयाची निश्चितता जनतागोटातून व्यक्त केली जाते.

दिल्लीतील विविध मतदारसघाचा नामोल्लेख न करता मुस्लिम व दलित वस्त्यामध्ये एकूण जनतापक्षास अनुकूल वातावरण आहे असे म्हटल्यास ते योग्यच ठरेल तरीसुद्धा या निवडणुकामधली जनमानसाची उदासीनता मनाला खटकते. कारण त्यात राजकीयीकरणाची प्रक्रिया थाबण्याची भीती आहे जोपर्यंत मतदाराचे राजकीयीकरण होत नाही तोपर्यंत तो आपल्या जातीच्या कोशातून बाहेर येऊन राष्ट्रीय निकषावर मतदान करीत नाही. जयप्रकाशजीच्या संपूर्ण क्रातीचा झेडा घेऊन इथला युवकवर्ग ही उदासीनता घालवील का, हा खरा प्रश्न आहे, परतु विचवाचे विन्डाड पाठीवर या न्यायाने टू-व्हीलरवर *हम दो और हमारे कितने भी* ' बसवून दिल्लीच्या गुळगुळीत रस्त्यावरून हिंडणारा दिल्लीकर आज तरी पोस्टर्स वाचण्यासाठी थाबत नाही. □

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### ११।६।७७ ते १७।६।७७

**मेष : नवे क्षेत्र लाभेल.**

गेल्या आठवड्यात बुध हा व्यापारी ग्रह धनस्थानी आला आहे तर रवि दिनांक १४ जूनला तिसरा होत आहे. मंगळ तर प्रत्यक्ष तुम्हाला मदत करीतच आहे. हा ग्रहाचा तुम्हाला असलेला भरघोस पाठिंबा लक्षात घेतल्यानंतर आगामी काळाची सुंदर स्वप्ने तुम्हाला दिसू लागली तर आश्चर्य काय ! आज चंद्रदेखील पहिला आहे. यश-प्रगती, लाभ, प्रतिष्ठा असे सारे काही तुमच्या पदरात पडणार आहे. आजवर जे काही तुमच्या पदरात पडले नव्हते ते या वेळी सहजपणे तुमच्या हाती येणार आहे मोठे यश पदरात पडणार आहे. नोकरीत आशा-आकांक्षा सफल होतील. कर्तृत्वाला नवे क्षेत्र उपलब्ध होईल. मित्राची मदत होईल. पैसा भरपूर मिळेल. शुभ दिनांक १४–१६.

**महिलांना** नोकरीत अधिकारप्राप्ती होईल.

**विद्यार्थ्यांना** . हुषारीचा प्रत्यय इतरांना आणून द्याल.

**वृषभ : पैशाची गरज भागेल.**

सध्याचा काळ तुम्हाला फार अनुकूल आहे. आजवर ज्या योजना प्रत्यक्षात येत नव्हत्या त्या धंद्याच्या वाढीच्या योजना या वेळी प्रत्यक्षात येतील. रेंगाळत पडलेल्या कामाचा अनुकूल निर्णय लागेल गुरु राशीत आहे व रविदेखील अजून आठवडाभर त्याला साथ देणार आहे त्यामुळे ठरवलेले बेत पार पडतील धंद्यात नवे भांडवल गुंतवण्यास फारच अनुकूलता आहे. नोकरीची परिस्थिती खूप समाधानकारक राहील. कामाचे चीज होईल, तसेच समाधान मिळेल. व्यापारातील अंदाज अचूक ठरतील. अनेकांचे सहकार्य मिळेल. कौटुंबिक समाधान राहील. स्थावराचा अगर शेतीचा प्रश्न सुटेल. बेकारांना काम मिळेल. प्रवासात महत्त्वाचे काम होईल. शुभ दिनांक १२–१५.

**महिलांना** : विवाहेच्छु स्त्रियांचे विवाह ठरतील.

**विद्यार्थ्यांना** : नवे शैक्षणिक जीवन उत्साहाने सुरू होईल.

**मिथुन : नवे पर्व**

आठवड्याअखेरीला बारावा रवि पहिला होणार आहे आणि त्याचबरोबर तुमच्या व्यावसायिक क्षेत्रात नवे प्रगतीचे पर्व सुरू होणार आहे. तोपर्यंत हा आठवडा थोडी काळजी घ्या. आगामी काळाचे पडसाद अर्थात या वेळी उठतील. वरिष्ठांच्या मर्जीचे लाभ तुमच्या वाट्याला येऊ लागणार आहेत. नोकरीतील त्रास व अनिश्चितपणा दूर होऊन महत्त्वाचे पाऊल पडेल तुमचा व्यापार असेल तर त्यात सतावणाऱ्या अडचणी दूर होतील. कर्जाची व्यवस्था होऊन नव्या धंद्याच्या उभारणीस योग्य क्षेत्र उपलब्ध होऊ शकेल. बारावा गुरु आहे. त्यामुळे धंदा असो की नोकरी असो सगळ्यांबरोबर सहकार्याने व समजसपणाने वागून काम करून घेण्याची वृत्ती ठेवा शुभ दिनांक १४–१५.

**महिलांना** : संसारात सुखाचे वातावरण निर्माण होईल.

**विद्यार्थ्यांना** शालेय बदल व्यवस्थित पार पडेल.

**कर्क : धंद्याला उपकारक**

मंगळाची तुमच्यावर भरपूर कृपा आहे. ही कृपा म्हणजे भविष्याच्या वैभवाची साक्षच होय मंगळ हा सेनापति आहे तो जे मनात आणतील ते करून दाखवतो. म्हणूनच तुम्ही या मंगळाचा फायदा घ्यावा या वेळी जर तुम्ही एखाद्या नव्या धंद्याची सुरुवात केली तर, हा धंदा यश व प्रगती या दोन्ही चाकावर घोडदौड करील यात शंका नको. तिसरा राहू नवी नवी कामे उपलब्ध करून देईल. कर्तृत्वाला उठाव आणील नोकरीत तुमचे स्थान उंचावेल. यश दृष्टिपथात आणील वरिष्ठांच्या मर्जीचा लाभ मिळून जबाबदारी तोलण्याचे सामर्थ्य देईल बेकारांना नवी वाट दिसेल. शुभ दिनांक–१३–१५.

**महिलांना** : अपेक्षापूर्ति व यश पदरात पडणार आहे.

**विद्यार्थ्यांना** : खूप दिवसाचे स्वप्न पुरे होईल.

**सिंह : नोकरीत प्रमोशन**

आता तुमच्या बाबतीतील प्रतिकूलता खूपच कमी झाली आहे. मन आनंदी राहील. मनात असलेल्या शंका दूर होतील. नोकरीत प्रगतीचा नवा टप्पा गाठता येईल. आजवरच्या श्रमाचे चीज झाल्याचा आनंद मिळेल प्रमोशन मिळून आजवर केलेल्या श्रमाचे व सेवेचे चीज होईल. नव्या जबाबदारीची धुरा वाहाण्याची तुम्हाला सवय करावी लागेल. अनपेक्षितपणे महत्त्वाची घटना घडणार आहे. राजकारणात मात्र यश अजून पदरात पडणे जरा कठीणच आहे. यशाचा तुरा डोक्यावर मिरवण्यात म्हणण्यासारखी इच्छा पुरी होणे कठीण आहे शुभ दिनांक– १३–१४.

**महिलांना** . प्रतिष्ठेची नोकरी मिळेल

**विद्यार्थ्यांना** शालेय स्थलांतर घडण्याची शक्यता आहे.

**कन्या : अनुकूलता**

एखादे महत्त्वाचे काम पार पडले की, मनाला जे स्वास्थ्य लाभते तेच स्वास्थ्य तुम्हाला या वेळी लाभणार आहे. मग ते काम कोणत्याही क्षेत्रातील असो. सामान्यतः हा सप्ताह अनुकूल आहे नोकरीत सारे काही मनासारखे घडणार आहे वरिष्ठांची मर्जी राहून अनेक महत्त्वपूर्ण लाभ पदरात पडतील. आर्थिक बाजू एकदम सुरक्षित नसली तरी, गरजेपुरते पैसे मिळणार आहेत जुने येणे वसूल होईल. तुमची प्रतिष्ठा उंचावेल अनेक नव्या ओळखी होतील. बुद्धीचे तेज प्रभाव पाडील. अचानक प्रवासाचे जमून जाईल इच्छाआकांक्षा सफल होऊ शकतील. आरोग्य सुधारून मन प्रसन्न राहील. शुभ दिनांक– १२–१४.

**महिलांना** आरोग्य लाभून कार्यक्षमता वाढेल.

**विद्यार्थ्यांना** : समाधानकारक घटना घडतील

**तूळ : खर्चावर नियंत्रण ठेवा**

राहू आजवर तुम्हाला साथ देत होता; परंतु तो आता तुम्हाला प्रतिकूल झाला आहे. तो बारावा होऊन तुमचा खर्च सारखा वाढवत राहणार आहे या वेळी तुम्ही शक्यतो जामीन कुणालाही राहू नये. तसेच मोठमोठे आर्थिक व्यवहार करताना दक्ष राहावे. कापडधंदा, रसायने, औषधे, सोने–चांदी असे व्यापारविषयक धंदे अत्यंत काळजीपूर्वक

करा कारण 'दणका' बसणार नाही, याची काळजी घेणे आवश्यक आहे. नोकरीत उदासीनता निर्माण होण्याची शक्यता आहे वरिष्ठांबरोबरचे सबध जरी ताणले गेले नाहीत तरी पूर्वीइतकी 'मर्जीची सावली' राहणे जरा कठीणच आहे. बेकाराना आश्वासनावरच समाधान मानून घ्यावे लागेल. शुभ दिनाक १३–१४.

**महिलांना** . कलाक्षेत्रात प्रयत्नाने लाभ होईल.

**विद्यार्थ्यांना** : शैक्षणिक बाजू निष्ठेने साभाळणे आवश्यक आहे.

**वृश्चिक** : व्यापारात बरकत

राशिस्वामी मगळ सहावा आहे. तो ज्याप्रमाणे विरोधकाना धडा शिकवणार आहे त्याचप्रमाणे तुमचा धदा–व्यवसाय सुधारणार आहे. व्यापारी क्षेत्रात तुमचा दबदबा निर्माण होणार आहे शेअर्समध्ये खूप मिळकत होईल इजिनियरिंग उद्योग प्रगतीचा नवा उच्चाक निर्माण करील. नोकरीत वजन वाढेल. वरिष्ठाची मर्जी सपादन होऊन विश्वासात घेतले जाईल बेकाराना काम मिळेल. आर्थिक बाजू सुधारेल. कर्जाजी फेड होईल. नोकरीत अनुकूल स्थित्यतर होऊन इच्छाआकाक्षा पुऱ्या होतील. आरोग्याची समस्या सुटेल. शेतीची जमीन मिळू शकेल. शुभ दिनाक ११–१४.

**महिलांना** . सार्वजनिक कार्यात प्रतिष्ठा वाढेल.

**विद्यार्थ्यांना** नवीन शालेय जीवनात प्रसन्नता येईल.

**धनू** : अपेक्षापूर्ती

सध्या गुरू तेवढासा अनुकूल नाही. तो सहावा आहे. त्यामुळे उपासना अगर लेखन यात अडथळा होतो; पण त्यामुळे तुमच्या योजलेल्या कामात खीळ पडणार नाही. सहावा रवी आठवडाभर आहे. त्याचा धद्याच्या वाढीस हातभार लागेल, पण सर्वात अनुकूल असे ग्रह म्हणजे राहू व मंगळ होत. ते सर्वतोपरी तुमच्या प्रगतीला हातभार लावणार आहेत. अपेक्षापूर्तीचा इतका आनद तुम्हाला गेल्या कित्येक वर्षात मिळालेला नाही. नोकरीत बरेच काही हित-कारक घडेल. तुमची गरज वरिष्ठाना निर्माण होईल. तुमच्याशिवाय त्याचे पान हालणार नाही, ही मोठीच जमेची बाजू होय. उत्पन्नात वाढ होईल शुभ दिनाक १५–१६.

**महिलांना** : ससारातील अडचणीवर सहज मात करू शकाल.

**विद्यार्थ्यांना** : शालेय नवीन दालनात आनद मिळेल.

**मकर** : डावपेच नको

सध्या फक्त एकटा गुरूच तुम्हाला अनुकूल आहे. या गुरूने तुमच्या विचारआचारावर जर व्यवस्थित नियत्रण ठेवले तरच तुमच्या हातून काही अनुकूल काम होईल. नाही तर डावपेच खेळूनच तुम्ही तुमचे नुकसान करून घ्याल. चौथा मगळ मन.स्थिती भडकवण्याचा प्रयत्न करणार आहे. असेच तो नोकरीत तुमच्याविरुद्ध वातावरण निर्माण होऊ देणार आहे नोकरीत वरिष्ठाच्या मनात तुमच्या-विषयी सशय निर्माण होईल. प्रामुख्याने तुमच्याविषयीचा विश्वास कमी होईल अशी भीति आहे. बाकी सर्वसाधारण. आठवडा अनुकूल आहे. शुभ दिनाक १२–१६.

**महिलांना** आरोग्याची समस्या सुटेल. मन आनदी राहील.

**विद्यार्थ्यांना** शैक्षणिक बाजू सुधारेल.

**कुंभ** : कर्तृत्वाचा गौरव

पराक्रमात मगळासारखा सामर्थ्यवान ग्रह असणे ही माणसाच्या कर्तृत्वाची खूणच होय. हातून अभूतपूर्व पराक्रम घडणार असला की अशी दैवी शक्ती प्राप्त होते. या वेळी तुमच्या हातून असेच काही तरी अभूतपूर्व घडेल की तुमचे सहकारी व तुमच्या भोवतालचे लोक आश्चर्यचकित होऊन जातील या वेळी स्वतंत्र धदा तेजीत येईल. धद्यातील अडचणी शिल्लक राहणार नाहीत. हातून योजनापूर्वक कार्य घडेल. बेकाराना उत्तम नोकरी मिळेल. चालू नोकरीत वरिष्ठाची मर्जी राहून महत्त्व वाढेल एखादे महत्त्वाचे खाते सांभाळावे लागेल. राजकारणात लक्ष लागेल. तब्येतीची कुरकूर व नैराश्य कमी होईल. शुभ दिनाक ११–१४

**महिलांना** : नोकरीच्या दृष्टीने महत्त्वाच्या अनुकूल घटना घडतील.

**विद्यार्थ्यांना** : मन उल्हसित होईल. प्रसन्न असे नवे वातावरण लाभेल.

**मीन** : यशाची प्राप्ती

राशिस्वामी गुरु रविबरोबर पराक्रमात तर मंगळ दुसरा धनस्थानी आहे. गुरु-शनीचा योग लाभदायक आहे. अशा वेळी आत्मसामर्थ्य वाढते. आगामी काळातील घटनाचे अचूक अंदाज येतात. कसे करावे व पाऊल कसे उचलावे. याची बरोबर कल्पना येते. म्हणूनच तुम्ही या वेळी तुमच्या कर्तृ-त्वाची जाणीव ठेवून अचूक पावले उचला यश हाती आल्याखेरीज राहणार नाही. लेखकाना हा काळ अत्यंत अनुकूल आहे. लिखाणाला–वाङ्मयाला मागणी येईल नोकरीत पुढे पाऊल पडेल. दबदबा निर्माण होईल. मालक व वरिष्ठाच्या मर्जीचा लाभ होईल. उत्पन्नात वाढ होईल. दुय्यम धदा तेजीत येईल. व्यापार सुधारेल अनेकांचे सहकार्य लाभेल. सर्व अडचणी निवारण होतील. पैसा मिळेल. शुभ दिनाक १२–१३.

**महिलांना** · मगल कार्यात पुढाकार घ्यावा लागेल.

**विद्यार्थ्यांना** : अभ्यासाच्या बाबतीत अपेक्षापूर्ती होईल. □


# पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पाढरे डाग बरे करण्यात आमच्या उपचाराने मोठी ख्याती मिळविली आहे. उपचार सुरू झाले की सुधारणा दिसून येईल. रोगाच्या तपशिलासह लिहा. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पाढऱ्या डागापासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्याना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

**BHARAT AYURVEDASHRAM ( M ) P. O. KATRI SARAI ( GAYA )**

MANOOS ( Marathi Weekly ) 75 : Paise Regd. No. PNC-68


**डोले पीक सर्वदूर ऽऽ.. सुख समृद्धी भरपूर..**

ऐका हो ऐका . . . ऽऽऽ . . .
पिकं भरघोस होणार . . .
अन् डोलू लागणार . . .
व्हय, व्हय – आणि आपणही **नाचणार**
पण कवा ?
पिकांना लागणारी खते भरपूर
प्रमाणात मिळतील तवा.
खते – मग ती जमिनीतून देण्याची **असोत**
अथवा पिकावर फवारण्याची असोत – **भरपूर**
प्रमाणात द्या. त्या साठी जर आर्थिक
सहाय्याची जरुरी असेल तर **आमच्या**
जवळच्या शाखेस भेट द्या.



**बँक ऑफ महाराष्ट्र**

११७७, बुधवार पेठ, पुणे ४११००२.

*जेथे अर्थसहाय्याची खरी जरूरी। तेथे 'बँक ऑफ महाराष्ट्र' लावी हजेरी।*

PRAJAKTA